**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी** : राज्यातील शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर होत असलेले विजेचे भारनियमन

**मु.शी** : राज्यातील शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर होत असलेले विजेचे भारनियमन या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा .

( चर्चा पुढे सुरु..... )

**उपसभापती** : आता आपण राज्यातील शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर होत असलेले विजेय भारनियमन या विषयावरील चर्चा पुढे सुरु करु या.

**सभागृहात गणपूर्ती नसणे**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात महत्वाच्या विषयावर चर्चा होत असताना कोरम नाही ही चिंतेची बाब आहे. सभागृहात कोरम ठेवणे ही सत्ताधारी पक्षाची जबाबदारी आहे. मी कालच सांगितले होते की, सकाळी लवकर कोणी येत नसल्यामुळे सभागृहाची विशेष बैठक सकाळी 9.45 वाजता ठेवू नये. आम्हाला वेठबिगारी समजता काय ? याठिकाणी सत्ताधारी पक्षाचे प्रतोद सुध्दा उपस्थित नाहीत. फक्त मंत्रिमहोदय उपस्थित आहेत. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची कामकाजाबाबतची असलेली अनास्था ही अतिशय गंभीर बाब आहे. या विषयावर माननीय विरोधी पक्ष नेत्यांतर्फे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे भाषण झालेले आहे. आपण ही चर्चा नंतर घेतल्यास दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य "आम्हाला बोलायचे आहे" असे सांगतील आणि ही सवय बरोबर नाही. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण ही चर्चा येथेच स्थगित करावी.....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांचे उत्तर सुरु करावे....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभागृहात कोरम ठेवणे ही सत्ताधारी पक्षाची जबाबदारी आहे. तेव्हा सभागृहात कोरम नसताना माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर सुध्दा रेकॉर्डवर येता कामा नये. याठिकाणी सत्ताधारी पक्षाकडून फक्त माननीय मंत्रिमहोदय उपस्थित आहेत, त्यांच्या मागे उभे राहण्यासाठी त्यांच्या बाजूकडील एकही सदस्य नाही. आम्ही एखाद्या महत्वाच्या विषयावर गांभीर्याने चर्चा उपस्थित केली असेल तर सभागृहात उपस्थित राहणे ही आमची सुध्दा जबाबदारी आहे. तेव्हा दोन्ही बाजूच्या सदस्यांना अद्दल घडू द्यावी. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य दोषी आहेत. तेव्हा मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आपण ही चर्चा स्थगित करावी.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांची उत्तर देण्याची तयारी असताना दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या कामकाजाबाबत दाखविलेली अनास्था आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केलेल्या सुचनेनुसार मी ही चर्चा स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.30 वाजता पुन: सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सकाळी 9.48 वाजता सकाळी 11.30 पर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**विजेच्या भारनियमनासंबंधीची चर्चा रद्द केल्याबाबत.**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या विशेष बैठकीमध्ये विजेच्या भारनियमनासंबंधी चर्चा होती. परंतु सभागृहामध्ये गणपूर्ती नसल्यामुळे माननीय उप सभापती महोदयांनी ती चर्चाच रद्द करुन टाकली.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय ऊर्जामंत्री सोडून सत्ताधारी पक्षातील एकही सन्माननीय सदस्य सकाळी सभागृहात उपस्थित नव्हते. मग अशाप्रकारची चर्चा ठेऊन उपयोग काय ?

**सभापती** : काल सकाळी 9.45 वाजता सभागृह सुरु करण्याचे ठरले होते, त्याप्रमाणे सभागृहाची बैठक सुरु झाली होती, त्यानंतर सभागृहामध्ये गणपूर्ती नसल्यामुळे.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सकाळी 10.00 किंवा 10.30 वाजता सभागृह सुरु करावे, अशी आम्ही मागणी केली होती. परंतु पीठासीन अधिकाऱ्यांनी सकाळी 9.45 वाजता सभागृहाची बैठक भरेल असा निर्णय दिला. मी आज सकाळी माझ्या कार्यालयात उपस्थित होतो. परंतु माननीय उपसभापती महोदयांनी लगेचच विजेची चर्चा रद्द करुन टाकली.

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 चे एकूण 3 प्रस्ताव चर्चेसाठी असून त्यासाठी भरपूर वेळ लागणार आहे. त्यामुळे सकाळी रद्द झालेल्या प्रस्तावावर चर्चा करण्याच्या दृष्टीने आता संधी देता येईल, असे मला वाटत नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, 23 तारखेला वेतनेत्तर अनुदानाचा तारांकित प्रश्न राखून ठेवला होता, तो आजच्या कामकाजत्रिकेत आलेला नाही.

**सभापती** : मी तपासून घेतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : विशेष सत्रातील चर्चा रद्द झाली का ?

**सभापती** : आता ती चर्चा घेता येणार नाही. याबाबतीत सकाळच्या विशेष सत्रामध्येच माननीय उपसभापतींनी निर्णय दिलेला आहे. (.2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील विजेचा प्रश्न अतिशय ज्वलंत झालेला असल्यामुळेच काल प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन विजेवर चर्चा घ्यावी अशी आम्ही मागणी केली होती. त्यामुळे याठिकाणी सकाळी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी 10 मिनिटांसाठी सभागृह स्थगित करावयास पाहिजे होते व त्यानंतर चर्चा घ्यावयास पाहिजे होती. परंतु याठिकाणी ही चर्चाच रद्द करण्यात आली. तशी मागणी जरी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केली असली तरी त्यांनी सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांव्यतिरिक्त सत्ताधारी पक्षातील एकही सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्यामुळेच त्यांनी अशाप्रकारची मागणी केलेली होती. सभागृहामध्ये कोरम ठेवणे ही शासनाची जबाबदारी आहे.

**सभापती** : सभागृहामध्ये कोरम मेंटन करणे ही शासनाची जबाबदारी आहे, हे बरोबर आहे. या चर्चेच्या अनुषंगाने सभागृहामध्ये विरोधी पक्षातील 3 सन्माननीय सदस्य व सत्ताधारी पक्षातील फक्त माननीय ऊर्जामंत्रीच उपस्थित होते. या परिस्थितीमध्ये माननीय उपसभापतींनी निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयाबाबत आता आपण कितीही मागणी केलीतरी तो निर्णय मला फिरवता येणार नाही. आता आपण पुढे जाऊ.

------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

( स्थगित ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 24472 )

**सभापती** : आता दिनांक 4 एप्रिल,2007 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 24472 घेण्यात येईल.

**दिंडोशी, मालाड (मुंबई) येथील दुकानांच्या गाळ्यांच्या विक्रीबाबत**

**(१) * २४४७२ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. गुरुमुख जगवानी , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. संजय केळकर , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दीपक सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोशी, मालाड (मुंबई) न.भू.क्र. ८२७, सर्व्हे नं. २३९/१ नागरी निवारा प्रकल्प-१ व २ च्या शेजारी असलेल्या १३ दुकान गाळ्यांच्या विक्रीसाठी निविदा मागविल्या होत्या व त्या दिनांक ६ जानेवारी, २००७ रोजी उघडण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी एकूण १४ दुकाने होती व त्यापैकी १ दुकान विनानिवीदा श्री. ऋषिकेष सेनगुप्ता या नावाच्या इसमास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या १४ व्या दुकानाची किंमत किती होती व ती विनानिविदा देणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव काय आहे व त्या अधिकाऱ्यांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्याप कारवाई झाली नसल्यास ती केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री.विलासराव देशमुख** : (१) व (२) होय.
(३) व (४) सदर दुकानांसाठी रु.३,०००/- प्रति चौ.फु.अशी ऑफसेट प्राईस ठरविण्यात आली होती. तथापि, वितरण करताना लगतच्या दुकानास प्राप्त होणाऱ्या उच्चतम निविदा दराप्रमाणे फरकाची रक्कम अदा करावी लागेल अशी अट वितरणपत्रामध्ये घातल्यामुळे एकूण रु.३३,४४,४४४/- एवढी रक्कम वसूल करण्यात येत आहे. प्रस्तुत दुकानाचे वितरण करण्याबाबत तत्कालीन संचालक/पणन, श्री.कारखानीस यांनी शिफारस केली होती व श्री.वेंगुर्लेकर, तत्कालीन उपमुख्य अभियंता, श्री.एस.डी.शिंदे, तत्कालीन मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ व श्री.उत्तम खोब्रागडे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मान्यतेने वितरण करण्यात आले आहे. तथापि, या वितरणामध्ये म्हाडाचे आर्थिक नुकसान होत नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(नंतर कु.गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ MHM/ 11:35

ता.प्र. क्र. 24472.......

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, निविदा न मागाविता 14 क्रमांकाच्या गाळयाची विक्री करण्यात आली हा प्रश्न मागच्या वेळी सभागृहात उपस्थित होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदय उत्तर देऊ शकले नाही म्हणून हा प्रश्न राखून ठेवलेला होता. त्यावेळी असे सांगितले होते की, 13 गाळयंच्या निविदा काढल्या होत्या. परंतु 14 क्रमांकाच्या गाळयाची निविदा काढण्यात आली नाही. ती जागा टेलिफोन एक्चेंजला देण्यात येणार होती. टेलिफोन एक्सचेंजला जागा देण्यासाठी म्हाडा यापुढे नियमाचा भंग करणार आहे का ? 14 व्या गाळयाच्या निविदा न काढता विक्री करण्यात आली त्या संदर्भात शासन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय या ठिकाणी 14 दुकाने होती व त्यापैकी एका दुकानाची निविदा न मागविता विक्री करण्यात आली ही गोष्ट खरी आहे. युटिलिटीसाठी प्राधिकरणाचे जे काही धोरण असावयास पाहिजे होते, ते धोरण राबविले गेले नाही. टेंडर न मागविता स्वत:च्या अधिकारात गाळे विकण्याची कायदेशीर व्यवस्था आज म्हाडात उपलब्ध नाही. तेथील नागरिकांना टेलिफोनची सुविधा मिळावी या हेतूने हा व्यवहार केला गेला होता. टेंडरमधून जी काही किंमत आलेली आहे त्या किंमतीतील फरकेची रक्कम वसूल करण्याची म्हाडाकडून कारवाई करण्यात येणार आहे. ही जी अनियमितता निर्माण झालेली आहे ती मी मान्य केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अधिकाऱ्यांचा हेतू शुद्ध होता. परंतु कामाची कार्यपद्धती जी त्यांनी अवलंबिली ती चुकीची होती. अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे गाळयांचे वाटप करु नये अशा सूचना मी त्यांना देत आहे. म्हाडाचे नुकसान होऊ नये म्हणून इतर गाळयांची जी रक्कम आलेली आहे ती रक्कम भरुन भविष्यामध्ये शासनाकडून काळजी घेतली जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 14व्या गाळयाची विक्री करताना निविदा मागविण्यात आली नाही ही गोष्ट माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केलेली आहे. म्हाडा ॲक्ट प्रमाणे जमीन किंवा कोणताही गाळा लिलावाशिवाय किंवा सोडतीशिवाय देता येत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचा हेतू चांगला आहे याबद्दल शंका घेतली जात नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ MHM/ 11:35

श्री.मधुकर चव्हाण ..... ता.प्र. क्र. 24472.......

श्री.उत्तम खोब्रागडे हे म्हाडाचे अध्यक्ष असताना त्या ठिकाणी त्यांनी काय काय केले हे मला माहीत आहे आणि सन्माननीय मुख्यमंत्र्यांनाही माहीत आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांना देखील माहीत आहे.नियमामध्ये नसताना विशेष अधिकार वापरुन निर्णय घेण्यात आला. डिस्क्रिशनरी पॉवर चा वापर लार्जर इंटरेस्टसाठी करावयाचा असतो.. माझे असे म्हणणे आहे की,जी किंमत वसूल करण्यात आली आहे ती किंमत तारांकित प्रश्न विचारल्यानंतर वसूल करण्यात आली हे खरे आहे काय ? ज्या अधिकाऱ्यांनी अधिकार नसताना विशेष अधिकाराचा वापर केला अशा अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, म्हाडाच्यावतीने किमत वसूल करण्याची कारवाई सुरु झालेली आहे. तसेच अनियमिततेसंदर्भात योग्य ती चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय , सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, या अधिकाऱ्याचा उद्देश चांगला होता . मग तारांकित प्रश्न विचारला गेल्यानंतर कारवाई करण्यात आली ही गोष्ट खरी आहे का ? आणि विशेषाधिकाराचा वापर केला गेला असेल तर सामान्य रेटला देण्याची गरज नव्हती. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एखाद्या अधिकाऱ्याचा उद्देश चांगला असेल तर त्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार का ? व अशाप्रकारे नियमतबाहय काम झालेले असेल तर ते नियमात येण्यासाठी काही कारवाई शासनाकडून करण्यात येणार आहे का ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ही जी अनियमितता झालेली आहे त्या संदर्भात चौकशी करण्याचे मान्य करण्यात आलेले आहे. तसेच संस्थेचे जे नुकसान झालेले आहे,त्यासाठी किमत वसूल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा गोष्टी भविष्यात घडू नयेत अशा सक्त सूचना म्हाडाला देण्यात येतील व या संदर्भात धोरण ठरविण्यात येईल.

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पनवेल (जि. रायगड) येथील तेरणा रुग्णालय बंद असल्याबाबत**

**(२) * २५९९९ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक २२६९२ ला दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या काही वर्षापासूनच्या वाढत्या तोट्यामुळे बंद असलेले पनवेल सेक्टर १२ (जि. रायगड) येथील तेरणा रुग्णालय अद्यापही सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००४-२००५ मध्ये या रुग्णालयास झालेला तोटा सर्वाधिक म्हणजे २८ लाख ५७ हजार रुपयांचा होता हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तोट्याची कारणे काय आहेत,

(४) हे रुग्णालय बंद असल्याने ग्रामीण भागातील गरिब रुग्णांना माफक दरात वैद्यकिय सुविधा मिळत नसल्यामुळे व त्यांचे उपचाराअभावी हाल होत असल्यामुळे शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** :

(१) फेब्रुवारी २००५ पासून पनवेल सेक्टर १२ येथील तेरणा रुग्णालय बंद आहे.

(२) रुग्णालयास सन २००४-२००५ मध्ये २८,५७,५४५/- एवढा तोटा झाला आहे.

(३) जमेपेक्षा खर्च जास्त झाल्यामुळे रुग्णालयास तोटा झालेला आहे.

(४) ग्रामीण भागातील गरिब रुग्णांना माफक दरात वैद्यकीय सुविधा ग्रामीण रुग्णालय पनवेल मार्फत उपलब्ध आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न त्या दिवशी यासाठी राखून ठेवण्यात आला होता की, तेरणा मेडिकल कॉलेजमध्ये असणा-या सर्व विद्यार्थ्यांशी पनवेल सेक्टर 12 येथील रुग्णालय जोडलेले होते. तीन-चार वर्षांपासून हे रुग्णालय बंद आहे. प्रश्न असा उपस्थित झाला होता की, मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या सुविधेची आता काय व्यवस्था आहे ? या प्रश्नाला ग्रामीण भागातील गरिब रुग्णांना माफक दरात वैद्यकीय सुविधा ग्रामीण रुग्णालय पनवेल मार्फत उपलब्ध आहेत.असे उत्तर देण्यात आले होते. परवाच्या महाराष्ट्र टाईम्समध्ये यासंदर्भात एक वृत्त आले आहे ते मी या ठिकाणी वाचून दाखवितो. या वृत्ताची हेडलाईन "गैरसोयी तुझे नाव पनवेल ग्रामीण हॉस्पिटल" अशी ओळख असलेल्या ग्रामीण रुग्णालयाकडे वीज आणि दूरध्वनीची लाखो रुपयांची थकित बिले असल्यामुळे पनवेल येथील रुग्णालयाची वीज कापली जाते आणि पुन्हा पुन्हा विनंतीवरुन ती जोडण्याचा प्रयत्न केला जातो. पनवेलच्या रुग्णालयाची अशी अवस्था असतांना मग तेरणा मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांची काय व्यवस्था केली यासंबंधीचे उत्तर त्या

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.25999 पुढे सुरु.............</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर...........

दिवशी आले नाही. तेरणा मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले हॉस्पिटल बंद असल्यामुळे त्यांची व्यवस्था कुठे केली ? तेरणा हॉस्पिटल बंद असल्यामुळे व पनवेल येथील हॅास्पिटल नीट नसल्यामुळे रुग्णांची वाईट अवस्था होते आहे यासंबंधी शासनाने काय व्यवस्था केली ? हॉस्पिटल तोटयात गेले, त्याची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे पनवेल येथे हॅास्पिटल होते त्यामधील 40 विद्यार्थी पनवेलच्या रुग्णालयात अतिरिक्त प्रॅक्टीकलसाठी येत होती. नेरुळ येथे याच न्यासाचे हॉस्पिटल आहे त्याची संख्या त्यांनी वाढविली. नेरुळ महाविद्यालय ते पनवेल येथील रुग्णालयमधील अंतर 22 किलोमीटर आहे. त्यामुळे नेरुळमध्ये या संस्थेने प्रत्याक्षिकासाठी आणि सगळया शिक्षणासासठी नेरुळ येथील वैद्यकीय महाविद्यालय येथे रुग्णालयाचे विस्तारीकरण केले आणि त्यामुळे पनवेल येथील रुग्णालयात तेरणा कॉलेजच्या ज्या विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिकांसाठी पाठविण्यात आले होते ते येत नाहीत. पनवेल येथील रुग्णालयाला तोटा आल्यामुळे ते बंद पडले. सातत्याने न्यासाला सांगितले आहे की, आपल्या संस्थेला हॉस्पिटलसाठी भूखंड मिळालेला आहे, त्या ठिकाणी हॉस्पिटल सुरु करावे. पनवेलसंबंधी विरोधी पक्षनेत्यांनी जी माहिती दिली आहे त्याची माहिती माझ्याकडे नाही. पनवेल रुग्णालय कसे सुरु होईल, रुग्णांना सोयी कशा उपलब्ध होतील, विद्यार्थ्यांची कशी सोय होईल यासाठी शासन निश्चित प्रयत्न करीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्र टाईम्ससारख्या वृत्तपत्रात बातमी आलेली असतांना माननीय मंत्री महोदयांना त्यांची माहिती नाही. लाखो रुपयांची बिले थकलेली आहेत, त्या ठिकाणी वीज उपलब्ध नाही, कुठल्याही प्रकारच्या सुविधा नाहीत. "गैरसोयी तुझे नाव पनवेल ग्रामीण हॉस्पिटल" असे वृत्त महाराष्ट्र टाईम्सने त्यांच्या वर्तमानपत्रात दिले आहे. त्यामुळे या हॅास्पिटलची काय व्यवस्था होणार आहे ? 22 किलोमीटर अंतरावर विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिकासाठी जावे लागते. हे विद्यार्थी कसे मॅनेज करतात ?

..3..........

**<u>ता.प्र.क्र.25999 पुढे सुरु.............</u>**

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पनवेल रुग्णालयात आता विद्यार्थी प्रात्याक्षिकांसाठी येत नाहीत. नेरुळ येथे याच न्यासाचे रुग्णालय आहे त्या ठिकाणी विद्यार्थ्यांची व्यवस्था केली आहे. पनवेल येथील रुग्णालय चालू करावे, असा शासनाचा प्रयत्न आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एमबीबीएससाठी लाखो रुपयांचे डोनेशन घेण्यात आलेले आहे. न्यासाला तोटा झाला आहे असे मंत्री महोदय सांगतात. यावर कोणी विश्वास ठेवेल का ? या न्यासाची वार्षिक बॅलन्सशिट तपासून पाहिली आहे का ? यावर्षी मेडिकल कॉलेजेसना फी देखील वाढवून मिळालेली आहे, जवळ जवळ 75 हजार रुपये फी वाढलेली आहे. गेल्या तीन वर्षापासून जे विद्यार्थी शिकत आहेत त्यांच्याकडून पूर्वलक्षी प्रभावाने पहिल्या वर्षापासून फी वसूल केली जाणार आहे. राज्य शासन या कॉलेजची परिस्थिती एमसीआयला कळविणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या प्रश्नाचे दोन भाग आहेत. पनवेल येथील सिडकोचा भूखंड घेतलेला आहे तो एक भाग. मेडिकल कॉलेज, नेरुळ येथे आहे तो दुसरा भाग झाला. नेरुळ येथे मेडिकल कॉलेज आणि दवाखाना आहे. पनवेल येथे जो भूखंड हॉस्पिटलसाठी घेतला होता तेथील रुग्णालय बंद आहे. कारण, सन 2002-2003 मध्ये या हॉस्पिटलला 19 लाख 97 हजार रुपये, सन 2003-2004 मध्ये 91 हजार रुपये व सन 2004-2005 मध्ये 28 लाख 57 हजार रुपये एवढा तोटा झाला आहे.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MHM/ SBT प्रथम श्री.रोझेकर..... 11:45

ता.प्र.क्र.25999.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सदर कॉलेज हे एम.सी.आय.च्या नियमाप्रमाणे चालत नाही, अशी माझी माहिती आहे, यावर माझा प्रश्न असा आहे की, याबाबत आपण एम.सी.आय.ला पत्र लिहिणार का ?

श्री.गणेश नाईक : पनवेल येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता भूखंड प्राप्त करण्यात आला होता, हे खरे आहे काय ? या दरम्यान त्यांना नेरुळ येथे भूखंड मिळाला तेथे त्यांनी हॉस्पीटल काढले ते एम.सी.आय.च्या नियमाप्रमाणे व्यवस्थित सुरु आहे. परंतु पनवेलचे हॉस्पीटल बंद आहे, खरे पाहिले तर ते पनवेल येथील ग्रामीण रुग्णांच्या सोयीसाठी चालू करण्याचा सरकारचा मानस होता.

श्री.संजय केळकर : पनवेल येथे वैद्यकीय महाविद्यालय चालू नाही, तर शासनाने दिलेला जो भूखंड आहे तो शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून त्यांना दिला होता. जर या जागेवर ते आरोग्य केंद्र व वैद्यकीय महाविद्यालय या दोहोंपैकी काहीच चालू नाही तर मग तो भूखंड शासन परत घेणार आहे का ? या ठिकाणी मी स्वत: जाऊन आलेलो आहे, दुसरा प्रश्न म्हणजे येथील ग्रामीण रुग्णांच्या सोयीकरिता शासन काय व्यवस्था करणार आहे ?

श्री.गणेश नाईक : पनवेल येथील ग्रामीण रुग्णालय जर वर्ष दीड वर्षामध्ये चालू केले गेले नाही तर भूखंड परत घेण्याची कारवाई शासन सुरु करेल. पनवेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रश्न प्रस्तावित आहे. या सभागृहामध्ये माननीय आरोग्य मंत्री देखील उपस्थित आहेत, आम्ही माननीय आरोग्य मंत्र्यांच्या निदर्शनास पनवेल येथील ग्रामीण रुग्णांची होणारी गैरसोय आणून देऊ.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

E -2

## डॉ.घुगरी, यांच्या हलगर्जीपणामुळे झालेला मृत्यू

**(४) * २०१९३ श्री.भास्कर जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौ.अनिता अनिल गुजर या महिलेचा दिनांक ४ नोव्हेंबर, २००५ रोजी डॉ.घुगरी, यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला आहे हे खरे आहे काय,

(२) याबाबतची चौकशी जिल्हाशल्य चिकित्सक रत्नागिरी यांचेकडे पाठवूनसुध्दा अद्याप अहवाल तयार करण्यात आला नाही हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व या प्रकरणी चौकशी करुन संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ.विमल मुंदडा** : (१) हे खरे नाही (२) व (३) डॉ.बी.सी.बागडी.सहसंचालक,आरोग्य सेवा, मुंबई यांनी दिनांक ४ /८ २००६ रोजी रुग्णालयात जाऊन चौकशी केली आहे त्यानुसार दिनांक ४ नोव्हेंबर,२००४ रोजी प्रसुतीनंतर आवश्यक औषधोपचार केल्यानंतरही रुग्णाचा वार पडलेला नव्हता व रक्तस्त्राव सारखा सुरु होता म्हणून तिची प्रकृति गंभीर झाली होती. वार काढणे अत्यंत जरुरीचे होते. हा वार काढण्याकरिता ( retained placenta ) स्त्रीरोग तज्ज्ञ,बधिरीकरण तज्ज्ञ व रक्तपेढीची अत्यंत आवश्यकता होती तथापि या सोयी सदर रुग्णालयात उपलब्ध नसल्यामुळे त्यावेळी कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ.घुगरी यांनी पुढील उपचारार्थ Higher Centre कडे संदर्भित केले होते. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता या प्रकरणी डॉ.एस.के.घुगरी,वैद्यकीय अधिकारी यांचा निष्काळजीपणा दिसून येत नाही. त्यामुळे डॉ.घुगरी यांचेविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सदर प्रश्न दिनांक २० जुलै,२००६ ला एका गरीब कुटूंबाला न्याय देण्याकरिता आपण राखून ठेवला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय श्री.दिलीप वळसे पाटील हे देखील उपस्थित होते त्यांनी असे सांगितले होते की, या प्रकरणाच्या तपासंतर्गत मयत महिला श्रीमती अनिता गुजर यांच्या सास-याची स्वत:ची गाडी असल्याचे जर आढळून आले तर त्यानुसार कारवाई केली जाईल परंतु सदर कुटुंब हे अतिशय गरीब व रोजच्या जेवणाला मोहोताज असे आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे या प्रकरणाच्या तपासांतर्गत या कुटुंबाची स्वत:ची गाडी नसल्याचे आढळून आले, आता शासन यावर कोणती कारवाई करणार आहे ? मयत महिलेच्या कुटुंबियांना कोणत्या प्रकारची मदत लवकरात लवकर करणार आहे ? माननीय मंत्रिमहोदयांनी असेही सांगितले होते की, यामध्ये जर त्या हॉस्पीटलच्या व्यवस्थापनाचा जास्तच निग्लिजंस आढळून आला तर त्यावर देखील कारवाई केली जाईल. सदर तारांकित प्रश्नाच्या सुधारित उत्तरामध्ये असा स्पष्ट उल्लेख आहे की, दिनांक ४ नोव्हेंबर,२००४ रोजी प्रसुतीनंतर आवश्यक औषधोपचार केल्यानंतरही रुग्णाचा वार पडलेला नव्हता व रक्तस्त्राव सारखा सुरु होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून सकाळी ४.२० ला आलेल्या सदर महिला रुग्णास हॉस्पीटलच्या व्यवस्थापनाने २० ते २५ मिनिटांमध्ये वार वाढण्याकरिता ऑटोरिक्षामधून संदर्भ सेवेकरिता जवळच्या हॉस्पीटलमध्ये हलविण्यात आले, हे शासनाच्या डॉक्टरांचे दुर्लक्ष नाही काय ? म्हणून सदर प्रकरणातील दोषी डॉक्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा शासन दाखल करणार का ? आणि मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना आपण नुकसान भरपाई लवकरात लवकर देणार का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे तीन चार प्रश्न विचारले त्यावर मला असे म्हणावयाचे आहे की, सदर रुग्णालयामध्ये मयत महिला व तिचे पती असे दोघेही ऑटोरिक्षामधून आले होते. रुग्णालयातील डॉक्टर व स्टाफ नर्सने योग्य तो औषधोपचार व उपचार देऊनही अर्भकाचा जन्म झाला नाही म्हणून रिटेन्ड प्लासेंटा याकरिता व स्त्रीरोग तज्ज्ञ, बधिरीकरण तज्ज्ञ रक्तपेढीचा अत्यंत आवश्यकता होती म्हणून त्या मयत महिला रुग्णाला ताबडतोब नजीकच्या हॉस्पीटलमध्ये संदर्भसेवेकरिता हलविण्याचे सांगण्यात आले. सदर दाम्पत्यांना ॲब्यूलंसकरिता विचारणा केल्यानंतर त्या महिलेच्या पतीने ते ज्या ऑटोरिक्षाने आले त्याच ऑटोरिक्षाने जाणार असे सांगितले होते. हे दाम्पत्य सदर हॉस्पीटलच्या व्यवस्थापनाने सांगितल्याप्रमाणे नजीकच्या वालववार नावाच्या उपरोल्लेखित सर्वसेवांनी युक्त असलेल्या हॉस्पीटलमध्ये गेले होते. या दरम्यान सदर मयत महिलेला जे प्राथमिक उपचार करावयास पाहिजे होते ते सर्व सदर रुग्णालयाच्या डॉक्टर व स्टाफ नर्स मार्फत केले गेले होते. वाललवार या हॉस्पीटलमध्ये संदर्भसेवेकरिता व अगेन्स्ट मेडीकल ॲडव्हाईस ट्रीटमेंट झाल्यानंतर दीड वाजता या महिलेचा मृत्यू झाला होता. सदर महिलेची परिस्थिती हलाखीची होती व तिचा मृत्यू झाला हे खरे पाहिले दुर्दैव आहे परंतु यामध्ये संबंधित डॉ.घुगरे यांचा हलगर्जीपणा कोठेही आढळून येत नाही. अशा प्रकारची घटना होता काम नये,निष्काळजीपणाने होता कामा नये म्हणून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जननी सुरक्षा योजना राबविण्यात येणार आहे. परंतु एखद्या ठिकाणी संदर्भसेवा उपलब्ध नसतील तर त्याकरिताही आवश्यक तरतूद करण्याच्या प्रस्तावाचा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामध्ये अंतर्भाव केलेला आहे.

यानंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.20193** ........

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, चुकीचे उत्तर रेकॉर्डवर आलेले आहे. मागच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, त्या महिलेचा मृत्यू 8.30 वाजता झालेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव मी आपल्याला पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी हा प्रश्न सभागृहामध्ये लावून धरला होता. ग्रामीण सुरक्षा योजनेसंबंधी माननीय आरोग्य मंत्री महोदया यांनी माहिती दिली. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या महिलेचा मृत्यू झालेला आहे त्या महिलेला शासन नुकसान भरपाई देणार काय ? आपण डॉक्टरला पाठीशी घालत आहात, असे माझे मत आहे. हा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात आली. त्यानंतर आज हा प्रश्न पुन्हा सभागृहामध्ये चर्चेला आलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी मागच्या वेळी या प्रश्नाला जे उत्तर दिले होते तेच उत्तर आजही कायम आहे. माझा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदया त्या डॉक्टरची पुन्हा उच्च स्तरीय चौकशी करणार काय आणि त्या महिलेला नुकसान भरपाई देणार काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, अशा प्रकारे जर एखाद्या महिलेचा मृत्यू झाला असेल तर शासनाच्या धोरणाप्रमाणे नुकसान भरपाई दिली जात नाही. डॉ.बागडी, सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी रुग्णालयात जाऊन चौकशी केलेली आहे. डॉ.घुगरी यांनी निष्काळजीपणा केलेला नाही, असे चौकशीत निष्पन्न झालेले आहे. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य मानून या प्रकरणी पुन्हा चौकशी करण्यात आली होती. डॉ.घुगरी यांनी निष्काळजीपणा केलेला नाही. त्यांनी रुग्णावर योग्य ते उपचार केलेले आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, चुकीचे उत्तर रेकॉर्डवर आलेले आहे. मागच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, त्या महिलेचा मृत्यू 8.30 वाजता झालेला आहे आणि आता असे उत्तर देत आहेत की, त्या महिलेचा मृत्यू 1.30 वाजता झालेला आहे. त्या महिलेचा मृत्यू सकाळी 8.30 वाजता झालेला आहे. त्या महिलेला रुग्णालयामध्ये दाखल केल्यानंतर 15-20 मिनिटांनी ऑटो रिक्षातून बाहेर नेण्यात आले. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.**20193 ........

श्री.भास्कर जाधव .........

आहेत. त्या महिलेचे सासरे वयोवृद्ध आहेत. ते अतिशय गरीब कुटुंब आहे. त्या महिलेची अडीच वर्षाची मुलगी दारोदारी फिरत आहे. माणुसकीच्या दृष्टीकोनातून त्या महिलेला मुख्यमंत्री निधीतून मदत केली जाईल काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांच्या भावना आपण ऐकून घेतलेल्या आहेत, त्या महिलेच्या कुटुंबाला मदत मिळावी असा सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचा प्रयत्न आहे. त्या महिलेच्या कुटुंबाला मुख्यमंत्री निधीतून मदत केली जाईल.

---------

..3....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मोंडपार (तालूका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग) या गावातील**
**भैराई देवळाकडे जाण्याकरिता रस्ता बांधण्याबाबत**

**(1) * 24509 डॉ. दीपक सावंत , श्री.परशुराम उपरकर : तारांकित प्रश्न क्रमांक 10605 ला दिनांक 8 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) देवगड तालुक्यातील मोंडपार ते भैराई मंदिर हा जुना रस्ता पूर्णत: नादुरुस्त झाल्याने तेथे नविन रस्त्याला लागणारी जमिन ग्रामपंचायत मोंडपार यांनी शासनाला उपलब्ध करुन दिली आहे तसेच सदर रस्त्यांचे आराखडेही शासनाने मंजूर केले आहेत हे खरे काय,

(2) असल्यास, सदर रस्त्याचे बांधकाम सुरु करण्याच्या दृष्टीने माहे डिसेंबर, 2006 मध्ये शासनाने सर्व्हेही केला आहे हे खरे काय,

(3) असल्यास, सदर रस्त्याच्या बांधकामास मंजूरी मिळूनही प्रत्यक्ष बांधकाम अद्याप हाती न घेण्याची कारणे काय आहेत,

(4) सदर रस्त्याचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप, उपाय योजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ** : (1) देवगड तालुक्यातील मोंडपार ते भैराई मंदिर हा जुना रस्ता अस्तित्वात नाही. हा योजनाबाह्य रस्ता नव्याने बांधावा लागणार असून त्यासाठी लागणारी जमीन ग्रामपंचायत मोंडपार यांचेकडून संमतीपत्रान्वये प्राप्त झाली आहे. सदर रस्त्याचे काम रो.ह.यो. आराखड्यात मंजूर आहे.

(2) होय.

(3), (4) व (5) प्रश्नांकित रस्ता रो.ह.यो. आराखड्यात मंजूर असून सद्य:स्थितीत अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडून मंजूरी घेऊन रस्त्याचे काम सुरु करण्याचे प्रयत्न आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभपती महोदय, मला असे वाटते की, हा प्रश्न तीन-चार वेळा सभागृहामध्ये आलेला आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये या प्रश्नावर 17 मिनिटे चर्चा झ ालेली आहे, तरी देखील आज त्या रस्त्याची परिस्थिती जैसे थे आहे, हे दुर्दैव आहे. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "प्रश्नांकित रस्ता रो.ह.यो. आराखडयात मंजूर असून सद्य:स्थितीत अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे." माझा प्रश्न असा आहे की, या रस्त्यासाठी राज्य शासनाने किती निधीची तरतूद केलेली आहे आणि हा रस्ता सुरु होण्यास किती दिवस लागतील ?

..4.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 24509**.........

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, खरे म्हणजे देवगड तालुक्यातील मोंडपार ते भैराई मंदिर हा जुना रस्ता अस्तित्वात नाही. ती पायवाट आहे. मोंडपार ते भैराई मंदिर येथे जाण्यासाठी प्रमुख जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग असे दोन रस्ते उपलब्ध आहेत. ग्रामीण मार्गाचे एकूण अंतर 4.8 किलोमीटर आहे आणि आता ज्या रस्त्याची मागणी केली जाते त्या रस्त्याचे अंतर 2.2 किलोमीटर असणार आहे. या रस्त्याला रोजगार हमी योजनेच्या आराखडयामध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. या रस्त्याचे नकाशे आणि अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडून प्रशासकीय मान्यता घेतल्या नंतर निधीच्या आणि मजूरांच्या उपलब्धतेनुसार या रस्त्याचे काम पूर्ण केले जाईल.

(यानंतर श्री.गागरे ........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.बोरले 11:55

ता.प्र.क्र.24509.....

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनात तातडीने एप्रिल महिन्यापूर्वी हा रस्ता पूर्ण करण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले होते. मी असे विचारु इच्छितो की, हा रस्ता एप्रिल पूर्वी पूर्ण होणार आहे का ? जिल्हयातील रोजगार हमी योजनेमार्फत रस्त्याचे केले जाणारे काम बंद आहे की चालू आहे? काम बंद असल्यास केव्हा चालू करणार आहात ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, रस्त्याचे काम बंद असलेल्या ठिकाणाचा आढावा घेऊन ते सुरु करण्यासाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, देवगड तालुक्यामध्ये 11 रस्त्यांपैकी एक रस्त्याचे काम चालू आहे. रोजगार हमी योजनेचे अंदाजपत्रक व प्रशासकीय मंजूरी यासाठी नेहमी विलंब होतो आणि त्यामुळे काम पूर्ण होत नाही. माझा प्रश्न असा आहे की, याबाबत निश्चित काही मर्यादा शासनाने घातली आहे का ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, निधीची व मजूरांची उपलब्धता यावर कामाची प्रगती अवलंबून आहेत. या कामामध्ये दिरंगाई होत असेल तर निश्चितपणे त्याचा अभ्यास करुन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनात दिनांक 8 डिसेंबर 2005 रोजी 17 मिनिटे हा प्रश्न चालला होता. त्यावेळी मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, एप्रिलपर्यंत हया रस्त्याचे काम सुरु होईल. आश्वासन देऊन आता एक दीड वर्ष झालेले आहे. अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे असे मंत्री महोदय सांगत आहेत. याबाबत माझा स्पेशिफिक प्रश्न आहे की, किती दिवसात अंदाजपत्रक तयार होईल ? या रस्त्याचे काम केव्हा सुरु होईल ? 2 कि.मी. रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करायला फार वेळ लागत नाही, प्रशासकीय मंजूरीला फार वेळ लागत नाही. रोजगार हमी योजनेचे काम असल्यामुळे निधीच्या उपलब्धतेचा विषय राहिलेला नाही. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, तातडीने अंदाजपत्रक तयार करुन कमीत कमी किती दिवसात हा रस्ता सुरु होईल ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या रस्त्याबाबत मी सांगितले आहे की, सध्या नकाशे तयार करावयाचे आहेत, निधीची उपलब्धता व्हायची आहे. यानंतर हे काम सुरु होईल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.24509.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेमध्ये हे काम सुरु असल्याने वेगळया निधीची आवश्यकता नाही.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, तेथे दोन किलोमीटर रस्ता करावयाचा आहे. सध्या चार किलोमीटर रस्ता तेथे उपलब्ध आहे. दोन किलोमीटर रस्ता करावा अशी तेथील भाविक, ग्रामस्थ व ग्रामपंचायतीची मागणी आहे. परंतु तेथे मोठया प्रमाणावर डोंगरी भाग आहे. नवीन रस्ता तयार करावयाचा असेल तर त्यासाठी काही मानके असतात. रस्त्याच्या उताराच्या लांबीचे गणित असते. येथे 1:15 प्रमाण पाहिजे परंतु 1:6 असे प्रमाण येत आहे. याचा अर्थ असा होतो की, हा रस्ता साध्या रस्त्याच्या पध्दतीने केला तर तो अतिशय steep होणार आहे. त्यामुळे 45 मीटर डोंगर फोडून हा रस्ता करावा लागेल व त्यासाठी प्रचंड खर्च अपेक्षीत असून तो खर्च मंजूर करण्याबाबत शासनाचा विचार चालू आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, देवगड तालुक्यात रोजगार हमी योजनेमध्ये काम करण्यासाठी किती मजूरांची मागणी आहे व प्रत्यक्ष मजूरांची संख्या किती आहे ? हया रस्त्यासाठी ग्रामपंचायतीने संमतीपत्र कधी दिले आहे ? देवगड तालुक्यामध्ये रोजगार हमीची किती कामे सुरु आहेत ?.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, ग्रामपंचायतीने दिनांक 10.11.2006 रोजी संमतीपत्र दिलेले आहे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जे प्रश्न विचारले आहेत, त्याची माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे नंतर ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 28680...

डॉ. दीपक सावंत : त्यांनी मृत्यूचे कारण दिले असेल?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्यांनी मृत्यूचे कारण दिले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : या प्रकरणामध्ये सकृदर्शनी तो मेल्याचे डॉक्टरनी सांगावयास पाहिजे होते...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, कलम 302 खाली त्याला अटक करण्यात आली होती. आणि त्याने केलेला गुन्हा सिध्द झाला होता. परंतु आपसातील वैमनस्यामुळे तुरुंगातील अधिकाऱ्यांच्या मदतीने त्याचा काटा काढण्यात आला असावा अशाप्रकारचा संशय या प्रकरणामध्ये आहे...

**सभापती** : मंत्रिमहोदय, माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. फक्त व्हिसेरा प्रिझर्व्ह केला आहे, केमिकल ॲनालिसीसचा अहवाल आला नाही असे म्हणून चालणार नाही. आपण याप्रकरणी दंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करणे हा भाग वेगळा आहे. हा मृत्यू कोणत्या परिस्थितीमध्ये झालेला आहे यादृष्टीने सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्राथमिक अहवालामध्ये काय म्हटले आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, काम करीत असतांना त्याच्या छातीमध्ये दुखत होते असे सांगितले आहे...

डॉ. दीपक सावंत : त्याचा मृत्यू हार्ट अटॅकमुळे झाला काय? कशामुळे झाला?

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण सुरुवातीला त्याला दवाखान्यात नेले असे सांगितले...

Dr. Siddaram Mehtre: The opinion in respect of cause of death is reserved as the viscera is kept for chemical analysis and the pieces of organs kept for histopathology. सदरहू कैद्याचा कारागृहामध्ये मृत्यू झाल्याबद्दल दंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशी सुरु आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, प्राथमिक अहवालामध्ये मूत्यूचे कारण दिले जाते. आणि अंतिम अहवालामध्ये बाकीच्या सर्व गोष्टी स्पष्ट होतात. प्राथमिक अहवाल यायला इतके दिवस लागण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे आपल्याकडे प्राथमिक अहवाल आला काय? आला

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नसेल तर या प्रकरणामध्ये काहीतरी काळेबेरे असून त्यामध्ये तुरुंगातील अधिकारी सामील आहेत. म्हणून या प्रकरणी आपण सखोल चौकशी करणार काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी सुरुवातीला आपल्याला सांगितले आहे की, प्राथमिक अहवाल प्राप्त न झाल्यामुळे मूत्यूचे कारण समजले नाही. व्हिसेरा पाठविण्यात आला आहे, परंतु त्यांच्याकडून अहवाल येत नाही तोपर्यंत निश्चित कारण कळणार नाही.

Dr. Sunil Deshmukh: The Doctor has kept his opinion reserved. He was not sure about the cause of death. That is why he kept the viscera for chemical analysis and pieces of organs kept for examination. He will come to the conclusion of cause of death after the reports are received.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**संटो विला बंगलामालक डॉमिगो संटो या वृध्दास जीवे मारण्याच्या धमक्या देऊन बंगल्यात घुसून सामानाची मोडतोड करुन तेथे खाजगी सुरक्षारक्षक नेमल्याबाबत**

**(३) * २४६५० श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉमिंगो संटो या बांद्रा येथील ८० वर्षाच्या वृध्दास त्याचा बंगला रिकामा करण्याबाबत धमक्या देऊन त्याच्या घरात घुसून सामानाची मोडतोड करुन बंगल्याच्या बाहेर बिल्डरने अनधिकृतरित्या खाजगी सुरक्षारक्षक नेमल्याबाबतची तक्रार सदर वृध्दाने वांद्रे पोलिस ठाणे येथे दिनांक २३.१२.२००६ रोजी वा त्या सुमारास दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे याची माहिती मा. मंत्रीमहोदय देतील काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) नाही, तथापि हिंदुस्थान टाईम्सच्या पत्रकार कु.जिजाज वर्गीस यांनी डॉमिगो सॅन्टोस या ८० वर्षाच्या वृध्दास स्थानिक पोलीस स्टेशनला घेऊन त्यांनी तोंडी स्वरुपाची तक्रार दिनांक २३.१२.२००६ रोजी दिली. मात्र डॉमिगो सॅन्टोस यांनी कोणतीही लेखी स्वरुपाची तक्रार केलेली नाही.

(२) व (३) सॅन्टोस व्हीला हा बंगला श्री.डॉमिगो कायनामो डॉससॅन्टोस यांच्या मालकीचा होता. सदर बंगला त्यांनी जेरमाहेस थॉमस डिसुझा या व्यक्तीस विकला व त्याची डिड ऑफ कन्व्हेन्स करुन सब रजिस्ट्रार कडे रजिस्टर केली. त्यामुळे सदर जागा ही श्री. डिसुझा यांच्या नावावर हस्तांतरित झाली. परंतू या दोघांमध्ये त्यांच्या व्यवहारामध्ये वाद झाल्याने सॅन्टोस यांनी मा. उच्च न्यायालयात जेरमाहेस विरुध्द डीड ऑफ कन्व्हेन्सला आव्हान दिले. तसेच श्री. सॅन्टोस हे त्यांचा बंगला विकला असताना ते दुसऱ्या लोकांना पुन्हा विकत आहेत, हे लक्षात घेवून श्री. जेरमाहेस यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे डॉमिगो सॅन्टोस व इतरांविरुध्द बांद्रा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४७८/०५ (गुन्हा प्रकटीकरण शाखा, गु.र.क्र. ११७/०५) कलम ३४१, ४०८, ४२०, ४२६, ४५४, ४४७, ४६७, ४६८, ४७१, ३८३, ५०६ गुन्हा नोंद करण्यात आला. याबाबत अधिक तपास चालू आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हिंदी चित्रपट "लगे रहो मुन्नाभाई" मधील मुन्नाभाई आणि लकी सिंग बिल्डरच्या स्टाईलप्रमाणे हा प्रकार झालेला असावा. या बंगल्याचे मालक डॉमिगो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

श्री. संजय दत्त...                                        ता.प्र.क्र. २४६५०...

संटो  हे प्रख्यात फूटबॉल प्लेअर आहेत. त्यांच्या बंगल्याचे नूतनीकरण करावयाचे आहे असे म्हणून बंगल्याची सर्व कागदपत्रे घेऊन तो विकण्याकरिता परस्पर डिलिंग करण्यात आले. याबाबत त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली व नोटरीकडे ॲफिडेव्हिट केले. त्यानंतर खाजगी सुरक्षा  रक्षकांना घरामध्ये पाठवून त्यांना धमकाविण्याचा प्रकार करण्यात आला. त्यांच्या घरामधील वीज आणि पाण्याचे कनेक्शन बंद करण्यात आले. अशापध्दतीने मुंबई व ठाण्यामध्ये अनेक प्रकार घडत आहेत...

**सभापती :**  माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, प्रश्न विचारण्यापूर्वी थोडी पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे.

**सभापती :**  माननीय सदस्यांनी थेट प्रश्न विचारावा, पार्श्वभूमी सांगण्याची आवश्यकता नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 12:10

ता.प्र.क्र.24650 (पुढे सुरू.....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, स्पष्टपणे दिलेले आहे की, 80 वर्षाच्या वृध्दाने पोलीस स्टेशनला तोंडी स्वरुपाची तक्रार दिली. माझा प्रश्न असा आहे की, कोणत्याही घटनेची पहिली नोंद एफआयआरमध्ये घेतली जाते. मग ती तोडी तक्रार असो, की लेखी तक्रार असो. त्याप्रमाणे तोंडी तक्रारीची नोंद एफआयआरमध्ये घेण्यात आली आहे काय ? त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली ? दुसरा प्रश्न असा आहे की, घरात घुसून घराचा ताबा घेण्याइतके अधिकार बिल्डरला प्राप्त झालेले आहेत काय ? त्या संबंधाने बिल्डरवर पोलिसांनी कोणती कारवाई केली आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : संटो व्हीला हा बंगला श्री.डॉमिगो सँटो यांच्या मालकीचा होता त्यांनी सदरचा बंगला जेरमाहेस डिसुझा या व्यक्तीस सेल डीड करून विकला होता. त्यासंबंधात त्यांनी रजिस्ट्रारकडे रजिस्ट्रेशनदेखील केलेले आहे. श्री. सेन्टोस हे हायकोर्टामध्ये गेले असता हायकोर्टाने स्वखुषीने एकदा खत करून दिलेले आहे, त्यामुळे हायकोर्टाने डिसुझा यांच्या बाजूने निकाल दिला. त्यानंतर श्री. सँटो हे सुप्रीम कोर्टात गेले सुप्रीम कोर्टाने त्यांचा अर्ज फेटाळला. त्यामुळे डिसुझा यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

श्री.संजय दत्त : बिल्डर गुंड पाठवून याबाबतची अंमलबजावणी करू शकतात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : गुंड पाठविलेले नव्हते. या वृध्दांबरोबर ॲग्रीमेंट करण्यात आलेले होते. बिल्डींग पूर्ण झाल्यानंतर त्या वृध्दास प्लॅट द्यायचा आहे, तोपर्यन्त बाहेर न रहाता तेथेच त्यांना रहाण्यास जागा दिली होती. विकलेली जागा कमी किंमतीने विकली असे वाटल्यावरून ते वृध्द गृहस्थ कोर्टामध्ये गेले. तशी तक्रार नोंदविलेली आहे, असे झालेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : वृध्द नागरिक जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये येतात, त्यावेळेस त्यांना सन्मानाने वागणूक दिली पाहिजे. त्या वृध्द नागरिकाने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली परंतु त्यांनी प्रत्यक्षात लेखी स्वरुपामध्ये तक्रार केली नाही म्हणून त्यांची तक्रार नोंदविली जात नाही हे पोलीस स्टेशनला शोभून दिसते काय ? पोलीस स्टेशनमधील पोलिसांनी आपली जबाबदारी का पार पाडली नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : वृध्द गृहस्थाने पोलीस स्टेशनमध्ये तोंडी तक्रार दिनांक 27-12-2006 रोजी केली, त्याबाबतची एन.सी.नोंद केलेली आहे.

-----

17-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) J-2

SKK/ SBT/ MHM/

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

## काळा चौकी परेल येथील अभ्युदय नगर वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत

(4) * 29246 **श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , श्री. अनिल परब** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अभ्युदय नगर काळाचौकी परेल येथील दोन प्लॉटचा विकास व तेथे मोठ्या स्कायलार्क हायराईज टॉवर बांधण्याच्या प्रस्तावावर या 500 कोटी किंमतीच्या जमिनीच्या किंमतीवर व हे प्लॉट आपल्याला मिळावेत म्हणून बांधकाम व्यावसायिक श्रीपती आक्रेड व दुसरे बांधकाम व्यावसायिक रमाकांत शाह यांच्या मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक चढाओढी पोटी या दोन्ही बिल्डर्सनी आपआपल्या प्रतिस्पर्धींना दूर करण्यासाठी सुमारे 50 लाख रुपयांची सुपारी गुंडांना दिल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी दिनांक 25 फेब्रुवारी, 2007 राजी वा त्या सुमारास काही गुंडांना अटक केली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अशा प्रकारे प्रतिस्पर्धी व्यावसायिकांमध्ये एकमेकांचा काटा काढण्याची प्रवृत्ती वाढ रोखण्यासाठी मुंबई पोलिसांनी कारवाई सुरु केली आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, काळा चौकीच्या वरील दोन 500 कोटी रुपयांचा प्लॉटबाबत पोलिसांनी कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय, श्रीपती बिल्डरचे मालक आर.आर.चतुर्वेदी यांनी विजय ग्रुपचे रश्मिकांत शहा यांना ठार मारण्यासाठी सुपारी दिली होती. याप्रकरणी पाच गुंडांना अटक करण्यात आली, हे खरे आहे.

(2) होय, मालमत्ताविषयक गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी विशेष पोलीस पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

(3) सदर प्रकरणी काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई यांनी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेतलेली असून सदर ठिकाणी फिरती गस्त, बीट मार्शल तसेच साध्या गणवेषातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना सतर्क राहण्याबाबत सूचना निर्गमीत केल्या आहेत.

श्री.अरविंद सावंत : आता भयानक प्रकार सुरू केलेला आहे. काळा चौकी येथील काम श्री. रश्मीकांत शहा यांनी पाच वर्षापूर्वी घेतले होते, हे खरे आहे काय ? हे काम पूर्णत्वास जात नाही म्हणून तेथील नागरिकांनी हे काम श्रीपती आक्रेड यांना द्यावे अशी मागणी केली होती हे खरे आहे काय ? त्याचबरोबर श्रीपती आक्रेडचे मालक श्री.चतुर्वेदी यांना यामध्ये गुंतविण्यात आले आहे, हे खरे आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : या जागेवर शहा आणि श्री.चतुर्वेदी या दोघेही म्हाडाकडून आपल्याला जागा मिळावी प्रयत्न करीत होते. तेथील नागरिकांना 400 चौ.फू.ची जागा द्यायची की 500 चौ.फू.जागा द्यायची याबाबतीत दोघांमध्ये रस्सीखेच चालू होती. पोलिसांना खबर मिळाली की, श्री.शहा यांना मारण्यासाठी मारेकरी येणार आहेत. त्यामुळे पोलिसांनी सापळा रचला आणि चार आरोपींना पकडले. आरोपींनी श्री.उदयन महाराज यांनी सुपारी दिल्याचे सांगितले म्हणून त्यांनाही पकडण्यात आले. त्यांच्या जबाबामध्ये श्री.चतुर्वेदी यांनी सुपारी दिल्याचे आढळून आले. त्याबाबतची चौकशी चालू आहे.

ॲड.अनिल परब : उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, आरोपींना अटक केली. उदयन महाराज यांनाही अटक करण्यात आले.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 29246 ..... ॲड. अनिल परब ...

श्री. चतुर्वेदी यांना अजून अटक झालेली आहे की नाही हे माहीत नाही. त्या दोन बिल्डरचा पैशाचा व्यवहार फिसकटला म्हणून पोलिसांच्या मदतीने एकमेकांना अडकविण्याचे कारस्थान चालू आहे. श्री. चतुर्वेदी यांना अटक झाली आहे काय ? श्री. उदयन महाराज यांना अटक झालेली आहे काय ? सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, अशा प्रकारे जे सुपारी देऊ लागले आहेत त्यांच्यामध्ये भीती निर्माण करण्यासाठी शासन आपला दबदबा निर्माण करील काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री. राजेंद्र चतुर्वेदी यांना 15.3.2007 रोजी 7.40 वाजता अटक करण्यात आली. आरोपी क्रमांक 6 श्री. उदयन महाराज उर्फ उदयसिंग प्रतापराव चव्हाण यांना 5.4.2007 रोजी 12.40 वाजता अटक करण्यात आली. हे सर्व आरोपी जेल कस्टडीमध्ये आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी सांगितल्याप्रमाणे एस.आर.ए. योजनेअंतर्गत हे काम होते. त्याची सी.आय.डी. चौकशी करणे आवश्यक आहे. याचे कारण असे की, दोन बिल्डर आपापसात भांडून एकमेकांना मारण्यासाठी 30-30 लाख रुपयांची सुपारी देत असतील तर मुंबईमध्ये भयानक प्रश्न निर्माण होतील. वर्तमानपत्रातून अशा बातम्या येत आहेत की, एस.आर.ए. योजनेमध्ये पोलीस अधिकारी आपला काळा पैसा गुंतवू लागले आहेत. म्हणून या सगळ्या प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करुन खरोखरच यामध्ये कोणाला गुंतविण्यात आले आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. हे कायद्याचे राज्य आहे. त्यामुळे याची सी.आय.डी. चौकशी करणे आवश्यक आहे. नाही तर मुंबई शहरामध्ये भयानक प्रश्न निर्माण होतील. शासन याची सी.आय.डी. चौकशी करणार काय ? अनेक पोलीस अधिकाऱ्यांनी यामध्ये पैसे गुंतविलेले आहेत अशा बातम्या येत आहेत. त्या ठिकाणी सी.आय.डी. चौकशी करणे आवश्यक आहे. शासन सी.आय.डी.मार्फत चौकशी शासन करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या गुन्ह्यामधील जे जे आरोपी आहेत त्या सगळ्यांना पकडण्यात आले आहे. त्यांना जेलमध्ये कस्टडीत घातलेले आहे. यामध्ये सी.आय.डी. चौकशीची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

ता. प्र. क्र. 29246 ......

**सभापती** : मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, हा जो विशिष्ट गुन्हा झालेला आहे त्याच्या पाठीमागे काही कटकारस्थान करुन सुपारी देऊन काहींना मारण्याचा जो प्रकार झालेला आहे त्यामुळे हे प्रकरण अत्यंत महत्वाचे आहे. हे प्रकरण गुंतागुंतीचे आहे. सुदैवाने यातील काही गुन्हेगारांना पोलिसांनी अटक केली त्याबद्दल धन्यवाद. परंतु याबाबतीत एकंदरीत ऑर्गनाईज्ड क्राईमचा भाग असेल तर तो खणून काढता आला पाहिजे. त्यादृष्टीने उच्चस्तरीय चौकशी करणार काय अशा प्रकारचा प्रश्न आहे. मी असे सांगेन की, याबाबतीत शासनाने उच्चस्तरीय चौकशी करावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, याबाबतीत उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : त्यांना मोक्का कायदा का लावला नाही ? मोक्का कायद्यान्वये त्यांना अटक करण्याची आवश्यकता आहे. कारण यामध्ये ऑर्गनाईज्ड क्राईम आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : जे आरोपी आहेत त्यांच्यावर अगोदरचे काही गुन्हे आहेत काय हे तपासले जाईल आणि मोक्का कायद्याच्या अंतर्गत बसत असतील तर मोक्का कायदा लावण्याच्या बाबतीत विचार केला जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण अतिशय मार्मिक भाष्य करुन या ठिकाणी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले. उच्चस्तरीय म्हणजे सी.आय.डी. चौकशी करणार काय ? सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन, यातील मर्म लक्षात घेऊन आपण आदेश दिले. याबाबत शासन सी.आय.डी. चौकशी करणार काय ? उच्चस्तरीय म्हणजे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : उच्चस्तरीय म्हणजे आता त्या ठिकाणी जे अधिकारी तपास करीत आहेत त्यांच्यापेक्षा उच्च अधिकाऱ्यामार्फत तपास करण्यात येईल.

**सभापती** : मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या गुन्ह्यातील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली. त्यांचे काम चांगले आहे. परंतु एकूण असे दिसते की, यामध्ये ऑर्गनाईज्ड क्राईम असण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने सी.आय.डी. क्राईम ब्रँच किंवा स्टेट सी.आय.डी. यांच्याकडून उच्चस्तरीय चौकशी व्हावी अशी माझी सूचना आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

-----

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:20

**मुंबई व ठाणे शहरातील शोरुम्सवर दरोडे टाकणाऱ्या एका टोळीला पोलिसांनी अटक केल्याबाबत**

**(५) * २४९४९ श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्रीमती सुधा जोशी , श्री. रमेश निकोसे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे शहरातील शोरुम्सवर दरोडे टाकणाऱ्या एका टोळीस दिनांक ०१ जानेवारी २००७ रोजी वा त्यासुमारास ठाणे पोलिसांनी अटक केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचा तपशील काय व तद्नुसार गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर. पाटील यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : डिसेंबर 2006 मध्ये ठाणे पोलिसांनी 12 दरोडेखोराना अटक केलेली आहे. या दरोडेखोरांनी रेमण्ड, हुण्डाई, टाटा फॉर्च्युन आणि मारुती या कंपन्यांच्या शोरुम्सवर गेले वर्षभर दरोडे टाकले होते. यासंदर्भात वागळे इस्टेस्ट पोलीस ठाणे आणि नौपाडा पोलीस ठाणे व वर्तक नगर पोलीस ठाणे या ठिकाणी दाखल केलेल्या एफआयआरच्या प्रती माझ्याकडे आहेत. ठाणे जिल्ह्यातील वाढत्या दरोड्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : 1 जानेवारी 2007च्या सुमारास अशा प्रकारची घटना घडल्याची नोंद पोलीस स्टेशनला नाही. त्या सुमारास कोणालाही अटक झलेली नाही.

श्रीमती सुधा जोशी : प्रश्नोत्तराच्या छापील उत्तरामध्ये " 1) हे खरे नाही, 2) प्रश्न उद्‌भवत नाही." अशी उत्तरे देण्यात आलेली आहेत. त्या दिवशी किंवा त्या सुमारास दरोडा पडला नसला तरी अलिकडे पेट्रोलपंप, शोरुम्स, सोन्या-चांदीची दुकाने यांच्यावर दरोडे पडण्याचे प्रमाण खूप वाढलेले आहे. दरोडे खोर नवनवीन पध्दतींचा अवलंब करुन दरोडे घालत आहेत. प्रत्येक टोळीची दरोडे घालण्याची विशिष्ट पध्दत असते. अशा पध्दतींचा अभ्यास करण्यासाठी पोलीस खात्यात स्वतंत्र यंत्रणा आहे काय ? मुंबई आणि ठाणे या परिसरामध्ये गेल्या वर्षभरामध्ये किती दरोडे पडले ? किती गुन्ह्यांचा शोध लागला आणि किती गुन्ह्यांचा तपास अजून चालू आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 24949...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : दरोडा पडल्यानंतर दरोडखोर सापडे पर्यन्त स्पेशल टीमकडून तपास करण्यात येतो. एकूण किती दरोडे पडले, कितींचा शोध लागला आणि कितींचा तपास बाकी आहे, याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

---

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रत्नागिरी येथील पोलीस गृहनिर्माण प्रकल्प**

**(६) * २९२४७ श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी शहरात पोलीसांना घरे उपलब्ध व्हावीत म्हणून शासनाने तेथे पोलिस गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत घरे बांधण्याच्या प्रस्तावाला शासनाने मंजूरी दिली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी येथे पोलीसांना घरे बांधण्याचे काम सुरु झाले असून निधी अभावी ते अपूर्ण अवस्थेत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस गृहनिर्माण उर्वरित निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांच्या अधिपत्याखालील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी १८६ निवासस्थाने बांधण्याच्या कामास महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २५ फेब्रुवारी, २००५ रोजी झालेल्या १५७ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) सदर बांधकाम दिनांक १३ एप्रिल, २००५ रोजी सुरु झाले आहे. तथापि, कंत्राटदाराने काम बंद केल्यामुळे सदर बांधकाम अपूर्णावस्थेत आहे. नवीन कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) सदर बांधकामासाठी रु.९,६६,७०,२७२/- इतका खर्च अपेक्षित असून रु.४,५०,००,०००/- एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. बांधकामाच्य प्रगतीनुसार उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवली आहे.

श्री. परशुराम उपरकर : पोलीस गृहनिर्माण प्रकल्पाचे काम 13 एप्रिल 2005 रोजी सुरु होऊन ते काम नंतर बंद पडले. हे काम पूर्ण करण्यासाठी नवीन कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया केव्हा पूर्ण होईल ? पोलीस गृहनिर्माण प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरुवात होईल ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : रत्नागिरी येथील पोलीस गृहनिर्माण प्रकल्पाच्या बांधकामाचे कंत्राट 5.2.2007 रोजी रद्द करण्यात आले. या प्रकल्पाचे अडीच कोटीचे काम झालेले आहे. कंत्राटदाराने काम केले नाही म्हणून त्याचे कंत्राट रद्द करण्यात आले. मे. साईनाथ इंटरप्राईझ, नाशिक आणि दिगंबर पिंगळे, नाशिक या कंत्राटदारांचा कालावधी 23.11.2006 पर्यन्त होता.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ ता.प्र.क्र.29247........... 12:25

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या कामाची सुरुवात दि.13.4.2005 रोजी झाल्याचे उत्तरामध्ये म्हटले आहे. कंत्राटदाराने काम अपूर्णावस्थेत का सोडले? बांधकामाच्या प्रगतीनुसार उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची तजवीज केली आहे म्हणजे काय केले? बजेटमध्ये तरतूद केली आहे का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मे.साईनाथ एंटरप्रायझेस, नाशिक यांना ठेका देण्यात आला होता. काम पूर्ण करण्याची मुदत 18 महिन्यांची होती. दर 15 दिवसांनी कामाच्या प्रगतीप्रमाणे पेमेंट केले जात होते. कंत्राटदाराने केलेल्या कामानुसार 2.5 कोटी रुपये त्यांना देण्यात आले. पुढे कामाची प्रगती दिसून आली नाही. 15 दिवसांची मुदत दिल्यानंतर त्यांना दोन वेळा नोटीसही देण्यात आली होती. त्यांनी स्वत:च विनंती केली की, मला आणखी 15 दिवसांची मुदत द्यावी व प्रत्यक्ष साईटवर व्हिजिट करुन कामामध्ये प्रगती दिसून आली नाही तर माझा ठेका रद्द करण्यात यावा. त्यानुसार त्यांना 15 दिवसांची मुदत देऊनही त्यांनी काम सुरु केले नाही. या कामासाठी निधीची अडचण नाही. 4.5 कोटी रुपये शिल्लक आहेत. आणखी निधीची आवश्यकता भासली तर निधी उपलब्ध होणार आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, कंत्राटदाराने काम अपूर्ण ठेवले. या कामाची सद्यस्थिती काय आहे? कंत्राटदाराला वारंवार विनंती करुन, नोटीस देऊनही त्याने काम पूर्ण केले नाही अशा कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट केले जाईल काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर कंत्राट रद्द केल्यामुळे नवीन कंत्राटदाराची नेमणूक करण्याची प्रक्रिया महामंडळाने दि.13.2.07 रोजी सुरु केलेली आहे. हे काम अर्धवट सोडून गेल्यामुळे पूर्वीच्या कंत्राटदाराचे नाव ब्लॅकलिस्टमध्ये घालण्यात येईल. सध्या 2.5 कोटी रुपयांचे काम पूर्ण झाले असून बांधकामाचा एकूण खर्च 8.33 कोटी रुपये आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 2005 च्या एप्रिलमध्ये काम सुरु झाले. सध्या 2007 या वर्षाचा एप्रिल महिना सुरु आहे. हे काम एव्हाना पूर्ण होणे अपेक्षित होते. 4.5 कोटी रुपये उपलब्ध झाले असे म्हटले आहे. हा निधी केव्हा दिला? त्यापैकी 2.5 कोटी रुपये खर्च झाले ते कोणत्या काळात खर्च झाले? उर्वरित निधी लॅप्स झाला नाही का? झाला असेल तर पुरवणी मागण्यांमध्ये हा खर्च का दिसून आलेला नाही? निधी लॅप्स झाला नसेल तर का होऊ शकला नाही? असे कोणते हेड आहे ज्या हेडमध्ये केलेली तरतूद लॅप्स होत नाही?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29247...........

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण कल्याण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक 25.2.2005 रोजी झालेल्या 157 व्या बैठकीत या कामाच्या रु.9,66,70,272/-च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या आधुनिकीकरणातून आणि राज्य शासनाच्या मदतीतून 450 लक्ष रुपये महामंडळाला मंजूर करण्यात आले. टाईप 2 प्रकारची 156 निवासस्थाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी, टाईप 3 प्रकारची 26 निवासस्थाने पोलीस अधिकाऱ्यांसाठी, टाईप 4 प्रकारची 4 निवासस्थाने पोलीस अधिकाऱ्यांसाठी बांधण्यात येत आहेत. एकूण 186 निवासस्थाने बांधली जाणार आहेत.

श्री.दिवाकर रावते : निवासस्थानांचे चटई क्षेत्रफळ किती आहे?

**सभापती** : माहिती उपलब्ध असेल तर द्यावी, अन्यथा पटलावर ठेवण्यात यावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा पोलिसांच्या गृहनिर्माणाचा प्रश्न आहे. पोलिसांना राहायला घरे नाहीत अशा प्रकारची टीका नेहमी केली जाते. दोन वर्षापूर्वी 9 कोटी रुपये पोलीस गृहनिर्माण महामंडळाला या कामासाठी मंजूर करण्यात आले. ज्या कंत्राटदाराला काम देण्यात आले त्याने काम अर्धवट सोडले. काम पूर्ण केले नाही. त्याने केलेल्या कामासाठी 2.5 कोटी रुपये देण्यात आले असे मंत्रीमहोदयांनी उत्तरात सांगितले. या कामासाठी 4.5 कोटी रुपयांचा निधी शिल्लक आहे. आता हे काम कोणत्या नवीन कंत्राटदारास दिले आहे? काम पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा घालण्यात आली आहे का? पूर्वीच्या कंत्राटदाराला किती कालमर्यादा घालून दिली होती? दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्याबद्दल त्या कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात आली? पोलिसांसाठी घरे बांधण्याचे हे काम असून शासन या कामाकडे दुर्लक्ष का करीत आहे?

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 29247** .........

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पहिल्या ठेकेदाराचे नाव मे. साईनाथ एंटर प्रायजेस, नाशिक यांना हे काम करण्यास 18 महिन्याची मुदत दिली होती तसेच या कामावर आतापर्यंत 2.5 कोटी रुपये खर्च झाले असून त्यांनी वेळेत काम पूर्ण न केल्यानमुळे त्यांचे टेंडर रद्द करण्यात आले. या कामाच्या संदर्भात आता नवीन टेंडरची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे काम वेळेत पूर्ण झालेले नाही. काम पूर्ण न झ ाल्यासमुळे या कामाचे 2 कोटी रुपये महामंडळाकडे पडून आहेत. त्यामुळे या दोन कोटी रुपयांच्या रक्कमेवर अजून दोन-चार घरे सहज बांधता येतील. त्यामुळे या रक्कमेचा विनियोग आपण कसा करणार आहात?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हाऊसिंग महामंडळाकडे यासंदर्भात 2 कोटी रुपये शिल्लक असून हे पैसे त्याच कामासाठी वापरण्यात येणार आहेत.

---------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथील एका युवतीची छेडछाड व तिच्या आईला मारहाण केल्याबाबत**

**(7) * 25226 श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथील एका युवतीची छेडछाड व तिच्या आईला मारहाण केल्याप्रकरणी सप्टेंबर, 2006 पासून आरोपीवर कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने, सदर युवती व तिच्या आईने इंदापूर पोलीस स्टेशन समोर दिनांक 12 डिसेंबर, 2006 पासून बेमूदत आंदोलनास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी कारवाई न करण्यामागील कारणे काय आहेत,

(3) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधित आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(4) अद्याप, या प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे श्री. आर.आर.पाटील यांच्या करिता** : (1) व (2) होय, दिनांक 10.12.2006 रोजी फिर्याद दिली असता ठाणे अंमलदाराने गुन्हा नोंदविला नाही म्हणून फिर्यादींनी आंदोलन केले.

(2) फिर्यादी व तिची आई यांनी सदर प्रकरणी तक्रार घेणेबाबत पोलीस कर्मचारी व महिला दक्षता समित्या यांना पाठवून तसेच पोस्टाने पत्र व्यवहार करुनही त्यांनी सहकार्य न केल्यामुळे तात्काळ कारवाई झाली नाही.

(3) व (4) प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 10.1.2007 रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, पुणे गु.र.नं. 8/2007 अनुसूचित जाती / जमाती (अ.प्र.) कायदा कलम 3 (1) ड भा.द.वि. कलम 341, 509, 504, 506, 34 अन्वये 2 आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील आरोपींना अटक केले. आरोपी जामिनावर मुक्त झाल्यानंतर त्यांचेवर सीआरपीसी कलम 107 अन्वये प्रतिबंधक कारवाई केलेली आहे. तसेच आरोपींविरुध्द दिनांक 8.2.2007 रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये योग्य वेळी तक्रार न घेतल्याने ब-याच वेळा स्त्रियांवर ॲसीड फेकण्याचे तसेच त्यांच्या हत्या होण्याचे प्रकार अनेक ठिकाणी घडत असतात. या विषयाच्या संदर्भात प्रश्न निर्माण होतो की, या घटनेच्या संदर्भात मुलगी आणि तिची आई यांनी सप्टेंबर, 2006 मध्ये तक्रार केली होती परंतु सदर तक्रार नोंदवली गेली नाही. ही तक्रार पोलिसांनी नोंदवली नसल्यामुळे त्यांना बेमुदत आंदोलन करावे लागले आहे. त्यामुळे यासंदर्भात माझ ा प्रश्न असा आहे की, सदर तक्रार का नोंदविण्यात आली नाही? ज्या अधिका-याने सदर तक्रार नोंदवली नाही त्या अधिका-यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे?

....3



**ता.प्र.क्र. 25226 पुढे सुरु.......**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर प्रकरणाच्या संदर्भात मुलगी आणि तिची आई पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यास गेले होते. त्यावेळेस पोलीस स्टेशनमध्ये कॉन्स्टेबल उपस्थित होते. ॲट्रॉसीटीचा गुन्हा नोंद करण्यात यावा अशी सदर महिलांनी मागणी केल्यामुळे तेथील कॉन्स्टेबलने सांगितले की, आमचे वरिष्ठ अधिकारी गस्ती निमित्त बाहेर गेलेले आहेत, आम्ही त्यांना बोलावतो, अधिकारी पाच मिनिटात आल्यानंतर आपली तक्रार नोंदवून घेतो असे सांगितले परंतु त्यावेळेस या महिलांनी त्यांना आम्ही तुम्हाला बघून घेतो, आमची तक्रार आताच नोंदवून घ्या, नाही तर आम्हाला लागेल ते आम्ही करु असे, बोलून त्या महिला निघून गेल्या. सदर पोलीस स्टेशनचे इनचार्ज आल्यानंतर महिला ज्या ठिकाणी उपोषणाला बसल्या होत्या त्या ठिकाणी जाऊन त्यांना सांगितले की, तुमची ॲट्रॉसिटीची तक्रार नोंदवून घेतो परंतु तरी सुध्दा या महिलांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर हा गुन्हा क्राईम ब्रँचकडे नोंदवण्यात आला.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सदर घटना सप्टेंबर-डिसेंबर मध्ये घडलेली आहे गुन्हा घडून झाल्यानंतर ब-याच दिवसांनी सदर घटनेची तक्रार नोंदवून घेण्यात आली. सदर घटनेचा गुन्हा नोंद करण्यास बराच कालावधी गेलेला आहे त्यामुळे संबंधित अंमलदारावर आपण कोणती कारवाई केलेली आहे वा करण्यात येणार आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर घटनेच्या संदर्भात ठाणे अंमलदाराने तक्रार नोंद करुन घेत नाही असे म्हटलेले नाही. ॲट्रॉसिटीचा गुन्हा पोलीस अधिकारी आल्यानंतर ॲट्रॉसिटीचा गुन्हा नोंदवतो असे सांगितले होते. परंतु तक्रार करणा-या महिला पाच मिनिटे सुध्दा थांबल्या नाहीत. त्या उपोषणास बसल्या. अधिकारी पाच मिनिटात आल्यानंतर सदर अधिका-याने संबंधितांशी संपर्क साधला तरी त्यांनी त्यास साद दिली नाही त्यामुळे या गुन्हयांची नंतर एसीपी क्राईम ब्रँचकडे गुन्हा नोंदविण्यात आला.

श्री. उषा दराडे : सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये वरिष्ठ अधिकारी नसेल तर ॲट्रॉसिटीचा गुन्हा नोंदविला जात नाही अशी सीआरपीसी प्रोव्हीजन आहे काय, सीआरपीसी कलम 154 प्रमाणे तक्रार अर्ज का लिहून घेतला नाही? पोलीस अधिका-यास या नियमाचे ज्ञान नव्हते काय ? सदर तक्रारीची नोंद ओरल एंट्री डायरीत केली होती काय? तसेच या घटनेच्या संदर्भात स्टेटमेंट घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे काय ?

....4

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर घटनेच्या संदर्भात संबंधितांना ॲट्रॉसिटी ॲक्ट खाली गुन्हा नोंदवायचा होता. त्यावेळेस पोलीस स्टेशनमध्ये कॉन्स्टेबल उपस्थित होते त्यांनी सांगितले आमचे वरिष्ठ अधिकारी गस्तीवर गेलेले आहेत त्यांना आम्ही बोलावण्यास जातो. वरिष्ठ अधिकारी पाच मिनिटात या ठिकाणी उपस्थित होतील. वरिष्ठ अधिकारी आल्यानंतर आपली तक्रार नोंदवून घेण्यात येईल अशी विनंती केली परंतु सदर महिलांनी आमची तक्रार आताच नोंदवून घ्या, आम्ही तुमच्याकडे बघून घेतो असे सांगून त्या उपोषणाला बसल्या. थोडयाच वेळात वरिष्ठ अधिकारी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाले. त्यांनी उपोषणाच्या ठिकाणी जाऊन या महिलांची भेट घेतली व सदर गुन्हा नोंदवण्याची विनंती केली तरी सुध्दा सदर महिला गुन्हा नोंदवण्यासाठी आल्या नाहीत. नंतर हा गुन्हा क्राईम ब्रँचकडे नोंदविण्यात आलेला आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराच्या 1 ते 17 याद्या सभागृहासमोर ठेवणे

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांच्या 1 ते 17 याद्या सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांच्या 1 ते 17 याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

( प्रेस: येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नांबाबतची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मौजे ता.तांबळडे ( ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ) या गावात तसेच पनवेल ( जि.रायगड ) येथे माकडांनी धुमाकूळ घातल्याबाबत" या विषयावरील कर्नल सुधीर सावंत, सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, धनाजी साठे, राजेंद्र तेली, सुधाकर गणगणे, वि.प.स. यांच्या दिनांक 17 मार्च 2007 रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 25663 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे अधिक माहिती छापावी. )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च 2006 रोजी संपलेल्या वर्षाचा ( वाणिज्यिक ) अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** :भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-------------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन 2005-2006 या वर्षाचा (1) (अ) विनियोजन लेखा व (ब) वित्तीय लेखा, (2) नागरी अहवाल, (3) नागरी ( महाराष्ट्रातील पूर पूर्व तयारी व प्रतिसाद यांचे कार्यसिध्दी लेखापरीक्षण ) अहवाल व (4) महसुली जमा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा (1) (अ) विनियोजन लेखा व (ब) वित्तीय लेखा, (2) नागरी अहवाल, (3) नागरी ( महाराष्ट्रातील पूर पूर्व तयारी व प्रतिसाद यांचे कार्यसिध्दी लेखापरीक्षण) अहवाल व (4) महसुली अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

-------------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मासिक निधी विवरणपत्र सन 2007-2008 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : मासिक निधी विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

---------------

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: माहितीच्या मुद्याबाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृहराज्यमंत्री ) : मी आपल्या अनुमतीने " नंदूरबार जिल्ह्यातील बाहेरपुरा येथील एका गर्भवती महिलेस हुंड्यासाठी तिच्या पतीसह जाळण्याची घडलेली घटना" या विषयावरील सर्वश्री जयंत प्र.पाटील व इतर विधानपरिषद सदस्य यांनी दिलेल्या माहितीच्या मुद्याबाबत दिनांक 1 एप्रिल, 2005 रोजी झालेल्या चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार सभागृहासमोर अधिक माहिती ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस :येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " श्री.अनिस अहमद, मंत्री यांनी एका दलित व्यक्तीला जातीवाचक शिव्या दिल्याबद्दल" या विषयावरील सर्वश्री अरविंद सावंत व इतर विधानपरिषद सदस्य यांनी दिलेल्या माहितीच्या मुद्याबाबत दिनांक 16 मार्च 2006 रोजी झ ाालेल्या चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार सभागृहासमोर अधिक माहिती ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस :येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : विधानपरिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

प्रधान सचिव : (अ) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली.

सन 2006 चे वि.स.वि.क्र.78- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना विधेयक, 2006.

(ब) खालील विधेयकाला राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2007 चे वि.स.वि.क्र.-9 महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियम ) (सुधारणा) विधेयक -2007.

(2) सन 2007 चे वि.स.वि.क्र.15- महाराष्ट्र (पुरवणी ) विनियोजन विधेयक 2007

(3) सन 2007 चे वि.स.वि.क्र.16 महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक 2007.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

**सभापती** : आज औचित्याचे मुद्दे घेण्यात येणार नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, दिनांक 14 मार्च रोजी मी प्रोटोकॉल संबंधी औचित्याच्या मुद्दा उपस्थित केला होती. त्यावेळी आपण यासंबंधीची माहिती पंधरा दिवसात सभागृहाला देण्यात यावी असे निदेश दिले होते. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे परंतु अद्यापपर्यंत आम्हाला प्रोटोकॉल संबंधीची माहिती मिळालेली नाही.

**सभापती** : अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना माहिती अवगत करण्यात येईल.

**नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण आहे. या प्रस्तावावर अजून अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्याशिवाय मंत्रिमहोदयांचे उत्तर व्हावयाचे आहे. आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाज पाहता हा प्रस्ताव चर्चेला येईल किंवा.....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांना सांगू इच्छितो की, आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर त्यांनी दिलेला प्रस्ताव कामकाजाच्या शेवटी दाखविण्यात आलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण आहे हे मला माहीत आहे. परंतु कामकाजपत्रिकेवरील अन्य कामकाज पूर्ण होण्यास किती वेळ लागेल हे मला याक्षणी सांगता येणार नाही.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्हाला अजून नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदने मिळालेली नाहीत.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सेझच्या संदर्भात अडीच तासाची चर्चा माननीय उपसभापती महोदयांनी मान्य केली होती. परंतु दुर्दैवाने ती अजूनही चर्चेला आलेली नाही. आज रायगड जिल्हयातील शेतकरी भयभीत झालेले आहेत. याठिकाणी शासनाने जाहीर केले की, आम्ही जमिनीच्या भू-संपादनाची प्रक्रिया थांबवत आहोत. परंतु अजूनही सरकारी अधिकारी जबरदस्तीने शेतकऱ्यांकडून जमिनी घेत आहेत. तरीही अजून यासंदर्भात सभागृहात चर्चा झालेली नाही.

**सभापती** : सेझच्यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सदनामध्ये भाष्य केलेले आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे यासंबंधी अडीच तासाची चर्चा होणे आवश्यक होते. परंतु आज ती होण्याची शक्यता नाही. पुढच्या अधिवेशनामध्ये आपण यावर प्राधान्याने चर्चा घेऊ.

मला असे वाटते की, 93 च्या सूचनासंदर्भातील निवेदने वितरित करण्यासाठी अजून वेळ लागण्याची शक्यता आहे, त्यामुळे अगोदर लक्षवेधी सूचना चर्चेस घेऊ व त्यानंतर 93 ची निवेदन घेऊ.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, काल एका 93 च्या सूचनेवरील निवेदनावर चर्चा राहिली होती. आता याठिकाणी माननीय मंत्री महोदय, श्री.हसन मुश्रीफ सभागृहात उपस्थित आहेत, तेही याबाबतीत तयारी करुन आलेले आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे त्यामुळे आपण ही सूचना पहिल्यांदा चर्चेस घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, आजची कामकाजपत्रिका पाहिल्यानंतर असे वाटते की, मी व सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी दिलेला म.वि.प.नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा आज पूर्ण होणार नाही. त्यामुळे पुढच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सदरच्या प्रस्तावावर चर्चा व्हावी.

..2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :  सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा प्रस्ताव अतिशय महत्वाचा असून या प्रस्तावावरील चर्चा अजून अपूर्ण आहे.  तसेच, अर्धा-तासाच्या चर्चा आणि अशासकीय कामकाजही अपूर्ण आहे ते पुढील अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयांमध्ये घेण्याच्या दृष्टीने आपण पाहू.

श्री.वसंतराव खोटरे :  सभापती महोदय, निवेदन.....

( सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** :  सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी कृपया जागेवर बसावे.  आपण प्रत्येक जण जर निवेदनांची आठवण करुन देणार असाल तर सर्वच सन्माननीय सदस्यांनी अर्धा मिनिट जागेवर उभे रहावे.

श्री.प्रकाश शेंडगे :  सभापती महोदय, आंब्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय धोरण जाहीर करणार होते.  याबाबतीतची माहिती संबंधित मंत्री महोदयांनी सदनाला आज दिली पाहिजे.

**सभापती** :  संबंधित मंत्री महोदय ही माहिती देतील.  आता याठिकाणी माझ्याकडे नियम 93 अन्वये सूचनांची जवळपास 4 निवेदने आलेली आहेत.  परंतु मला असे वाटते की, सर्व निवेदने आल्यानंतरच आपण त्यावर चर्चा करु.   यासाठी मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 44 मिनिटांनी, 10 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

----------

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**'महाराष्ट्र टाईम्स' व 'सकाळ' या वृत्तपत्रात कामगार नेते, श्री.शरद राव यांनी माननीय उपसभापती यांच्यावर केलेली टीका**

**सभापती** : सन्माननीय उपसभापतींच्या अनुषंगाने वर्तमानपत्रामध्ये जी टीकाटिप्पणी श्री.शरद राव यांनी केली आहे, त्याबाबत मी या ठिकाणी माझा निर्णय सांगतो.

यानंतर श्री. रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती - पुढे चालू**......

दिनांक 5 एप्रिल 2007 रोजी सन्माननीय सदस्य, श्री.मधुकरराव सरपोतदार यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे सभागृहामध्ये माननीय श्री.वसंतराव डावखरे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या संबंधात दिनांक 31 मार्च 2007 रोजीच्या 'महाराष्ट्र टाईम्स' व 'सकाळ' या दोन वृत्तपत्रामध्ये त्यांची हेतुपुरस्सर बदनामी करणारी बातमी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे, असा मुद्दा उपस्थित करुन त्यांनी गेल्या काही वर्षात मोठया प्रमाणात गैरव्यवहार करुन बेहिशोबी संपत्ती जमविल्याचा आरोप कामगार नेते, श्री.शरद राव यांनी केला आहे असे निदर्शनास आणून दिले आहे. श्री.शरद राव यांनी सन्माननीय उपसभापतींची बदनामी करणे उचित नाही. तसेच, हा त्यांच्या राष्ट्रवादी पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे, असा उल्लेख करुन अशा प्रकरणाची जाहिर वाच्यता केल्यामुळे या सदनाची बदनामी होते व हे योग्य नाही असे नमूद करुन सभागृहाच्या माननीय पीठासीन अधिकारी राजकारणापासून दूर असायला हवेत व त्यांनी पक्षातीत काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. शिवाय एखाद्या सभागृहाबाहेरील व्यक्तीने तसा उल्लेख करणे म्हणजे सभागृहाचा अवमान आहे असेही पुढे त्यांनी नमूद केले आहे.

माननीय विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान परिषद, श्री.पांडुरंग फुंडकर यांनीही आपल्या भावना व्यक्त करतांना लोकशाहीचे जे संकेत आहेत त्यामध्ये माननीय पीठासीन अधिका-यांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला जाणे हे योग्य नसून या सभागृहाच्या माननीय उपसभापतींची जाणीवपूर्वक बदनामी करण्याचा तर प्रयत्न नाही ना असा प्रश्न उपस्थित केला आहे. जनतेचे प्रश्न अतिशय नि:पक्षपातीपणे सोडविण्याचे काम ज्या सदनात चालते त्या सदनाला बदनाम करण्याचा प्रयत्न काही व्यक्ती करीत असतील तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे, अशा भावना व्यक्त केल्या आहेत. श्री.शरद राव यांनी शासनाला आणि प्रशासनाला वेठीस धरुन ठाणे येथील रिक्षाचालकांचा संप लादला होता. परंतु, माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरे यांनी सर्व पक्षाच्या लोकांना एकत्र करुन त्या संपासंबंधात मार्ग काढला होता. त्यामुळे अशाप्रकारचे बेछूट आरोप करणे योग्य नसल्याचेही पुढे सभागृहात त्यांनी सांगितले.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती..........

या प्रकरणासंबंधात सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, मधुकर चव्हाण व माननीय उपमुख्यमंत्री यांनीसुध्दा त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. माननीय उपमुख्यमंत्री यांनी या सदनाच्या माननीय पीठासीन अधिका-यांबद्दल कोणत्याही स्तरावर अनुचित प्रकारे चर्चा होणे इष्ट नाही अशाप्रकारच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. दोघेही आपापल्या पदावर योग्य पध्दतीने काम करीत आहेत. मी दोघांचीही संयुक्त बैठक घेईन, तसेच पुन्हा असे प्रकार होणार नाहीत असा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल असे मत व्यक्त केले.

त्यावेळी सभागृहात मी असे मत व्यक्त केले होते की, हे सभागृह सार्वभौम आहे व या सार्वभौम सभागृहाची प्रतिष्ठा सर्वांकडून सातत्याने टिकवली गेली पाहिजे आणि ती टिकवत असताना वृत्तपत्र स्वातंत्र्यावर कोणत्याही प्रकारची बंधने येता कामा नयेत. शिवाय, माननीय पीठासीन अधिका-यांची प्रतिष्ठा ही संसदीय लोकशाही परंपरेमध्ये सातत्याने टिकविणे हे आपणा सर्वांचेच काम आहे. या प्रकरणाचा अभ्यास करुन मी निर्णय देण्याचे घोषित केले होते.

कामगार नेते श्री.शरद राव यांनी केलेल्या बेछूट आरोपाबद्दल स्पष्टीकरण करणारे सविस्तर पत्र माननीय उपसभापती, श्री.वसंतराव डावखरे यांनी मला लिहिले आहे. त्यांनी त्यात असे नमूद केले आहे की, "श्री.शरद राव यांनी कोणत्या हेतूने माझ्यावर असत्य आरोप केले आहेत याबद्दल मी अनभिज्ञ आहे. परंतु, केलेल्या आरोपांची भाषा विचारात घेता मला निश्चितच बदनाम करण्याचा पवित्रा त्यांनी घेतलेला दिसतो. त्यामुळे माझ्याबद्दल निश्चितच नव्हे परंतु, या उच्चतम आसनाबद्दल जनतेच्या मनात संशय निर्माण होण्यास वाव असल्याची दखल त्यांनी घेतलेली दिसत नाही. व्यक्तीपेक्षा पद मोठे या माझ्या मताशी आपण देखील सहमत व्हाल." त्यांनी त्यांच्या पत्रामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, श्री.शरद राव यांनी केलेले आरोप बिनबुडाचे असून त्यांनी जी काही मालमत्ता कमविली आहे ती वडिलोपार्जित व स्वकष्टाने मिळविली आहे. त्यांनी मला लिहिलेल्या पत्रात आपल्या मालमत्तेचे सविस्तर विवरणदेखील जोडले आहे.

माझ्या मते संसदीय लोकशाहीमध्ये दोन्ही सभागृहाचे माननीय पीठासीन अधिकारी तसेच माननीय उप पीठासीन अधिकारी या पदांना अत्यंत महत्व असून सभागृहाच्या हक्कांचे रक्षण करण्याचे महत्वपूर्ण कार्य त्यांना करावे लागते. किंबहुना सभागृहाच्या भावना त्यांच्या मार्फतच



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती..........

व्यक्त होत असतात. माननीय पीठासीन अधिका-यांचे स्थान, दर्जा हा संसदीय लोकशाहीमध्ये सर्वोच्च असून त्यांच्या स्थानाला धक्का लावणे व त्यांची प्रतिमा जनमानसात मलीन करणे हा विशेषाधिकाराचा प्रश्न समजला जातो. श्री.शरद राव यांनी माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांच्यावर आरोप करुन वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसिध्द करणे हा या सर्वोच्च सभागृहातील पीठासीन अधिका-यांची बदनामी करण्याचाही प्रकार आहे. श्री.वसंत डावखरे, उपसभापती, विधानपरिषद व श्री.वसंत डावखरे एक खाजगी व्यक्ती या दोन बाबी जरी वेगळया असल्या तरी श्री.शरद राव यांच्या पत्रात श्री.वसंत डावखरे, उपसभापती, विधानपरिषद असा उल्लेख केलेला आहे व त्यांच्यासंबंधी आरोप केलेले आहेत. श्री.शरद राव यांनी श्री.वसंत डावखरे एक खाजगी व्यक्ती म्हणून वैयक्तिक पातळीवर आरोप केले असते तर यदाकदाचित मी त्याची दखल घेतली नसती. परंतु, उपसभापती या संविधानात्मक पदावर आरोप करुन त्याच्या प्रती विविध वृत्तपत्रात प्रसिध्द होणे ही बाब निश्चितच दुर्लक्ष करण्याजोगी नाही. लोकशाहीमध्ये विधानपरिषद व विधानसभेचे असलेले सर्वोच्च स्थान व अशा सर्वोच्च सभागृहाच्या माननीय पीठासीन अधिका-यांचा असलेला दर्जा, स्थान लक्षात घेता माननीय पीठासीन अधिकारी या पदाची प्रतिष्ठा व त्या पदाला असलेले महत्व लक्षात घेता अशाप्रकारचे चारित्र्यहनन करणे अथवा बदनामीकारक मजकूर प्रसिध्द करणे मी कदापिही खपवून घेणार नाही. श्री.शरद राव अथवा इतर कोणत्याही व्यक्तीने माननीय पीठासीन अधिका-यांसंबंधात चारित्र्यहनन करणारा मजकूर छापणे हा एकप्रकारे सभागृहाचा अवमान होय असे मी जाहीर करु इच्छितो. यापुढे माननीय पीठासीन अधिका-यांसंबंधात कोणत्याही व्यक्तीने बेछूट आरोप करु नयेत अशी मी सक्त ताकीद देत आहे.

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर........ 12:55

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याबाबत मी असा प्रश्न विचारला होता की, सन्माननीय उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा या प्रकरणात उल्लेख केलेल्या पत्रामध्ये पिठासीन अधिकारी म्हणून केलेला होता म्हणून आपण जर संमती दिली तर याविरुध्द विशेष हक्कभंग झाल्याचा प्रस्ताव आम्ही मांडू, आपल्या संमतीवर सर्व अवलंबून आहे.

**सभापती** : ठीक आहे, याबद्दल मी विचार करेन.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

S - 2

**दिनांक 16 एप्रिल,2007 रोजीच्या तारांकित प्रश्न क्रमांक 24895 बाबत.**

**सभापती** : दिनांक 16 एप्रिल,2007 रोजीच्या तारांकित प्रश्न क्रमांक 24895 च्याबाबत निर्णय मी देतो म्हणून सांगितले होते परंतु यासंदर्भात मी जी माहिती मागविली होती ती मला परिपूर्ण अशी उपलब्ध झाली नाही म्हणून यासंदर्भातील निर्णय मी राखून ठेवलेला आहे.

---------

**दिनांक 15 मार्च,2007 रोजीच्या तारांकित प्रश्न क्रमांक 24454 बाबत.**

**सभापती** : दिनांक 15 मार्च,2007 रोजीच्या तारांकित प्रश्न क्रमांक 24454 च्या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्दयाच्या अनुषंगाने देखील मी निर्णय देण्याचे मान्य केले होते. याबाबत मी पूर्ण तपास करीत आहे परंतु यासंदर्भात विधी व न्याय विभागाकडूनही माहिती मिळविणे आवश्यक आहे तसेच, यासंदर्भात वस्त्रोद्योग विभागाकडून देखील माहिती मिळणे आवश्यक आहे म्हणून सदर तारांकित प्रश्नाबाबतचा निर्णय मी राखून ठेवत आहे.

--------

**शिक्षकांच्या वेतनेतर अनुदानाच्या प्रश्नाबाबत.**

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, दिनांक 23 मार्च,2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील शिक्षकांच्या वेतनेतर अनुदानाबाबतच्या प्रश्नावरील निर्णयही आपण राखून ठेवला होता.

**सभापती** : सदर प्रश्नाबाबत मी माहिती घेत आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, सदर प्रश्नाबाबत आम्ही जी माहिती गोळा केली आहे, ती मी वाचून दाखवू का ?

**सभापती** : या सभागृहामध्ये आज काहीही वाचून दाखवायचे नाही.

श्री.अरविंद सावंत : आज या सभागृहात फक्त ऐकूनच घ्यावयाचे.

**सभापती** : इतर वेळेस या सभागृहामध्ये ऐकण्याचे काम मी करतच असतो.

-------

यानंतर श्री.बोरले.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आरेच्या कोटयावधी रुपये किंमतीच्या मोक्याच्या जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचे सुरु असलेले षडयंत्र.

**मु. शी.** : आरेच्या कोटयावधी रुपये किंमतीच्या मोक्याच्या जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचे सुरु असलेले षडयंत्र याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (दुग्ध विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "आरेच्या कोटयावधी रुपये किंमतीच्या मोक्याच्या जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचे सुरु असलेले षडयंत्र" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आरे कॉलनीतील 186 एकर जमिनीवर 4500 झोपडया दाखविण्यात आल्या आहेत. त्या झोपडयांचे पूनर्वसन करण्याचे ठरले आहे. पवईच्या बाजूला त्या झोपडपट्टीचे पुनर्वसन करावे, असे कोर्टाचे आदेश नाहीत. परवा माननीय श्री.अनिस अहमद यांनी आरे कॉलनीतील एकही इंच जमीन देण्यात येणार नाही, असे सांगितले होते. नियम 93 ला दिलेल्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "आरे दुग्ध वसाहतीतील 33.6 एकर जमीन मे.बामको टेक प्रायव्हेट लिमिटेड या विकासकास विकास करण्यासाठी देण्याबाबत मंजुरी दिली आहे." माझा प्रश्न असा आहे की, आरे कॉलनीतील 33 एकर जमीन मे.बामको टेक प्रायव्हेट लिमिटेडला देण्याचे कारण काय ? ही जमीन नो डेव्हलपमेंट झोनमध्ये येते. ही जमीन डेव्हलपमेंट झोनमध्ये रुपांतरीत करण्यासाठी विकासकाने 10 कोटी रुपये दिले आहेत. जर ती जमीन नो डेव्हलपमेंट झोनमध्ये होती तर त्या जमिनीचे डेव्हलपमेंट झोनमध्ये रुपांतर झाल्यानंतर त्यांच्याकडून 10 कोटी रुपये घेण्याचे कारण काय, सदर जागेवर गवत असल्यामुळे तो हरितपट्टा होत नाही काय, विकासकाकडून 10 कोटी रुपये का घेतले आणि नो डेव्हलपमेंट झोनची जमीन का दिली ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आरे कॉलनीतील ही जमीन दुग्ध विकास विभागाची आहे. 180 एकर जमिनीवर 7 हजाराच्यावर झोपडपट्टी होती. 180 एकर जमीन झोपडपट्टीने व्यापलेली होती. या झोपडयांचे एका ठिकाणी पुनर्वसन केल्यानंतर बाकीची जागा वाचणार होती. एस.आर.ए. योजनेखाली 70 टक्के झोपडपट्टीधारकांच्या सहया घेऊन सरकारने 33.6 एकर जमीन मे.बामको टेक प्रायव्हेट लिमिटेड या विकासकाला विकास करण्यासाठी देण्याबाबत मंजुरी दिली आहे. झोपडयांचे एका ठिकाणी पुनर्वसन केले तर 150 एकर जमीन वाचणार आहे. म्हणून शासनाने हा निर्णय घेतलेला आहे. 180 एकर जमिनीमध्ये नो डेव्हलपमेंट झोन आहे. 180 एकर जमिनीवर झ ोपडपट्टी बसलेली आहे. झोपडयांचे एका ठिकाणी पुनर्वसन केले तर शासनाची जमीन वाचणार आहे म्हणून शासनाने हा निर्णय घेतलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आरे कॉलनीतील नो डेव्हलपमेंट झोनची 180 एकर जमीन खाजगी विकासकाला दिली जात आहे. कोर्टाने झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु त्याच जमिनीवर पुनर्वसन केले पाहिजे, असे आदेश दिलेले नाहीत. त्या झ ोपडपट्टीचे पुनर्वसन दुसरीकडे केले पाहिजे. यामध्ये कोणाचे हात गुंतलेले आहेत ?

..3....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी असे सांगितले की, आरे कॉलनीतील 180 एकर जमिनीवर झोपडया आहेत. त्या झोपडयांचे एका ठिकाणी पुनर्वसन केले तर शासनाची बाकीची जमीन वाचणार आहे. त्या झोपडयांचे पुनर्वसन 33 एकर जागेवर करावयाचे आहे. विकासकाला 180 एकर जमीन दिलेली नाही. मे.बामको टेक प्रायव्हेट लिमिटेड या विकासकाला झोपडयांचे पुनर्वसन करण्यासाठी 33 एकर जमीन देण्यात आलेली आहे. नो डेव्हलपमेंट झोन असल्यामुळे तेथे बांधकाम होऊ शकलेले नाही. डेव्हलपमेंट झोनमधील जागा द्यावी लागली तर त्याचाही विचार करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, डेव्हलपमेंट झोनमधील जमीन देऊ याचा अर्थ हे रद्द करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, 180 एकर जमिनीवर झ ाोपडपट्टी आहे. 33 एकर जमीन डेव्हलपमेंट झोनमध्ये असेल तर तेथे या झोपडयांचे पुनर्वसन करु आणि 180 एकर जमीन काढून घेऊ.

--------

..4.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनाबाबत.</u>

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मी नियम 93 ची सूचना दिलेली आहे. त्या सूचनेवरील निवेदन अद्याप आलेले नाही. आपण आम्हाला न्याय द्यावा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे मी आपल्याला दररोज न्याय देत आहे. आज 33 निवेदने आलेली आहेत त्यामध्ये तुमचे निवेदन नसेल तर निवेदने संपल्यानंतर आपण मला आठवण करुन द्या.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :पवई येथील हिरानंदानी रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू
मु.शी. :पवई येथील हिरानंदानी रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू
या बाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते वि.प.स. यानी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "पवई येथील हिरानंदानी रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेच्या निवेदनात मी पान क्र.2 वरील शेवटच्या परिच्छेदामध्ये आपल्या अनुमतीने दुरुस्ती करु इच्छितो. "पवई पोलीस स्टेशनवरुन मिळालेल्या माहितीनुसार जे.जे.हॉस्पीटलचे डीन व डॉक्टरांच्या कमिटीच्या अहवालाप्रमाणे श्रीमती शोभा खानविलकर यांच्यावर डॉक्टरांनी केलेला उपचार बरोबर होता व त्यामध्ये डॉक्टरांचा काहीही निष्काळजीपणा नव्हता असे आढळून आले आहे".

**सभापती** : सुधारल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन दुरुस्तीसह छापावे)





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझे मंत्री महोदयाच्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे. परंतु निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रारी संबंधीचा एफ.आय.आर.दाखल करण्यात येईल, असे पवई पोलीस स्टेशनकडून सांगण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, एक महिन्यात गुन्हा दाखल करण्यात येईल का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, डॉक्टरांचा निष्काळजीपणा नव्हता असे चौकशीत आढळून आलेले आहे, त्यामुळे एफ.आय.आर. दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई शहरातील ग्रँट रोडवरील ब्राम्हणवाडीमधील ठक्कर चाळीच्या इमारतीची अद्यापपर्यंत न झालेली दुरुस्ती.

**मु.शी.**: मुंबई शहरातील ग्रँट रोडवरील ब्राम्हणवाडीमधील ठक्कर चाळीच्या इमारतीची अद्यापपर्यंत न झालेली दुरुस्ती या विषयाबाबत प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी "मुंबई शहरातील ग्रँट रोडवरील ब्राम्हणवाडीमधील ठक्कर चाळीच्या इमारतीची अद्यापपर्यंत न झालेली दुरुस्ती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, मुंबई येथील ग्रॅंट रोड, ब्राम्हणवाडीमधील 443 सी.डी.ठक्कर चाळीतील इमारतीतील भाडेकरुंचा इमारत मालक श्री.दामजी शहा याच्या विरोधात 1990 पासून लढा चालू आहे. इमारत मालकाकडून दहशतीच्या मार्गाचा अवलंब करुन ताबा घेण्याचा अनेक वेळा प्रयत्न झालेला आहे. त्याविरुध्द भाडेकरु संघाने अद्यापपर्यत लढा दिलेला आहे. 443 सी.डी. ठक्कर चाळ इमारतीच्या संदर्भात भाडेकरुंनी अशी मागणी केलेली आहे की, या इमारतीची दुरुस्ती करावी. परंतु त्यांच्या इमारतीची दुरुस्ती होऊ शकणार नाही, असे आपण उत्तरात म्हटले आहे. जर त्यांच्या इमारतीची दुरुस्ती होऊ शकणार नसेल तर 443 सी.डी.ठक्कर इमारतींच्या दुरुस्तीसाठी कार्यकारी अभियंत्यांनी भाडेकरुंना 1999, 2005 व 2006 अशा तीन वेळा रकमा भरण्यासाठी पत्र कसे दिले आहे ? माझा प्रश्न आहे की, ब्राम्हणवाडी मधील 443 सी.डी. ठक्कर चाळीतील घरांची दुरुस्ती करण्यात येईल का ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, मुंबई शहरातील ग्रॅंट रोडवरील ब्राम्हणवाडी मधील 443 सी.डी.ठक्कर चाळ ही इमारत 90 वर्षापूर्वीची आहे. या इमारतीची यापूर्वी तीन वेळा दुरुस्ती करण्यात आलेली आहे. आता चौथ्या वेळेला रिपेअर करण्याची मागणी भाडेकरु संघाने केलेली आहे. या कामासाठी जय अंबे भाडेकरु संघ यांनी पुनर्विकासास संमती दर्शविली, तर ब्राम्हणवाडी भाडेकरु संघाने पुनर्विकासास विरोध केला आहे. अशा इमारती रिपेअर करण्यासाठी म्हाडाला इस्टीमेट द्यावे लागते. ही इमारत दुरुस्तीचे अंदाजपत्रक 15 लाख रुपये आहे. त्यापैकी 11 लाख रुपयांची व्यवस्था भाडेकरुंनी केलेली आहे. या इमारतीच्या दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेला निधी अपुरा असल्यामुळे सदरहू इमारत दुरुस्ती पलीकडे असल्याचे घोषित करण्याचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणापुढे सादर करण्यात आलेला आहे. तथापि याबाबत प्राधिकरणाचा अंतिम निर्णय अद्याप झ ालेला नाही. भाडेकरुंनी मागणी केली होती की, त्यांची बिल्डींग राहण्यायोग्य नाही, ती 90 वर्षापूर्वीची आहे. सदर इमारतीच्या संरचनात्मक स्थैयासंबंधी मालमत्ताधारकाने श्री.तरुण कांत, प्राध्यापक, आय.आय.टी. यांनी अहवाल सादर केलेला असून या इमारतीचे उपलब्ध शास्त्रानुसार दुरुस्ती करुन आयुष्य वाढविणे शक्य नसल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. यावरुन असे लक्षात येते की, भाडेकरुंचे जीवन धोक्यात असल्यामुळे ही शिफारस करण्यात आलेली आहे.

.....5



ॲड.प्रीतमकुमार शेगावकर .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेथील भाडेकरुंच्या जीवाला धोका होऊ शकतो. याबाबत लवकर निर्णय घेणे योग्य राहील, असे अहवालात नमूद केले आहे. यानंतर भाडेकरु संघाबरोबर मी बैठक घेतली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद नेरकर हे या बैठकीस उपस्थित होते, त्यांनीही आर्थिक मदत केलेली आहे. भाडेकरुंना सांगितले आहे की, उर्वरित रक्कम भरुन टाका. परंतु उर्वरित रक्कम अद्यापपर्यंत भरलेली नाही. भाडेकरुंनी संमती दिली तर 225 चौरसफुटाची सदनिका त्यांना मिळणार आहे. ही बिल्डींग अतिशय जुनी झालेली असून अर्ध्यापेक्षा जास्त भाडेकरु बिल्डींग सोडून गेलेले आहेत.

-------

.....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: मराठवाडयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदे मंजूर करणे.

**मु.शी.**: मराठवाडयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदे मंजूर करणे या विषयाबाबत श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी "मराठवाडयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदे मंजूर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....7



श्रीकांत जोशी : सभापती महोदय, औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये 21 व्या शतकात अत्यंत आवश्यक असलेल्या संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान, ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या, व्यवस्थापनशास्त्र आणि नाटयशास्त्र या पाच विभागासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सहा शिक्षकांची पदे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मंजूर करण्यात आलेली आहेत. परंतु महाराष्ट्र शासन या शिक्षकांचा पगार देऊ शकत नाही, कारण विचारले असता या नवीन पदांना शासनाची पूर्वपरवानगी घेतली नाही असे म्हटले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात या पदांची आवश्यकता असताना शासनाने हात झटकण्याऐवजी त्यांना मान्यता देऊन पगार देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

आहेत त्या फॅकल्टी निघून गेली तर पुन्हा मिळत नाही म्हणून हे 6 कोर्सेस चालू रहावेत, विद्यापीठाकडे त्यासाठी निधी देणे शक्य नाही त्यामुळे येत्या अधिवेशनामध्ये त्या पदांना मान्यता आपण देणार का ? तसेच विद्यापीठ आणि शासन स्तरावरील प्रतिनिधी यांची बैठक घेणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 2002 ला युजीसीकडे `पाच पदांसाठी परवानगी मागितली होती आणि नियमानुसार खरे तर त्यासाठी शासनाची परवानगी घेऊन त्यांनी युजीसीकडे जायला पाहिजे होते. परंतु त्यांनी महाराष्ट्र शासनाची कोणत्याही प्रकारे परवानगी न घेता डायरेक्ट युजीसीला ॲप्रोच होऊन त्यांनी 23.12.2005 ला पाच लोकांची नियुक्ती केली आणि त्याबाबत शासनाला 5.6.2006 ला कळविले की, आम्ही अशा अशा लोकांची नियुक्ती केली आहे. मात्र त्यासाठी त्यांनी शासनाची परवानगी घेतलेली नव्हती. त्यामुळे अशी डिस्क्रीपन्सी निर्माण झाली आहे की, मुंबई विद्यापीठ कायद्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाची परवानगी घेऊनच अशा नियुक्त्या करता येतात. आता त्यांनी पदांवर नियुक्त्या केल्यानंतर ते त्यांच्या पगारासाठी आमच्याकडे आलेले आहेत. त्यामुळे आम्ही तो प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आहे आणि पुढील अधिवेशनामध्ये याबाबत आपण निर्णय घेऊ इतकेच मी याबाबत सांगू इच्छितो.

***

....... व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात शासनाला आलेले अपयश आणि त्यासंबंधात केंद्र सरकारकडून पॅकेज जाहीर होऊनही पूर्ण निधी न मिळणे.

**मु.शी.** : विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात शासनाला आलेले अपयश आणि त्यासंबंधात केंद्र सरकारकडून पॅकेज जाहीर होऊनही पूर्ण निधी न मिळणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

--

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : महोदय, सर्वश्री सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, मधुकर चव्हाण यांनी "विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात शासनाला आलेले अपयश आणि त्यासंबंधात केंद्र सरकारकडून पॅकेज जाहीर होऊनही पूर्ण निधी न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... व्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये मा. महसूल मंत्र्यांनी केलेले निवेदन - निवेदन क्र.4 .. )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भातील 6 जिल्ह्यांमध्ये गेल्या 7 वर्षामध्ये जवळपास साडेतीन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत आणि त्या संदर्भात देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री यांनी वेगवेगळी पॅकेजेस जाहीर केली होती. त्या संबंधात आम्ही नियम 93 खाली सूचना दिली होती. या निवेदनातून 28 मार्च 2007 अखेरपर्यंतचा पंतप्रधान पॅकेज अंतर्गत प्राप्त निधी व झालेल्या खर्चाचा अहवाल दिलेला आहे. त्यानुसार एकूण तरतूद 3751.48 कोटी रूपयांची होती आणि खर्च मा I 1297.36 इतका झालेला आहे. यामध्ये राज्य सरकारचे 1304 कोटी रूपयांचा निधी यामध्ये प्राप्त झालेला आहे. राज्य सरकारच्या खर्चामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जे पॅकेज जाहीर केले होते त्यात व्याजमाफी आणि सिंचनाच्या योजना आहेत त्या यात मिक्स केल्या आहेत आणि अशा प्रकारे एकूण 1297 कोटी रूपये खर्च झालेले आहेत. एकूण पॅकेज हे 3751 कोटी रूपयांचे होते. मात्र यातून प्रत्यक्ष शेतकऱ्याला काहीही लाभ मिळालेला नाही. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला 1 लाख रूपयांची मदत दिली आहे म्हणून यात सांगितले आहे. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा की, ही जी तरतूद आहे ती केव्हापर्यंत खर्च होणार आहे ? तसेच आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला 1 लाख रूपयांची मदत जी दिली गेली आहे ती देत असताना 70 हजार रूपये बँकमध्ये बॉण्डच्या स्वरूपात ठेवले आहेत आणि 30 हजार रूपये नगद दिले आहेत. मात्र शेतकऱ्यांवर जे कर्ज होते त्याची माफी काही सरकारने केलेली नाही. म्हणून या संबंधात माझा प्रश्न असा आहे की, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे त्यांच्या कुटुंबियांना आपण 1 लाख रूपये मदत दिली आहे त्या शेतकऱ्यांच्यावर असलेले कर्ज आपण माफ करणार आहात का ? अन्यथा ही मदत देऊनही काही उपयोग होणार नाही. दुसरे असे की, जे आपण 3 हजार चेकडॅम बांधणार आहात तर त्यातील बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात किती बांधणार आहात ?

( यानंतर श्री. सरफरे .... डब्ल्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व सन्माननीय सदस्य विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी विदर्भामध्ये मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत असतांना माननीय पंतप्रधानांनी पॅकेज दिले. परंतु त्यामधील रक्कम खर्च झाली नाही याकरिता नियम 93 अन्वये सूचना दिली होती. माननीय पंतप्रधानांनी रु.3751 कोटींचे पॅकेज दिले होते. त्यापैकी जवळपास रु.1304 कोटी आतापर्यंत खर्च झाले. केंद्र सरकार व राज्य सरकारचे मिळून 347 कोटी रुपये खर्च झाले. राज्य सरकारने रु.1075 कोटींचे पॅकेज जाहीर केले त्या पॅकेजचा या रकमेमध्ये समावेश नाही. मी फक्त आपल्याला केंद्र सरकारच्या पॅकेज पुरते सांगतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय पंतप्रधानांनी जे पॅकेज जाहीर केले त्यामध्ये 3 टक्के रकमेबरोबर शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ केले जाईल असे म्हटले होते. तेव्हा माननीय मुख्यमंत्री आणि माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केल्याप्रमाणे दोन वेळा व्याज माफ करण्यात आले काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, कर्जावरील व्याज एकदा माफ केले. केंद्र व राज्य सरकारकडून पॅकेज जाहीर केले असले तरी दोन वेळा व्याज माफ केले नाही. उदाहरणादाखल पॅकेज मधील रक्कमेची टक्केवारी सभागृहाला सादर करतो. व्याजमाफी 50 टक्के केंद्र सरकार व 50 टक्के राज्य सरकार, आश्वासित सिंचन योजना 90 टक्के केंद्र सरकार व 10 टक्के राज्य सरकार, सूक्ष्मसिंचन 50 टक्के राज्य सरकार व 50 टक्के केंद्र सरकार, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाकरिता पूर्णपणे नाबार्डकडून मदत प्राप्त झाली, विस्तार सेवा 90 टक्के केंद्र सरकार व 10 टक्के राज्य सरकार, बियाणे वाटप 100 टक्के केंद्र सरकार, राष्ट्रीय फलोत्पादन मिशन 100 टक्के केंद्र सरकार. अशाप्रकारे केंद्र सरकार व राज्य सरकारचा मिळून वाटा असलेली रक्कम 1446 कोटी आहे. त्या त्या विभागाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे गेल्यानंतर ती रक्कम रिलिज होईल. एकूण तीन वर्षाकरिता हे पॅकेज असून त्यामध्ये ही संपूर्ण रक्कम खर्च केली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी चेक डॅमसंबंधी प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर मंत्रिमहोदयांकडून मिळाले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, पॅकेजमध्ये एकूण 3012 चेक डॅमची कामे सुरु आहेत असे म्हटले आहे. याठिकाणी बुलढाणा जिल्हयाची माहिती विचारण्यात आली होती. त्यासंबंधी स्पेसिफिक माहिती माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सांगली जिल्हयातील सात महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान हडप करणे

**मु.शी.**: सांगली जिल्हयातील सात महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान हडप करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यां□ी दिलेली □ियम 93 अ□वये सूच□ा.

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यां□ी "सांगली जिल्हयातील सात महाविद्यालयांनी विद्यापीठअनुदान आयोगाचे अनुदान हडप करणे" या विषयावर □ियम 93 अ□वये जी सूच□ा दिली होती, तिला अ□ुलजू□, आपज □िदेश दिल्याप्रमाजे मला □िवेद□ ज रावयाचे आहे. □िवेद□ाच्या प्रती सदस्यां□ा अजोदरच वितरीत जेलेल्या असल्या□े मी हे □िवेद□ सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : □िवेद□ सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे □िवेद□ छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) W 4

DGS/ KGS/ MHM/

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नोकरी मिळविण्याकरिता कोचिंग क्लासेसच्या नावाखाली यु.जी.सी. ची ग्रँट हडप करण्याचा गंभीर प्रकार आहे. यामध्ये सदर अनुदानाशी शासनाचा काहीही संबंध नाही असे म्हटले आहे. 8 एप्रिल रोजी दै. लोकमत वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली आहे. त्यामध्ये 15 कोटींचा घोटाळा असल्याचे म्हटले आहे. राज्यामधील ही महाविद्यालये यु.जी.सी. ची ग्रँट परस्पर घेतात. कोणत्याही प्रकारचे कोचिंग क्लास न घेता बोगस पध्दतीने पैसे उचलतात. या महाविद्यालयामार्फत महाराष्ट्रातील बेरोजगार परदवीधर तरुणांना प्रशिक्षण दिले जात असल्याचे कोठेही आढळून आले नाही. याठिकाणी नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर शासनाकडून तशाप्रकारचे निवेदन अपेक्षित होते. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन तपासणी अहवाल किती दिवसात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल? तसेच, चौकशीमध्ये जर संस्था चालक दोषी असतील तर त्यांच्यावर आपण कडक कारवाई करणार काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (पुढे सुरू...

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दै.लोकमतमध्ये बातमी छापून आली ती मी इंटरनेटवर पाहून खात्री करून घेतली. त्या बातमीमध्ये कोणत्याही संस्थेचे नाव दिलेले नव्हते. जनरल इन्फर्मेशन दिलेले होते. टेबल न्यूज होती. सन्मानीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर याबाबत प्रश्न आम्ही शिवाजी विद्यापीठाच्या व्हाईस चान्सलर यांच्याकडून अहवाल मागविला. त्याचबरोबर तेथील स्थानिक पोलीस स्टेशनकडून सर्व विचारपूस करून याबाबतचे सर्व रेकॉर्ड मागविले. परंतु तशी कोणतीही घटना घडलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक केस सांगितली तर त्याबाबतची चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल. व्हाईस चान्सलरनी कोणत्याही संस्थेचे नाव रेफर केलेले नाही.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**पृ. शी.** : एम.एम.आर.डी.ऐ.ने अन्य सार्वजनिक उपक्रमात गुंतविलेले पैसे परत न मिळण्याची निर्माण झालेली शक्यता.

**मु. शी.** : एम.एम.आर.डी.ऐ.ने अन्य सार्वजनिक उपक्रमात गुंतविलेले पैसे परत न मिळण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी "एम.एम.आर.डी.ऐ.ने अन्य सार्वजनिक उपक्रमात गुंतविलेले पैसे परत न मिळण्याची निर्माण झालेली शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.संजय केळकर : एम.एम.आर.डी.ए.ने वेगवेगळया संस्थांमध्ये गुंतवणूक केल्याबाबतची माहिती दिलेली आहे. एम.एम.आर.डी.ए.कडे ठाणे जिल्ह्यातील 1500 कोटी रुपयाचे प्रस्ताव गेलेले होते, त्याचे काय झाले ? एम.एम.आर.डी.ए.कडून ठाणे जिल्ह्याला सापत्नभावनेची वागणूक देणे चालू रहाणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, कापूस पणन महामंडळाला 2000 साली आणि कृष्णा खोरे महामंडळाला 98 साली एम.एम.आर.डी.ए.कडून कर्ज स्वरुपामध्ये पैसे देण्यात आले होते. त्या संदर्भामध्ये त्यांच्याकडून वसुली करण्याच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या माध्यमातून आढावा बैठकीच्या रुपाने वित्त विभागाने 129 कोटी रुपये या वर्षाच्या बजेटमध्ये तरतूद परत फेडीसाठी केलेली आहे. त्यानंतर हाऊसिंग डिपार्टमेंटने 89 कोटी रुपये या वर्षाच्या बजेटमध्ये एम.एम.आर.डी.ए.ला पैसे परतफेड करण्यासाठी तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.केळकर यांनी ठाणे जिल्ह्याच्या प्रस्तावाच्या संबंधाने सांगितले. एम.एम.आर.डी.ए.चा निधी देण्याबाबत आता घेण्यात येणाऱ्या बैठकीमधून सकारात्मक विचार केला जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4.....

SKK/ KGS/ MHM/

**पृ. शी**. : जे.जे., जी.टी., सेंट जॉर्ज आदि हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यापूर्वी भूल देणाऱ्या तंत्रज्ञांची असलेली कमतरता.

**मु. शी**. : जे.जे., जी.टी.सेंट जॉर्ज आदि हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यापूर्वी भूल देणाऱ्या तंत्रज्ञांची असलेली कमतरता, याबाबत श्री.अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत,वि.प.स. यांनी "जे.जे., जी.टी., सेंट जॉर्ज आदि हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यापूर्वी भूल देणाऱ्या तंत्रज्ञांची असलेली कमतरता", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.अरविंद सावंत, जे.जे.,जी.टी. आणि सेंट जॉर्ज हॉस्पिटल या ठिकाणी बधिरीकरण तज्ञ ांच्या कमतरतेमुळे प्रत्यक्षात किती काळासाठी शस्त्रक्रिया बंद होत्या, आता शस्त्रक्रिया सुरू झ ालेल्या आहेत काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, कामा व आल्ब्लेस रुग्णालय व गो.ते.रुग्णालय यांच्यासाठी आतापर्यन्त प्रत्येकी 1 अर्ज प्राप्त झालेला आहे. या खाजगी व्यावसायिकांची सेवा गरजेनुसार व त्यांच्या उपलब्धतेनुसार वापरण्यात येणार असल्याचे म्हटलेले आहे. खाजगी व्यावसायिकांना आपण गरजेनुसार बोलाविणार आहात काय ? या जागा भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी केलेली आहे, परंतु अद्याप उमेदवारांची शिफारस प्राप्त झालेली नाही. त्याबाबतीतील पाठपुरावा करून किती दिवसात हे उमेदवार मिळवून घ्याल ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे खरे आहे की, दिनांक 1-4-2007 ते 9-4-2007 पर्यन्तच्या कालावधीमध्ये मायनर ऑपरेशन्स पुढे ढकलण्याचा प्रयत्न केलेला आहे. भूल तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे. या हॉस्पिटल्समध्ये जेव्हा इमर्जन्सी येईल तेव्हा खाजगी भूल तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करुन घेऊ. या व्हेकन्सीज भरण्याच्या बाबतीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे शिफारस केलेली आहे, त्यांच्याकडून उमेदवार उपलब्ध झ ालेले नाहीत. सेंट जॉर्ज आणि जे.जे. हॉस्पिटलमध्ये वॉक इन इटरव्ह्यू घेण्याचा प्रयत्न केला परंतु कोणी आलेले नाहीत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

याचे कारण असे की, मुंबईमध्ये ॲनेस्थेटिस्ट कमी आहेत. विशेष म्हणजे या नोकरीसाठी येण्यास कोणी तयार नाही. खाजगी प्रॅक्टीसमध्ये ते जाण्यासाठी बघतात. सर्व शासकीय हॉस्पिटल्समध्ये किंवा खाजगी हॉस्पिटल्समध्ये त्यांचे शॉर्टेज आहे. त्यासाठी आपण येणाऱ्या दिवसांमध्ये बसून त्यावर चर्चा करु. जी रिक्रूटमेंट प्रोसीजर असेल किंवा ज्या सर्व्हिस कंडीशन्स असतील त्यामध्ये आपल्याला योग्य बदल करावे लागतील.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

**पृ. शी.** : अमरावती विभागाचे मुख्य अभियंता यांनी केलेला भ्रष्टाचार.

**मु. शी.** : अमरावती विभागाचे मुख्य अभियंता यांनी केलेला भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. छगन भुजबळ ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "अमरावती विभागाचे मुख्य अभियंता यांनी केलेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील "लोकमत" या नामांकित वर्तमानपत्रात 16 मार्च ते 19 मार्च असे सतत 4 दिवस अमरावती विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागातील भ्रष्टाचार आणि तेथील अधिकारी व कंत्राटदार या सर्व कंपूच्या भ्रष्टाचाराची माहिती आलेली आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रचंड बदनामी झालेली आहे. तेथील मुख्य अभियंत्याच्या नेतृत्वाखाली हा सर्व भष्टाचार झालेला आहे. या ठिकाणी जे निवेदन दिलेले आहे त्यामध्ये फक्त कामांची नावे, त्यांच्या निविदा, ते काम किती रुपयांचे होते आणि काम कोणाला दिले याची माहिती दिलेली आहे. हे सर्व वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेले आहे. त्या मुख्य अभियंत्यावर अनेक प्रकारच्या विभागीय चौकशा चालू आहेत. असे असताना त्या अभियंत्याचे प्रमोशन करण्यात आले. शासन या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणार काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या नियम 93 च्या सूचनेमध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्यासंदर्भात मी स्पष्ट करु इच्छितो की, मुख्य अभियंतापदी आता जे इंजिनियर आलेले आहेत ते 30.11.2005 ला रुजू झालेले आहेत. सूचनेमध्ये जो उल्लेख केलेला आहे त्यातील अमरावती-पांढुर्णा रस्त्याचे काम हे मुख्य अभियंता त्या ठिकाणी येण्याच्या अगोदरपासून सुरु झालेले होते आणि ते काम पूर्ण सुध्दा झाले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील पाच पैकी चार कामे हे अभियंता त्या ठिकाणी रुजू होण्यापूर्वीच 1998-99 पासून सुरु झालेली आहेत. त्यातील 1 काम पूर्ण झाले असून तीन कामे प्रगतिपथावर आहेत. अमरावती येथील सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल या कामाची मान्यता सुध्दा हे मुख्य अभियंता रुजू होण्याच्या पूर्वीची आहे. ते काम सन 2002 मध्ये सुरु होऊन काम पूर्ण झालेले आहे. मेसर्स विनित फॅब्रीकेटर्सच्या कामाच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर काम मंजूर झालेले आहे. रुंझा-वाठोडा-करंजी या रस्त्याच्या कामाच्या तीन निविदांपैकी 2 निविदा या मुख्य अभियंत्याच्या पूर्वीच्या काळातील आहेत. अकोला मिनी बायपासचे काम सुध्दा ते त्या ठिकाणी रुजू होण्यापूर्वी झालेले आहे. बाराव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत इमारतींच्या बांधकामाच्या निविदा सुध्दा या मुख्य अभियंत्याच्या स्तरावर झालेल्या नाहीत. हे खरे आहे की, एका वर्तमानपत्रामध्ये यासंदर्भामध्ये माहिती छापून आली. आम्ही ती संपूर्ण माहिती तपासून पाहिली. त्यानंतर असे लक्षात आले की, यातील बहुतेक सर्व कामे अगोदरपासून सुरु झालेली आहेत

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : काही कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणार काय ?

श्री. छगन भुजबळ : एखादे काम निकृष्ट दर्जाचे झाले असेल तर ते दाखवावे. त्यामध्ये जे जे अधिकारी असतील त्यांच्यासंदर्भात चौकशी केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : मी आपल्याला त्याची माहिती देतो.

-----

**नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 9 बाबत**

**सभापती** : नियम 93 अन्वये भिवंडी येथील यंत्रमागाच्या संदर्भातील जे निवेदन क्रमांक 9 आहे ते सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याशी संबंधित आहे. परंतु सन्माननीय मंत्रिमहोदय आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे हे निवेदन नंतर घेण्यात येईल.

-----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सन 2005मधील अतिवृष्टीत आलेल्या महापुरात राज्यातील विविध जिल्ह्यातील बाधित लोकांना इंदिरा आवास योजनेतून घरकुले देण्याची केलेली मागणी

**मु.शी** : सन 2005मधील अतिवृष्टीत आलेल्या महापुरात राज्यातील विविध जिल्ह्यातील बाधित लोकांना इंदिरा आवास योजनेतून घरकुले देण्याची केलेली मागणी यासंबंधी प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी "सन 2005 मधील अतिवृष्टीत आलेल्या महापुरात राज्यातील विविध जिल्ह्यातील बाधित लोकांना इंदिरा आवास योजनेतून घरकुले देण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

प्रा. शरद पाटील : 2005च्या पावसाळ्यामध्ये आलेल्या महापुरात ज्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या घरांचे नुकसान झाले होते त्यांच्या घरांची दुरुसती झालेली आहे. तसेच केन्द्र शासनाकडे अनुदानाचा प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करुन साडेतीन कोटीचे अनुदान मंजूर करुन घेतल्याबद्दल मी सन्माननीय मंत्री महोदय श्री. विजयसिंह मोहिती-पाटील यांचे अभिनंदन करतो. हे अनुदान त्या त्या जिल्ह्यांना केव्हा वितरित करण्यात येणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : त्या त्या जिल्ह्यांना 30 मार्चला पैसे वितरित केलेले आहेत. केन्द्र शासनाचे 75 टक्के अनुदान हे थेट डीआरडीएकडे वर्ग होते. राज्य शासनाचा 25 टक्के हिस्सा हा डीआरडीएकडे उपलब्ध आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे वाढीव शुल्क

**मु.शी** : व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे वाढीव शुल्क याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते व विनोद तावडे वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते व विनोद तावडे, वि.प.स. यांनी "व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे वाढीव शुल्क" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : आज संपूर्ण महाराष्ट्रातील व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणारे विद्यार्थी संस्था चालकांनी वाढविलेल्या फी वाढीमुळे भरडले जात आहेत. शिक्षण शुल्क समितीला चुकीची माहिती देवून फसवणूक करणा-या शिरपूर जिल्हा धुळे येथील के.डि.एम.एस.होमिओपॅथिक कॉलेज, धुळे येथील अजमेरा फार्मसी कॉलेज आणिय नाशिक येथील एनडीएमव्हीपी मेडिकल कॉलेज यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. शिक्षण शुल्क समितीला स्टाफ अपुरा दिलेला आहे. सभापती महोदय, माझ्याकडे या सर्व प्रकणांची फाईल आहे, ती मी आपणाकडे पाठवितो. याबाबतीत महाराष्ट्र सरकारची अनास्था आहे. शिक्षण शुल्क समिती सक्षम केली जात नाही. या शिक्षण शुल्क समितीने प्रत्येक कॉलेजमध्ये जाऊन तपासणी केली पाहिजे. शासनातील उच्चपदस्थ मंत्री महोदयांच्या मदतीने आज विद्यार्थ्यांची लूट केली जात आहे. या विषयावर 93ची सूचना दिल्यानंतर देखील निवेदनामध्ये कोणतेही आश्वासन दिलेले नाही. शिक्षण शुल्क समितीचे सक्षमीकरण करुन प्रत्येक विभागीय केन्द्राला समितीचे उपकेन्द्र असणे आवश्यक आहे. या दृष्टीने या शिक्षण शुल्क समितीसाठी किती दिवसात स्टाफ नेमण्यात येणार आहे ? तसेच ज्या तीन कॉलेजांनी समितीने दिलेल्या निर्देशांचा अवमान केलेला आहे त्यांच्यावर शासन किती दिवसात कारवाई करणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : या विषयावर यापूर्वी सदनामध्ये खूप चर्चा झालेली आहे. माननीय सदस्यांनी स्टाफ संदर्भात प्रश्न विचारला. 17 पदे मंजूर झालेली असून 11 पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित पदे लवकर भरण्यात येतील. बाकीच्या संगणक वगैरे बाबी दिलेल्या आहेत. शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेल्या फी व्यतिरिक्त जास्त फी घेण्यात येत असल्यासंबंधी कोणाची तक्रार असेल तर ते थेट शिक्षण शुल्क समितीकडे तक्रार करु शकतात, असा हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे.

श्री. श्रीकांत जोशी : शिक्षण शुल्क समितीच्या आदेशांचे शिक्षण संस्थाचालक पालन का करीत नाहीत ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक उदारहरण दिले तर संबंधितावर कारवाई करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : शुल्क ठरविल्यानंतर संस्था चालक नफेखोरी करतात. अतिरिक्त शुल्क आकारल्या बद्दल विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी शिक्षण शुल्क समितीकडे पाठविण्यात आल्याचे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी कोणकोणत्या कॉलेजेस् संदर्भात किती तक्रारी केलेल्या आहेत आणि त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : तीन कॉलेजेस् बाबत तक्रारी असल्याचे मी यापूर्वीच सांगितलेले होते. त्यामधील एक सिंहगडचे कॉलेज होते. अन्य दोन कॉलेजेस्ची नांवे मला आठवत नाहीत. ती नावे मी पटलावर ठेवीन. शिक्षण शुल्क समितीकडे आम्ही तक्रारी पाठवितो. त्या तक्रारींची तपासणी होते. शिक्षण शुल्क समितीने इन्स्पेक्शन केल्यानंतर शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना 15 हजार रु.परत केल्याचा इन्स्पेक्शन टीमचा रिपोर्ट आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) AA.1

SGB/ MHM/ KGS/ SBT/ MHM/ 13:40

श्री.सुरेश शेट्टी............

काही तक्रार असेल तर ती शिक्षण शुल्क समितीकडे पाठवावयाची आहे. त्यासंबंधी शिक्षण शुल्क समितीला अधिकार आहे. सुप्रीम कोर्टाने त्या समितीला अधिकार दिलेला आहे. त्यांनी स्वत: जाऊन इन्स्पेक्शन करावयाचे आहे व योग्य ती कारवाई करण्याचा निर्णय घ्यायचा आहे. शासनाला कारवाई करण्याचा अधिकार नाही.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून 2003 च्या जाहिरातीनुसार 86 उमेदवारांची कक्ष अधिकारी पदासाठी निवड होऊनही अद्याप नियुक्ती न मिळणे.

**मु.शी.**: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून 2003 च्या जाहिरातीनुसार 86 उमेदवारांची कक्ष अधिकारी पदासाठी निवड होऊनही अद्याप नियुक्ती न मिळणे यासंबंधी प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 ची सूचना.

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी "महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून 2003 च्या जाहिरातीनुसार 86 उमेदवारांची कक्ष अधिकारी पदासाठी निवड होऊनही अद्याप नियुक्ती न मिळणे" या विषयावर नियम 93 ची जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, 29 उमेदवार गेले दोन महिने आपल्याला नियुक्ती मिळावी यासाठी हेलपाटे घालीत आहेत. अपंगांचा अनुशेष भरल्याशिवाय नव्याने नियुक्ती देण्यास स्थगिती दिलेली आहे त्यामुळे विलंब होत आहे हे खरे आहे काय? शासनाने ज्या 53 उमेदवारांना नियुक्ती दिली त्यामध्ये 2 अपंग उमेदवारांचा समावेश असल्यामुळे अपंगांची टक्केवारी पूर्ण झालेली असून या 29 उमेदवारांच्या नियुक्तीला कोणताही अडथळा असण्याचे कारण नाही. म्हणून या 29 उमेदवारांना त्वरित नियुक्ती देण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : अपंगांचा अनुशेष भरल्याच्या संदर्भातील छाननी विधी व न्याय विभागाकडून करवून घेत आहोत. कोणत्याही परिस्थितीत उद्या किंवा परवा या संदर्भातील नियुक्ती देण्याचा निर्णय शासन निश्चितपणे घेईल.

**उपसभापती** : या निर्णयाला विलंब कोणी लावला?

श्री.राजेश टोपे : विधी व न्याय विभागाकडून एवढीच छाननी केली जात आहे की, 3 टक्क्याच्या प्रमाणात अपंग उमेदवार भरले आहेत की नाही? ही टक्केवारी भरली गेली आहे.

**उपसभापती** : या गोष्टीला जाणीवपूर्वक विलंब करणारे कोण आहेत? कोणी विशिष्ट अधिकाऱ्यांनी विलंब केला आहे का?

श्री.राजेश टोपे : हेतुपुरस्सर विलंब अजिबात झालेला नाही. उद्या किंवा परवापर्यंत निश्चितपणे निर्णय घेऊ.

**उपसभापती** : 93 ची सूचना उपस्थित झाल्यानंतर कारवाई सुरु झाली का?

श्री.राजेश टोपे : मी या खात्याचा राज्यमंत्री या नात्याने जबाबदारीने सांगतो, निवड झालेले कक्ष अधिकारी मला येऊन भेटले होते, त्यांच्या सगळयांच्या नियुक्त्या व्हाव्यात या दृष्टीने मी अतिरिक्त मुख्य सचिव यांना सूचना केली होती. परंतु विधी व न्याय विभागाकडे फाईल गेलेली आहे. आज किंवा उद्या अभिप्राय घेऊ.

**उपसभापती** : कित्येक वर्षे हे उमेदवार न्यायाच्या प्रतिक्षेत थांबले आहेत. वय उलटून गेल्यानंतर त्यांना नियुक्ती दिली जाणार आहे का? जे अधिकारी जाणीवपूर्वक विलंब करतात त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात?

श्री.राजेश टोपे : उद्या किंवा परवापर्यंत निर्णय घेतला जाईल एवढेच खात्रीने आश्वासन देतो. विधी व न्याय विभागाकडे नस्ती पाठविली आहे. त्यांची संमती घेऊन नियुक्ती देण्यात येईल.

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्रात अपंगांची नेमकी संख्या किती आहे याची माहिती महाराष्ट्र शासनाकडे नाही. राज्यात अपंगांची संख्या 12 लाख आहे, 13 लाख आहे की 15 लाख आहे, याविषयी मंत्रीमहोदयांकडे माहिती आहे का? त्यांना न्याय कसा देणार आहात?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 86 उमेदवारांची बॅच होती. त्यापैकी 53 उमेदवारांना नियुक्ती दिली आहे. 33 उमेदवार अद्याप नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. परंतु या प्रश्नात महाराष्ट्रातील अपंगांच्या टक्केवारीचा विषय येणार नाही. सगळी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. परीक्षा पूर्ण झाली आहे, तोंडी मुलाखती झाल्या आहेत. लोकसेवा आयोगाने उमेदवारांची यादी शासनाकडे सादर केली आहे. नियुक्ती देणे एवढेच काम शिल्लक आहे. अपंगांच्या टक्केवारीची छाननी पूर्ण होऊन नियुक्ती द्यावयाची आहे.

**उपसभापती** : लवकर नियुक्ती दिली जावी.

-----------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: नांदेड जिल्हयातील बाभळी धरणाचे काम रोखण्याचा आंध्रप्रदेशातील

काही राजकीय पक्षांनी केलेला प्रयत्न

**मु.शी.**: नांदेड जिल्हयातील बाभळी धरणाचे काम रोखण्याचा आंध्रप्रदेशातील काही राजकीय पक्षांनी केलेला प्रयत्न यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 ची सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, वि.प.स. यांनी "नांदेड जिल्हयातील बाभळी धरणाचे काम रोखण्याचा आंध्रप्रदेशातील काही राजकीय पक्षांनी केलेला प्रयत्न " या विषयावर नियम 93 ची जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनामुळे आमचे समाधान झालेले आहे.

---------------

(नंतर श्री.जुन्नरे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नांदेड येथील गुरु-ता-गद्दी कार्यक्रमासाठी केंद्रशासनातर्फे वितरीत करण्यात आलेला निधी कमी खर्च करणे.

**मु. शी.** : "नांदेड येथील गुरु-ता-गद्दी कार्यक्रमासाठी केंद्रशासनातर्फे वितरीत करण्यात आलेला निधी कमी खर्च करणे" याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, श्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. छगन भुजबळ ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, श्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल यांनी "नांदेड येथील गुरु-ता-गद्दी कार्यक्रमासाठी केंद्रशासनातर्फे वितरीत करण्यात आलेला निधी कमी खर्च करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीकांत जोशी : सभापती महोदय, नांदेडमध्ये गुरु-ता-गद्दी हा जो कार्यक्रम आहे तो अतिशय महत्वाचा आहे. यासंदर्भातील काम आपण मेंन्टेन केले नाही तर आपले नाक कापले जाईल. या कार्यक्रमासाठी 99 कोटी रुपये उपलब्ध असतांना आतापर्यंत केवळ 3 कोटी रुपयेच खर्च झालेले आहेत. त्यामुळे या कामाला गती देण्याची आवश्यकता आहे. या कामाच्या संदर्भात विशेष अधिकार वापरुन हे काम लवकर पूर्ण केले नाही तर ते योग्य होणार नाही. या कार्यक्रमासाठी देश-परदेशातील जवळ जवळ 50 लाखाच्यावर लोक विमानाने, हेलिकॉप्टरने येणार आहेत. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न आहे की, या कामासाठी एकूण किती निधी मिळाला व त्यापैकी आतापर्यंत किती निधी वापरला आहे व किती निधी परत गेलेला आहे?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या कार्यक्रमाअंतर्गत निधी परत गेलेला नाही. गुरु-ता-गद्दीच्या कार्यक्रमात वेगवेगळया एजन्सीज काम करीत आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे 11 कामे हाती घेण्यात आली असून त्यातील 6 कामे प्रगतीपथावर असून, 5 कामे निविदा स्थरावर आहेत. ही कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावी म्हणून या कामाची देखरेख एक एक्झीकेटीव्ह इंजिनिअर तसेच सुप्रिटेंडंट इंजिनिअर करणार असून त्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. दिनांक 3 मार्च 2007 रोजी नांदेड येथे भारताचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री एका कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी सर्व कामाच्या संदर्भात आढावा घेऊन सांगितले की, सार्वजनिक बांधकाम खात्याचे काम अधिकाधिक चांगल्या प्रगतीमध्ये सुरु आहे.

--------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिडकोने माहिती व तंत्रज्ञानासाठी राखीव असलेला भुखंड कमी दरात विकणे.

**मु. शी.** : सिडकोने माहिती व तंत्रज्ञानासाठी राखीव असलेला भुखंड कमी दरात विकणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "सिडकोने माहिती व तंत्रज्ञानासाठी राखीव असलेला भुखंड कमी दरात विकणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वाशी येथे सेक्टर 30 मधे सिडकोचा प्लॉट आहे. सिडकोचे 8 प्लॉट हे माहिती व तंत्रज्ञानासाठी राखीव ठेवलेले असून त्यापैकी 7 प्लॉटची निविदा काढून त्या विकण्यात आलेल्या आहेत. या भूखंडाचे आरक्षण काढून टाकून तो वाणिज्य वापरासाठी त्याचा उपयोग करण्यात आलेला आहे. हा प्लॉट अतिशय कमी दरात विकण्यात आलेला आहे. सिडकोच्या भूखंडाचे वाटप करण्याच्या संदर्भात मुख्य सचिव श्री. डी.के.शंकरन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आलेली असून या समितीने देखील या प्लॉटच्या वाटपात सिडकोला तोटा सहन करावा लागलेला आहे, तसेच या भूखंडासाठी झालेला करार हा सिडकोला फायदेशीर नसल्याचा अहवाल दिलेला आहे. तसेच बिना निविदा काढून हा प्लॉट विकणे योग्य नसल्याचेही त्यांनी म्हटलेले आहे. प्लॉटच्या संदर्भात जो करार करण्यात आलेला आहे तो रद्द करण्यात यावा असे मुख्य सचिव श्री. डी.के.शंकरण यांनी म्हटले आहे. यासंदर्भात समितीने अहवाल दिलेला असला तरी त्यांची शिफारस रद्द झालेली नाही, यासंदर्भात चौकशी झाली नाही. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न आहे की, हा प्लॉट रेल्वेस्टेशन समोर असून देखील अत्यंत कमी दरात ज्या विकासकाला कारण नसतांना विकलेला आहे त्यासंदर्भात आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यासंदर्भात मुख्य सचिव श्री. डी.के.शंकरन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. सिडकोने हे प्लॉट विकल्यामुळे मोठे नुकसान झालेले आहे. त्यासंदर्भात हायकोर्टात दोन केसेस दाखल करण्यात आलेल्या असून या दोन्ही केसेस क्लब करुन लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. या विषयाच्या संदर्भात शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. सिडकोने जे प्लॉट विकलेले आहेत ते रद्द करावे अशा सूचना शासनाने सिडकोला दिलेल्या आहेत. तसेच कोर्टामध्ये शासनाच्या वतीने सदर वाटप रद्द करण्यात यावे अशीच भूमिका राहणार आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिवंडी शहरातील यंत्रमागासाठी व्यवस्थीत विद्युत पुरवठा न केल्यामुळे संतप्त यंत्रमागधारकानी काढलेल्या मोर्च्यावर पोलिसांनी केलेला लाठीमार.

**मु. शी.** : भिवंडी शहरातील यंत्रमागासाठी व्यवस्थीत विद्युत पुरवठा न केल्यामुळे संतप्त यंत्रमागधारकानी काढलेल्या मोर्च्यावर पोलिसांनी केलेला लाठीमार" याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे पाटील ( उर्जामंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "भिवंडी शहरातील यंत्रमागासाठी व्यवस्थित विद्युत पुरवठा न केल्यामुळे संतप्त यंत्रमागधारकानी काढलेल्या मोर्च्यावर पोलिसांनी केलेला लाठीमार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरामध्ये गेल्या काही दिवसांपासून विजेचा खेळखंडोबा सुरु झालेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातच ही परिस्थिती निर्माण झ ाालेली आहे. भिवंडी शहरामध्ये 7.5 लाख यंत्रमागधारक आहेत. तेथे दिवसातून चार-पाच तास नव्हे तर 17-18 तास विजेचे भारनियमन होत आहे. पडघा येथील दोन ट्रान्सफॉर्मावर बंद पडल्यामुळे तेथील कामगारांना आणि नागरिकांना दहा-बारा दिवस त्रास सहन करावा लागला. ट्रान्सफॉर्मर वेळोवेळी बंद पडत असल्यामुळे यासंबंधी एक आराखडा तयार केला आहे त्याची अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे ? लोडशेडींगमुळे ठाणे जिल्ह्यातील सर्व उद्योग बंद पडले आहेत. येथील उद्योगधंदे दुसऱ्या राज्यात जात आहेत. भिवंडी शहरातील परिस्थिती केव्हा सुधारणा होणार आहे जेणेकरुन तेथील यंत्रमाग कामगार आणि नागरिकांना दिलासा मिळेल. भिवंडी शहरात होत असलेल्या भारनियमनाला कंटाळून तेथील नागरिकांनी टोरंट कंपनीवर मोर्चा नेला. हा मोर्चा कोणत्याही संघटनेमार्फत काढण्यात आला नव्हता तर नागरिकांनी उत्स्फूतपणे काढला होता. असे असताना त्यांच्यावर केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या केसेस मागे घेतल्या जातील काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय,गेल्या काही दिवसांमध्ये संपूर्ण राज्यामध्ये वीज पुरवठ्याच्या बाबतीत अडचण निर्माण झालेली आहे. पडघा येथील विद्युत केंद्रामध्ये दोन वेळा पॉवर डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉर्मर फेल झाल्यामुळे भिवंडी आणि आजुबाजूच्या परिसरामध्ये विद्युत पुरवठ्यामध्ये खंड पडला होता. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्यामध्ये होत असलेली वीज चोरी, वीज गळती आणि अनधिकृत कनेक्शन्स यावर कायदेशीर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने राज्य वितरण कंपनीने प्रायोगिक तत्त्वावर फ्रॅन्च्याइजी पध्दतीने विजेची गळती रोखण्यासाठी, अनधिकृत कनेक्शन्स रोखण्यासाठी, रिकव्हरी करण्यासाठी, ग्राहकांना चांगल्या पध्दतीने सर्व्हिसेस देण्यासाठी गुजरात राज्यातील टोरंट कंपनीला ओपन बिडींगच्या माध्यमातून हे काम दिलेले आहे. गुजरात राज्यातील दोन महत्वाच्या शहरांमध्ये अशाप्रकारचा प्रश्न निर्माण झाला होता, तेव्हा त्याठिकाणी फ्रॅन्च्याइजी पध्दतीने टोरॅन्टो पॉवर कंपनीकडे ही जबाबदारी सोपविली होती. याच कंपनीची भिवंडी शहरात नियुक्ती करण्यात आलेली आहे. पडघा येथील पॉवर डिस्ट्रीब्युशनमध्ये दोष निर्माण झाल्यामुळे तेथील लोकांचा रोष टोरंट कंपनीवर आलेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील...........

पडघा येथे 220 के.व्ही.चे उपकेंद्र आहे. पडघा येथील ट्रान्सफॉर्मर मधील दोष दूर करण्यासाठी एक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्याची अंमलबजावणी सहा महिन्यात करण्यात येईल. ट्रान्सफॉर्मरच्या अनुपलब्धतेमुळे प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा हे ट्रान्सफॉर्मर देशात कुठे मिळत असतील तर ते मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्यांनी केसेस संबंधी प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, या संदर्भातील माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---------------

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती शहरातील राजकमल वीज केंद्रावर व जूनी वस्ती बडनेरा वीज केंद्रावर जाऊन संतप्त जनतेने तोडफोड करणे

**मु. शी.** : अमरावती शहरातील राजकमल वीज केंद्रावर व जूनी वस्ती बडनेरा वीज केंद्रावर जाऊन संतप्त जनतेने तोडफोड करणे याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जामंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, वि. प. स. यांनी "अमरावती शहरातील राजकमल वीज केंद्रावर व जूनी वस्ती बडनेरा वीज केंद्रावर जाऊन संतप्त जनतेने तोडफोड करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( उप प्रश्न नाहीत. )

----------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाच्या विविध कामांच्या वाटपामध्ये शासनाचे नियम डावलून केलेल्या वाटपाची सखोल चौकशी करुन त्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : शासनाच्या विविध कामांच्या वाटपामध्ये शासनाचे नियम डावलून केलेल्या वाटपाची सखोल चौकशी करुन त्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता याबाबत श्री. सुरेश जेथलिया,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरशे जेथलिया यांनी "शासनाच्या विविध कामांच्या वाटपामध्ये शासनाचे नियम डावलून केलेल्या वाटपाची सखोल चौकशी करुन त्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, लेखी निवेदनावरुन माझे समाधान झाले.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ या जिल्हयांत आठ तासाचे भारनियमन चालू असतानाही आणखी पाच तासांचे इमर्जन्सी लोडशेडींग करणे

**मु. शी.** : अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ या जिल्हयांत आठ तासाचे भारनियमन चालू असतानाही आणखी पाच तासांचे इमर्जन्सी लोडशेडींग करणे याबाबत श्री गोपीकिशन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जामंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी "अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ या जिल्हयांत आठ तासाचे भारनियमन चालू असतानाही आणखी पाच तासांचे इमर्जन्सी लोडशेडींग करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी दिशाभूल करणारे निवेदन केलेले आहे. मला याठिकाणी इमर्जन्सी लोडशेडींगसंबंधी प्रश्न विचारावयाचा आहे. अकोला शहरात सकाळी 4 तासाचे व संध्याकाळी पावणे चार तासाचे लोडशेडींग होते. अशाप्रकारे पावणे आठ तासाचे लोडशेडींग होत असतानाही नव्याने इमर्जन्सी लोडशेडींगच्या नावाखाली 24 तासांमध्ये कधीही लोडशेडींग करण्यात येते. याठिकाणी माझा माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, मिनीमम आणि मॅक्झिमम किती इमर्जन्सी लोडशेडींग केले पाहिजे याबाबत काही निकष आहेत काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, इमर्जन्सी लोडशेडींग का करावे लागते, हे आपण समजून घेणे आवश्यक आहे. याठिकाणी आपण आजारच समजून घेतला नाहीतर त्यासंदर्भात उपाययोजना समजून सांगता येणार नाही. सभापती महोदय, विजेच्या मागणीमध्ये आणि निर्मितीमध्ये शॉर्टफॉल असून तो भरुन काढण्यासाठी भारनियमनाचे टाईमटेबल तयार करण्यात आले आहे. त्याप्रमाणे ज्यावेळी भारनियमन चालू असते त्यावेळी अचानकपणे केंद्र शासनाच्या वीज निर्मिती केंद्रातील अथवा राज्य शासनाच्या वीज निर्मिती केंद्रातील ट्रान्सफार्मर किंवा ग्रीड फ्रिक्वेन्सीमध्ये प्रश्न निर्माण होतो. त्यावेळी आपल्याला इमर्जन्सी लोडशेडींग करावी लागते. तसे केले नाहीतर आपले राज्य किंवा आजूबाजूची 4-5 राज्ये अंधारात जाण्याची भीती असते. त्यामुळे इमर्जन्सी लोडशेडींग अशावेळी करावी लागते. त्यामुळे फिडर जर बंद पडलेतर याबाबतीत आपण इमर्जन्सी लोडशेडींग करण्याच्या दृष्टीने टाईमटेबल ठरविले आहे. त्यामध्ये पहिल्यांदा फिडर बंद करावा लागतो, त्यानंतर दुसरा व तिसरा अशाप्रकारे फिडर बंद करावे लागतात. हे मान्य आहे की, यावर्षी जास्तवेळा इमर्जन्सी लोडशेडींग करावी लागलेली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे मुझफ्फर -गोरखपूरच्या लाईनमध्ये झालेला बिघाड हे आहे. त्यातून 600-1000 मे.वॅ.वीज आपल्या राज्याला मिळावयास पाहिजे होती. तसेच, केंद्र शासनाच्या विद्युत केंद्रामध्ये व राज्याच्या विद्युत केंद्रामध्ये बिघाड निर्माण झाल्यामुळेही शॉर्टफॉल निर्माण झालेला आहे. यामध्ये अंडर फ्रिक्वेन्सी आणि रिले ॲटोमॅटीक्ली ऑपरेट या दोन सिस्टीम आहेत. त्यामध्ये कधी 30 सेकंदासाठी, 1 मिनिटासाठी, 5 मिनिटासाठी तर कधी 1 तासासाठीही अचानक प्लॅन्ट लोडशेडींग होते. अशाप्रकारची परिस्थिती काही एखाद्या जिल्हयापुरतीच मर्यादित नाहीतर संपूर्ण राज्यातील जिल्हयांसाठी आहे. त्याचा परिणाम सन्माननीय सदस्यांच्या जिल्हयांमध्ये दिसून आला.

(नंतर कु.गायकवाड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील.....

भारनियमन कमी करण्यासाठी अतिरिक्त वीज मिळविणे हा एकमेव उपाय आपल्यासमोर आहे. उपलब्ध असलेल्या विजेच्या संदर्भात लोड मॅनेजमेंट करणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यसराकारने इतर उद्योग घटकांशी चर्चा करण्यास सुरुवात केलेली आहे. एम.आय.डी.सी मधील उद्योग घटकांशी सरकार चर्चा करीत आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरीया : सभापती महोदय काही कारणास्तव शासनाला विजेचे भार नियमन करावे लागत आहे. अकोला जिल्हयामध्ये सकाळी चार तास व संध्याकाळी पावणे चार तास असे साधारणत: आठ तास विजेचे भार नियमन करण्यात येत आहे. इमर्जन्सी भार नियमनाच्या नावाखाली दहा तासाचे लोड शेडींग करण्यात येत आहे. आपल्याला राज्यामध्ये भार नियमन करावे लागत आहे हे आम्हाला मान्य आहे परंतु इमर्जन्सी भार नियमन करण्याबाबतची कारणे काय आहेत व इमर्जन्सी भार नियमनाचे कोणते निकष लावले जाणार आहेत या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. इमर्जन्सी भार नियमनाच्या नावाखाली दुप्पट भार नियमन राज्यात केले जात आहे. त्या संबंधी खुलासा करणे आवश्यक आहे. सभापती महोदय दररोज कोणती इमर्जन्सी असते ? या संदर्भात सन्माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

**उपसभापती** : सकाळी वीज प्रश्नावर ज्यावेळी चर्चा ठेवण्यात आली होती , त्यावेळी सन्माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यास उपस्थित होते पण सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सकाळच्या चर्चेचा विषय कृपया काढू नये.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, इमर्जन्सी लोड शेडींग म्हणजे प्लान लोड शेडीगच्या व्यतिरिक्त करण्यात येणारे लोड शेडींग. वेस्टर्न रिजन, लोड डिस्पॅच सेंटर यांच्याकडून लोड शेडींगच्या संदर्भात प्रत्येक सेकंदाची, मिनीटाची आकडेवारी नोंदविली जाते. ज्या ज्या वेळी ग्रीडची फ्रिक्वेन्सी 49 च्या खाली जाते त्या त्या वेळी अतिरिक्त लोड शेडींग करावे लागते. ज्या ज्या वेळी फ्रिक्वेन्सी खाली जाते त्या वेळी अतिरिक्त भार नियमन करावे लागते. इमर्जन्सी एक मिनिटासाठी होती किंवा एका दिवसासाठी होती हा प्रश्न येथे उपस्थित होत नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरींनी आपल्या भाषणात जे मुद्दे मांडले होते त्या संदर्भात काही पॉझिटीव्ह पॉइंट्स मला मांडता आले नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील......

आता सन्माननीय सदस्यांनी टेक्नीकल विषयावर प्रश्न विचारल्यावर सभागृहाने एक गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये विजेची टंचाई आहे. ज्यावेळी लो फ्रिक्वेन्सीमुळे ग्रीडर कोलॅप्स होण्याची शक्यता निर्माण होते त्या वेळी विजेचे अतिरिक्त भारनियमन करावे लागते.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे घोषणा देतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गुटखा सेवनामुळे राज्यातील युवा पिढीच्या आरोग्यास निर्माण झ
ालेला धोका

**मु. शी.** : गुटखा सेवनामुळे राज्यातील युवा पिढीच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, व इतर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाबा सिद्दीकी ( अन्न व औषधे प्रशासन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर व इतर विधानपरिषद सदस्य यांनी "गुटखा सेवनामुळे राज्यातील युवा पिढीच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( उपप्रश्न नाहीत. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

EE 4



**पृ. शी.** : श्री. ज.द.भुतांगे ,प्रभारी संचालक, व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी केलेली नियमबाहय साहित्य खरेदी.

**मु. शी.** : श्री. ज.द.. भुतांगे ,प्रभारी संचालक, व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी केलेली नियमबाहय साहित्य खरेदी याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, सागर मेघे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे पाटील ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,सागर मेघे,वि.प.स. यांनी "श्री. ज.द.भुतांगे ,प्रभारी संचालक, व्यवसायिक श्क्षिण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई यांनी केलेली नियमबाहय साहित्य खरेदी", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( उपप्रश्न नाहीत.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : आरे दुग्ध वसाहतीतील जागा एस.आर.ए प्रकल्प राबविण्यासाठी बिल्डरला दिली जाणे .

**मु. शी.** : आरे दुग्ध वसाहतीतील जागा एस.आर.ए प्रकल्प राबविण्यासाठी बिल्डरला दिली जाणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद

तावडे,संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिस अहमद ( पशुसंवर्धन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,संजय केळकर,वि.प.स. यांनी आरे दुग्ध वसाहतीतील जागा एस.आर.ए प्रकल्प राबविण्यासाठी बिल्डरला दिली जाणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : अकोला जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक व माध्यमिक अपंग शिक्षकांच्या भरतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**मु. शी.** : अकोला जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक व माध्यमिक अपंग शिक्षकांच्या भरतीमध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,जगदीश गुप्ता,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके ( शालेयशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,जगदीश गुप्ता,वि.प.स. यांनी अकोला जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक व माध्यमिक अपंग शिक्षकांच्या भरतीमध्ये झालेला गैरव्यवहार या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : नालासोपारा (पूर्व) येथील लालाभाई कंपाउंड परिसरात एका बालिकेचा मृतदेह विवस्त्रावस्थेत सापडणे

**मु. शी.** : नालासोपारा (पूर्व) येथील लालाभाई कंपाउंड परिसरात एका बालिकेचा मृतदेह विवस्त्रावस्थेत सापडणे याबाबत सर्वश्री संजय केळकर,रामनाथ मोते, जयंत पाटील,प्रा.शरद पाटील,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर,रामनाथ मोते,जयंत पाटील,प्रा.शरद पाटील,वि.प.स.यांनी नालासोपारा (पूर्व) येथील लालाभाई कंपाउंड परिसरात एका बालिकेचा मृतदेह विवस्त्रावस्थेत सापडणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**पृ. शी.** : पाचगाव,ता.मोहाडी,जि.भंडारा येथे दलित महिलेला जाळण्यात येणे.

**मु. शी.** : पाचगाव,ता.मोहाडी,जि.भंडारा येथे दलित महिलेला जाळण्यात येणे याबाबत सर्वश्री अरविंद सावंत व इतर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत व इतर वि.प.स. यांनी पाचगाव,ता.मोहाडी,जि.भंडारा येथे दलित महिलेला जाळण्यात येणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे भाईंदर ता.जि.ठाणे येथील आदिवासींची जमीन बिल्डरने बळकावणे.

**मु. शी.** : . मौजे भाईंदर ता.जि.ठाणे येथील आदिवासींची जमीन बिल्डरने बळकावणे.याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,वि.प.स.यांनी मौजे भाईंदर ता.जि.ठाणे येथील आदिवासींची जमीन बिल्डरने बळकावणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---------

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पाटबंधारे खात्यातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या निवड सूचीबाबत

**मु.शी.**: पाटबंधारे खात्यातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या निवड सूचीबाबत सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील व प्रा.शरद पाटील, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.राजेंद्र शिंगणे (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील व प्रा.शरद पाटील, वि.प.स.यांनी "पाटबंधारे खात्यातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या निवड सूचीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

**उपप्रश्न नाहीत**.

-----------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: एकतर्फी प्रेमातून कुमारी सत्या शोभनसिंग, रमाबाई चाळ आकुर्ली रोड यांचे घर श्री.अजय बहादूर सिंग याने पेटवून दिल्याबाबत

**मु.शी.**: एकतर्फी प्रेमातून कुमारी सत्या शोभनसिंग, रमाबाई चाळ आकुर्ली रोड यांचे घर श्री.अजय बहादूर सिंग याने पेटवून दिल्याबाबत

डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स.यांनी "एकतर्फी प्रेमातून कुमारी सत्या शोभनसिंग, रमाबाई चाळ आकुर्ली रोड यांचे घर श्री.अजय बहादूर सिंग याने पेटवून दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

उपप्रश्न नाहीत.

-----------------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बाबू गेनू कामगार क्रीडा केंद्राचा जलतरण तलाव व क्रीडा केंद्राचा काही भाग जबरदस्तीने हडप करण्याची बिल्डरने आखलेली योजना

**मु.शी.**: बाबू गेनू कामगार क्रीडा केंद्राचा जलतरण तलाव व क्रीडा केंद्राचा काही भाग जबरदस्तीने हडप करण्याची बिल्डरने आखलेली योजना याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, वि.प.स..यांनी "बाबू गेनू कामगार क्रीडा केंद्राचा जलतरण तलाव व क्रीडा केंद्राचा काही भाग जबरदस्तीने हडप करण्याची बिल्डरने आखलेली योजना" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

उपप्रश्न नाहीत.

-----------------

..4...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शिरोडा, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे रिक्षाचालक श्री.सत्यवान तेंडोलकर यांना झालेली मारहाण

**मु.शी.**: शिरोडा, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे रिक्षाचालक श्री.सत्यवान तेडोलकर यांना झालेली मारहाण याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.परशुराम उपरकर, वि.प.स..यांनी "शिरोडा, ता. वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे रिक्षाचालक श्री.सत्यवान तेडोलकर यांना झालेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------

..5..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सदर डीआयजी जमीन बघण्यासाठी गेले होते काय, जमीन बघण्यासाठी गेलेले असतांना तहसिलदार यांच्यासमोर जो लाठीचार्ज झाला त्याचे आदेश कोणी दिले होते, लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्यांना नुकसान भरपाई देणार काय ? तसेच, आय.जी.आणि एस.पी.राज्याबाहेर दोडामार्ग येथे गोवा राज्यामध्ये गेले होते. त्यांनी राज्याबाहेर जाण्यासाठी राज्य शासनाची पवरवानगी घेतली होती काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय,..........

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधिमंडळात एवढया वेळा प्रश्न विचारुन सुद्धा बदली होत नाही त्यामुळे हा एस.पी.माजला आहे. माझे काही वाकडे होत नाही, असे त्याचे म्हणणे आहे. नाही तरी मार खायचाच असेल तर आम्ही त्याला विधिमंडळात चोपून काढू. किती दिवस एका मंत्र्याच्या छायेखाली त्याला तुम्ही वाचविणार आहात ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला आहे की, एस.पी. व आय.जी. यांनी परराज्यात जाण्यासाठी परवानगी मागितली होती का ? यासंदर्भात........

श्री.दिवाकर रावते : माननीय उपमुख्यमंत्री सांगतात की, आम्ही बुलढाणा पॅटर्न लावू. एवढी काय मस्ती आहे त्या अधिका-याला की जो मंत्र्यांना झुकवतो ? काय चालले आहे ? या सूचनेसंबंधी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना सभागृहात बोलवा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, एवढेच नाही तर नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला जे निवेदन दिलेले आहे तेही चुकीचे आहे. रिक्षा चालकास मारहाण करण्यात आली आहे. जी वाहने ट्रॅफिक जाममुळे थांबली होती त्या पोलिसांच्या वाहनामध्ये कोण होते ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती विचारली आहे ती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे हे निवेदन राखून ठेवण्यात यावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही, असे मंत्री महोदय सांगत आहेत. अशा प्रकारे संबंधित अधिका-याला संरक्षण दिले जात आहे. त्या ठिकाणी स्वत:च्या पाहुण्यांसाठी लाठीचार्ज केलेला आहे.

.6......



श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, नारायण राणे यांना घाबरता म्हणून उत्तर देत नाही. राज्यात अशी दादागिरी चालणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, या विषयाशी सन्माननीय महसूल मंत्री, श्री.नारायण राणे यांचा काय संबंध आहे ?

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री, श्री.नारायण राणे यांचा झालेला उल्लेख कामकाजातून काढून टाकावा. सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन अन्यायकारक कारवाई पोलिसांनी केली असेल तर त्यासंदर्भात त्यांना जाब विचारण्यात यावा आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

-----------------

..7...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दि.15/3/07 रोजी पोलादपूर, जि.रायगड येथे गॅस गोदामामध्ये झालेला गॅसचा स्फोट

**मु.शी.**: दि.15/3/07 रोजी पोलादपूर, जि.रायगड येथे गॅस गोदामामध्ये झालेला गॅसचा स्फोट याबाबत श्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री जयंत प्र.पाटील व प्रा.शरद पाटील, वि.प.स..यांनी "दि.15/3/07 रोजी पोलादपूर, जि.रायगड येथे गॅस गोदामामध्ये झालेला गॅसचा स्फोट" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------

..8......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गॅस वितरण कंपनीने एक्सप्लोझिव्हची परवानगी घेतली होती काय ? जे नागरीकरण होते आहे त्या नागरीकरणाचा विचार करुन या ठिकाणी गॅस गोडाऊन्ससंबंधीचे नॉर्म्स बदलून गोडाऊन्स शहराच्या बाहेर जातील याचा विचार करणार काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

-----------------

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत**

( सभात्यागानंतर सभागृहात आलेले सर्व सन्माननीय सदस्य नियम 93 अन्वये पुकारलेल्या निवेदनांबाबत माननीय उपसभापतींना विचारणा करतात.)

**उपसभापती** : एकदा पुकारलेली निवेदने मी जर अशा प्रकारे पुन्हा पुकारावयाला लागलो तर या ठिकाणी मला आणखी 15 निवेदने घ्यावे लागतील.

( गोंधळ )

**उपसभापती** : आपल्याला सभात्याग करावयाला कोणी सांगितले ? आता सभात्यागाचे हे प्रायश्चित आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही प्रायश्चित भोगावयाला तयार आहोत, परंतु सभागृहात उपस्थित असलेले सदस्य ज्यावेळी त्यांचे नियम 93 अन्वयेचे निवेदन पुकारल्यानंतर पुढे ढकलण्यासंबंधी विनंती करतात त्यावेळी आपण ते पुढे ढकलता त्याप्रमाणे आता आमची नियम 93 अन्वयेची निवेदने पुन्हा पुकारण्याबाबतची विनंती मान्य करण्यात यावी, अशी मी या निमित्ताने आपल्याला विनंती करतो.

**उपसभापती** : या सभागृहात मी आपणा सर्वांची नियम 93 अन्वयेची निवेदने संबंधित सन्माननीय सदस्यांची नावे घेऊन पुकारली होती.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अर्थसंकल्पिय अधिवेशन,2007 चा शेवट गोड व्हावा, एवढीच आम्हा सर्वांची इच्छा आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, आपण काहीही काळजी करुन नका या अधिवेशनाचा शेवट हा गोडच होणार आहे. तरी देखील नियम 93 अन्वयेची निवेदने पुन्हा पुकारण्यास या सभागृहाची संमती असेल तर माझे काहीही म्हणणे नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे नियम 93 अन्वयेचे निवेदन ज्यावेळी सभागृहामध्ये पुकारले गेले त्यावेळी मी नव्हतो याचे कारण मी आपल्याला सांगतो.

**उपसभापती** : आपण मला माझ्या दालनात येऊन सदर कारण सांगावे, मी ऐकेन. ठीक आहे, आपण आपले कारण सांगावे.

श्री.विनोद तावडे : आमच्या येथे मुंबईचे श्री.जमटमल वाधवानी यांचे निधन झाले होते व त्यांच्या अंत्ययात्रेस माननीय श्री.लालकृष्ण आडवाणीही आले होते तसेच, मीही त्या अंत्ययात्रेला



17-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) GG - 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

गेलो होतो म्हणून मला सभागृहामध्ये उपस्थित होण्यास उशिर झाला. माझे नियम 93 अन्वयेचे निवेदन पुकारण्याकरिता आपली परवानगी असेल तर ठीक आहे अन्यथा मी खाली बसतो.

**उपसभापती** : ठीक आहे. निवेदन क्रमांक 30.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, हा अन्याय आहे. आपण आमची निवेदने पुन्हा पुकारण्यास नकार दिलेला आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आपण सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांचे कन्सेंट घ्यावे, मगच मी आपणास परवानगी देईन. सभागृहाची संमती असेल तर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचे नियम 93 अन्वयेचे निवेदन मी पुन्हा पुकारतो.

( सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य होकार देतात.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





JPK/ MHM/ SBT/ 14:10

पृ.शी. :माटुंगा येथे चालत असलेल्या अनधिकृत वेश्या व्यवसायाबाबत.

मु.शी. :माटुंगा येथे चालत असलेल्या अनधिकृत वेश्याव्यवसायाबाबत सर्वश्री.विनोद तावडे व इतर विधानपरिषद सदस्य यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे व इतर विधानपरिषद सदस्य यांनी माटुंगा येथे चालत असलेल्या अनधिकृत वेश्या व्यवसायाबाबत नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GG इ 4

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माटुंगा येथील सेनापती बापट मार्गावरील रुपारेल कॉलेजच्या बाजूला जे सत्कार हॉटेल व श्रीनिवास लॉज आहे तेथे राजरोसपणे वेश्याव्यवसाय चालतो व तेथे ज्यावेळी रुपारेल या महाविद्यालयामधील विद्यार्थिनी अल्पोपहाराकरिता जातात त्यावेळी त्यांना तेथील गि-हाईक बिनधास्तपणे नको ते प्रश्न धडधडीतपणे विचारतात यासंबंधी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने तक्रार केली असता सत्कार हॉटेलच्या गुंडांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यालयावर हल्ला केला. सदर हॉटेलमध्ये चालणारा वेश्या व्यवसाय सिध्द झालेला असून त्यावर होणा-या कारवाईवर कोर्टातून स्टे मिळविण्याकरिता तेथील पोलीस स्टेशनच मदत करते, ही वास्तविकता आहे. माननीय मंत्रिमहोदयांना मी या निमित्ताने अशी विनंती करीन की, त्यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन व्हिजिट करावी. सदर हॉटेलचा परवाना रद्द करण्याकरिता शासन लवकरात लवकर कारवाई का करीत नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर हॉटेलचा परवाना रद्द करण्यासंबंधीची नोटीस पाठविण्यात आलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रिमहोदय, आपले हे उत्तराचे च्यूईंग गम कोणत्या कंपनीचे आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सत्कार हॉटेलचे मालक श्री.देवनारायण तिवारी यांच्या हॉटेलवर व लॉजवर दोन ते तीन वेळा रेड टाकण्यात आली होती व त्यांना याबाबत सक्त ताकीदही देण्यात आली होती. सत्कार हॉटेलचा परवाना रद्द करण्यासंबंधीची कारवाई चालू आहे.

श्री.विनोद तावडे : माननीय मंत्रिमहोदयांनी तेथे प्रत्यक्ष जाऊन व्हिजिट करावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : आपण दोघेही जाऊन त्या ठिकाणी व्हिजिट देऊ.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**वि.स.वि.क्र.89बाबत.**

**उपसभापती** : सभागृहाच्या परवानगीने मी माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांना सांगू इच्छितो की, वि.स.वि.क्र.89 - अंधश्रध्दा निमुर्लनाचे जे विधेयक आहे, ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत त्यांना जो प्रस्ताव मांडावयाचा आहे, तो त्यांनी प्रथम मांडावा

---------

यानंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ठ व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक.

L.A. BILL NO. LXXXIX OF 2005.

(A BILL TO BRING SOCIAL AWAKENING AND AWARENESS IN THE SOCIETY AND TO CREATE A HEALTHY AND SAFE SOCIAL ENVIRONMENT WITH A VIEW TO PROTECT THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AGAINST THE EVIL AND AGHORI PRACTICES AND CUSTOMS THRIVING, ON IGNORANCE, AND TO COMBAT AND ERADICATE THE EVIL AND SINISTER PRACTICES AND AGHORI PRACTICES BORN OUT OF BELIEF PROPAGATED IN THE NAME OF SOME SO CALLED DIVINE OR SUPERNATURAL OR MAGICAL POWERS OR EVIL SPIRITS COMMONLY KNOWN AS BALCK MAGIC BY QUACKS AND CONMEN WITH SINISTER MOTIVE OF EXPLOITING AND HARMING MENTALLY, PHYSICALLY AND FINANCIALLY THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AND THEREBY DESTROYING THE VERY SOCIAL FIBRE OF THE SOCIETY; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.)

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्यायमंत्री) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक-89 अंधविश्वास आणि अज्ञानावर पोसल्या जाणा-या अनिष्ठ व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, तसेच समाजातील सर्वसामान्य लोकांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण करुन त्यांचे नुकसान करण्याच्या, व त्याद्वारे समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने वैदू व भोंदूबाबा यांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणा-या तथाकथित अतींद्रिय किंवा अतिमानुष शक्ती किंवा चमत्कार करुन भूतपिशाच्य यांच्या नावाने जनमानसात रुजवलेल्या अंध विश्वासापोटी निर्माण होणा-या अनिष्ट व दुष्ट प्रथांचा व अघोरी रुढींचा मुकाबला करुन त्याचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने यासंबंधात समाजामध्ये जागृती व जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता, आणि तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 27 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत.</u>**

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. काल मुंबईमध्ये हिंदू राष्ट्र सेना या संघटनेने .....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आज आपल्याला औचित्याचे मुद्दे उपस्थित करावयाचे नाहीत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, काल मुंबईमध्ये "हिंदू राष्ट्र सेना" या संघटनेने स्टार न्यूज चॅनलच्या कार्यालयावर हल्ला केलेला आहे. त्यासंदर्भात पोलिसांनी कोणती कारवाई केली ? याबाबतची माहिती माननीय गृह राज्यमंत्र्यांकडे आहे काय ? असेल तर त्यांनी ती माहिती सभागृहामध्ये द्यावी. सभापती महोदय, काय चालले आहे, हे मला कळत नाही. देशामध्ये निरनिराळया घटना घडत असतात.

**उपसभापती** : मी उभा आहे. प्रथम सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो औचित्याचा मुद्दा नाही.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उरण (जि.रायगड) तालुक्यातील खोपटा खाडी किना-यावरील खारफुटी नष्ट होण्याची निर्माण झालेली भिती.

**मु. शी.** : उरण (जि.रायगड) तालुक्यातील खोपटा खाडी किना-यावरील खारफुटी नष्ट होण्याची निर्माण झालेली भिती यासंबंधी सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उरण (जि.रायगड) तालुक्यातील खोपटा खाडी किनाऱ्यावरील खारफुटी नष्ट होण्याची निर्माण झालेली भिती, सिडको प्रशासनाचे बंदी आदेश धाब्यावर बसवून द्रोणागिरी नोड परिसरातील विविध प्रकल्प कंपन्यांनी घाण, कचरा खाडी किनारी टाकल्यामुळे दुर्मिळ खारफुटी नष्ट होणे, सिडकोच्या नोड परिसरातील केंद्रीय प्रकल्प व अनेक खाजगी कंपन्यांनी उभारलेली कंटेनर्स, गोदामे, कंपन्या व प्रकल्पात साठवणाऱ्या घाण कचऱ्यांची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा नसणे, कचरा, दुर्गंधीयुक्त घाण खोपटा पुला नजीक रस्त्यावर टाकण्यात येणे, त्यामुळे खारफुटी झाडझुडपे नष्ट होण्याचा निर्माण झालेला धोका, याकडे खाजगी कंपन्या व शासनाने जाणूनबुजून दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने खाजगी कंपन्यांवर कडक कारवाई करण्याची गरज, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, खाडी किनाऱ्यावरील खारफुटीच्या ठिकाणी कचरा टाकण्याचे काम हया कंपन्या करीत आहेत. यामुळे दुर्मिळ खारफुटी नष्ट होत आहेत. याकडे सिडको प्रशासनाने म्हणावे तेवढे लक्ष दिलेले नाही. येथे कचरा टाकणाऱ्या कंपन्यावर सिडकोचे नियंत्रण नाही, या ठिकाणी सिडकोने कचरा विल्हेवाटीची स्वतंत्र यंत्रणा असल्याचे दिसत नाही, ही यंत्रणा उभारली पाहिजे. खारफुटींचे रक्षण करण्याची मोहीम सिडको हाती घेईल का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**पृ.शी**. : सिंधुदुर्ग जिल्हयातील 8468 हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली घेण्याचा शासनाने घेतलेला निर्णय.

**मु.शी**. : सिंधुदुर्ग जिल्हयातील 8468 हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली घेण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयसंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यातील ६२००० हेक्टर जमिन वनसंज्ञेखाली घेत असताना त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे४२५०० हेक्टर जमिन वनसंज्ञेखाली घेण्याचा निर्णय शासनाने १९९७ साली घेण्यात येणे, त्यानंतर जिल्ह्यातील वनसंज्ञेखाली जमिनीचे पुन्हा सर्वेक्षण होऊन त्यात सुधारणा करुन ८४६८ हेक्टर जमिन संपादन करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी त्यानंतर घेणे, वनसंज्ञेखाली जमिनी घेण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना त्या जमिनीत लागवड करण्यास, त्यांची स्वत:ची झाडे तोडण्यास करण्यात आलेला मज्जाव, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, या विषयावर या सभागृहात चर्चा होऊन समितीचे गठण होऊन त्याद्वारे हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देणे, या समितीने अद्याप काहीही निर्णय न घेणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात शासनाबाबत चिड निर्माण होणे, निर्माण झालेला गंभीर प्रश्न या प्रश्नावर तेथील शेतकऱ्यांनी वारंवार मोर्चे आयोजित करुन धरणे व उपोषण इत्यादी मार्गाचा अवलंब करुन शासनाचे लक्ष वेधूनसुध्दा शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, या सर्व बाबीवर शासनाने ठोस निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याची नितांत आवश्यकता व शासनाने करावयाची उपाययोजना."

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील शेतक-यांच्या संदर्भात अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना मांडली असून ती सभागृहात चर्चेला आलेली आहे. 1997 साली शासनाने वन कायद्यानुसार महाराष्ट्रातील अतिरिक्त असलेली 62500 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली घेतली आहे तेव्हा तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.गौतम होते त्यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सिंधुदुर्ग जिल्हयातील 42500 हेक्टर जमीन वनसंज्ञेसाठी घेतली आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील शेतकरी 1997 पासून जमीन परत मागत आहेत. या प्रश्नावर तेथील शेतकऱ्यांनी वारंवार मोर्चे काढले आहे, धरणे व उपोषण या मार्गांचा अवलंब केलेला आहे. तरीही अद्यापपर्यंत याबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही. राज्यातील 62000 हेक्टर वनसंज्ञेच्या जमिनीपैकी 42500 हेक्टर जमीन सिंधुदूर्ग जिल्हयातील आहे. त्यानंतर पुन्हा त्याचे सर्वेक्षण होऊन त्यात सुधारणा करुन 8468 हेक्टर जमीन वनसंज्ञेसाठी संपादन करण्याचा निर्णय घेतला आहे. बाकीची जमीन शेतकऱ्यांना परत करावी अशा प्रकारचा शासनाचा अहवाल आहे. 1997 च्या सर्वेक्षणाच्या आधारावर राज्याचे वन सचिव किंवा माननीय वन मंत्री यांना न विचारता प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या कार्यालयाकडून सर्वोच्च न्यायालयात ॲफेडेव्हीट सादर केलेले आहे. या ॲफेडेव्हीटमध्ये वनसंज्ञेखाली येणारे खाजगी क्षेत्र 8716.08 हेक्टर एवढे दर्शविण्यात आलेले आहे, त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे यामुळे मात्र शेतकऱ्यांची अडचण होत आहे. 11 तारखेला सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतकरी लाक्षणिक उपोषणाला बसले होते. या प्रश्नामध्ये माननीय पालकमंत्र्यांनी लक्ष घालावे म्हणून हा विषय सभागृहात मांडण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन समितीचे गठण करण्यात आले होते. महाराट्राचे महसूल मंत्री माननीय श्री.नारायण राणे हे या समितीचे अध्यक्ष आहेत, तसेच ते सिंधुदुर्ग जिल्हयाचे पालकमंत्रीही आहेत, या समितीमध्ये माननीय वनमंत्री आहेत. श्री.जयंत प्र.पाटील, श्री.नितीन गडकरी, श्री.सुधीर सावंत, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना समितीसमोर बोलावले होते व त्यांना सांगितले आहे की, हा प्रश्न सिंधुदुर्ग जिल्हयाचा जिव्हाळयाचा प्रश्न असला तरी संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे त्यामुळे अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल. आज माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. 42500 हेक्टर जमिनीमधून सिंधुदूर्ग जिल्हयातील 12503 हेक्टर

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी .....

जमीन वनसंज्ञेसाठी मान्य केलेली आहे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा नवीन रिपोर्ट आलेला आहे. परंतु ॲफेडेव्हीटमध्ये 8716 हेक्टर जमीन सर्व्हेमध्ये दाखविली गेली आहे.

सर्वोच्च न्यायालयात ॲफेडेव्हीट दाखल केल्याचे सांगितले जात आहे. परंतु शासन सर्वोच्च न्यायालात रिट पिटीशन कधी दाखल करणार आहे ?

यानंतर श्री.सुंबरे.....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री. गागरे नंतर --- 14:25

श्री. गुरूनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, जेव्हा ही लक्षवेधी सूचना दिली होती तेव्हा त्यात वन खात्यासंबंधी तसेच महसूल खात्यासंबंधीचे दोन प्रश्न असल्याने मला सांगण्यात आले होते की, वन खात्यासंबंधीचा प्रश्न विचारला आहे तर त्यात महसूल खात्यासंबंधीचा प्रश्न विचारू नये. परंतु आता येथे या निवेदनातून महसूल आणि वन या दोन्ही खात्यासंबंधातील प्रश्नाला उत्तर माननीय महसूल मंत्र्यांनी दिलेले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद. सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, माणगाव खोऱ्यामध्ये आकारी पड जमीन एकूण 7072 हेक्टर इतकी आहे आणि ती शासनाच्या नावे आहे. त्यापैकी 1931 शेतकऱ्यांना सुमारे 2312 हेक्टर जमिनीचे वाटप करण्यात आले आहे आणि उर्वरित जी जमीन उपलब्ध आहे ती ज्या शेतकऱ्यांनी त्यासाठी अर्ज केलेला आहे त्यांना आपण देणार का ? आणि कबुलायतदार या संबंधातील जो प्रश्न आहे त्यासंबंधात सदर जमीन ज्या शेतकऱ्यांना द्यायला पाहिजे ती देण्याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात, त्यांनी आता विचारलेल्या उपप्रश्नांना अनुलक्षून मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो की, वनसंज्ञा आणि खाजगी वन हे दोन भिन्न, वेगवेगळे प्रश्न आहेत. वन संज्ञा या संबंधात सर्वोच्च न्यायालयाने 12.12.1996 ला तामिळनाडूच्या गोदा वर्मन केसच्या संबंधात असा आदेश दिला आहे की, वन सदृश्य जमीन किती आहे याची नोंद प्रत्येक राज्यांकडून करून घेऊन ती आम्हाला कळविण्यात यावी. त्यासाठी त्यांनी एक समिती देखील केली. सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला तेव्हा आणि आताही वनसंज्ञा म्हणून कोणताही कायदा नव्हता व नाही. केवळ वन सदृश्य अशी जमीन किती आहे याची माहिती सर्वोच्च न्यायालयाने मागितली होती. त्यानंतर वन खात्याने सर्व राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले की, त्यांनी त्यांच्याकडे वनसदृश्य अशी किती जमीन आहे याचा आढावा घेऊन माहिती द्यावी. त्याप्रमाणे आपल्याकडे एकूण 1,92,831 हेक्टर इतकी वनसदृश्य जमीन असल्याचे सांगण्यात आले. त्या दिवसापासून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण झाला. मात्र मी माननीय सदस्यांना आणि सदनाला सांगू इच्छितो की, ही वन संज्ञेखाली येणारी जमीन शेतकऱ्यांच्या ताब्यात आहे, ती शासनाच्या ताब्यामध्ये नाही. राज्यातील वनसंज्ञेखाली येणारी कोणतीही जमीन सरकारच्या ताब्यामध्ये नाही. 1975 च्या वन कायद्याप्रमाणे जी नोटीफाईड अशी

..... जेजे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणे .....

जमीन शेतकऱ्यांना जाऊन बाकीची जमीन सरकार जमा झाली आहे आणि ती सरकारच्या नावे सातबारावर घ्यावी लागली आहे. वनसंज्ञेखालील जमीन अशी कोणतीही नोंद सातबाराच्या उताऱ्यावर नाही. त्यामुळे त्या सगळ्या जमिनींवरील पिकांचा फायदा हे त्याची लागवड करणारे शेतकरीच घेत आहेत. सभापती महोदय, 1975 च्या वन कायद्यानुसार खाजगी वनांच्याही नोंदी होऊ लागल्याने शेतकऱ्यांमध्ये एक गैरसमज निर्माण झाला की, खाजगी वन आणि वन कायदा एकच आहे आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला आणि अशी जमीन 42 हजार हेक्टर पेक्षा जास्त आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... केके 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे...

अशाप्रकारे 42 हजार हेक्टर जमीन जास्त असल्यामुळे राज्य सरकारने पुन्हा त्या जमिनीची मोजणी करावयास घ्यावी किंवा सर्व्हे करावयास घ्यावे असे सांगितल्यानंतर तीन वेळा सर्व्हे करण्यात आला. आणि आज अंतिम सर्व्हे झाल्यानंतर त्यामध्ये फक्त 1875 हेक्टर जमीन वन संज्ञेखाली असल्याची माहिती उपलब्ध झाली. म्हणजे 42 हजार वरुन 1875 हेक्टर इतकी जमीन वन संज्ञेखाली आहे. 42 हजार हेक्टर क्षेत्रामध्ये खाजगी वन क्षेत्र असलेली जमीन वगळून वन संज्ञेखालील क्षेत्र 1875 हेक्टर आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, वन संज्ञेखालील 1875 हेक्टर क्षेत्रासंबंधी आपण सुप्रिम कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करणार आहात ते किती दिवसात करणार आहात? सभापती महोदय, वन संज्ञेबाबतची सर्व जिल्हयांची माहिती पोहोचली आहे. फक्त वन क्षेत्राचे सर्व्हे नंबर याबाबतची माहिती एक आठवडयात प्राप्त होईल. ती आल्यानंतर येणाऱ्या कॅबिनेटमध्ये हा प्रस्ताव मंजूर करुन पुढील 15 दिवसाच्या आत सुप्रिम कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले जाईल. आणि राज्य सरकारकडून यापूर्वी वन संज्ञेखाली जमीन दाखवितांना चूक झाली असून 1875 हेक्टर इतकी जमीन वन संज्ञेखाली येते अशाप्रकारची सुधारणा संमत करावी अशी विनंती सुप्रिम कोर्टाला केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी सांगितले की, सुप्रिम कोर्टामध्ये प्रतिज्ञा पत्र सादर करीत असतांना अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली. ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती सादर केली त्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय? गेली 20 वर्षे कारण नसतांना या राज्यातील शेतकऱ्यांना नागविण्यात आले आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे हे झाले असल्यामुळे आपण त्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणार काय? जेणेकरुन आपले अधिकारी अशाप्रकारच्या चुकीची पुनरावृत्ती पुन्हा करणार नाहीत हे राज्यातील जनतेला देखील समजले पाहिजे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी सुरुवातीला उत्तर देतांना स्पष्ट केले आहे की, वन संज्ञेच्या जमिनीचे क्षेत्र मोजतांना खाजगी वन क्षेत्र अधिक शासकीय वन क्षेत्र मिळून एकूण जमिनीचे क्षेत्र मोजण्यात आले होते. आता फक्त वन संज्ञेखाली आलेल्या जमिनीचे क्षेत्र मोजतांना शासकीय वन आणि खाजगी वन क्षेत्र वगळून वन संज्ञेचे वेगळे क्षेत्र धरण्यात आले. त्यामुळे हे क्षेत्र कमी झाले. यापूर्वी प्रत्येक जिल्हयाचे वन संज्ञेखालील क्षेत्र जास्त दिसत होते ते आता कमी दिसत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

श्री. नारायण राणे....

आहे. त्याबाबतचे कारण मी आपणास सांगितले असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. माननीय सदस्यांचा प्रश्न होता की, गेली 20 वर्षे या जमिनीबाबत कोणत्याही नोंदी किंवा ती जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया नव्हती...

(अडथळा)

सभापती महोदय, याठिकाणी मी वन संज्ञेखालील क्षेत्र दाखवितांना चूक झाली असे म्हणालो. सुप्रिम कोर्टामध्ये जी आकडेवारी सादर केली गेली ती जास्त क्षेत्राची होती. त्यामध्ये 1975 च्या खाजगी वन कायद्यान्वये असलेली जमीन अधिक शासकीय वन जमीन धरुन वन संज्ञेखालील जमीन धरली. ही झालेली चूक लक्षात आल्यानंतर ॲक्चुअल वन संज्ञेखालील जमिनीचे क्षेत्र मान्य करावे असे सुप्रिम कोर्टाला सांगण्यात आले. त्यामुळे यामध्ये अधिकाऱ्यांकडून चूक होण्याचा प्रश्न नाही. याबाबत सुप्रिम कोर्टाला जी कारणे सादर केली जातील ती सुप्रिम कोर्टाने मान्य करावीत व ही वन संज्ञेखालील जमीन धरावी असे सांगितले जाईल. 1975 च्या वन कायद्याप्रमाणे 7/12 ला नोंद असलेली जमीन शेतकऱ्यांच्या ताब्यातून घेण्यात आलेली नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी सभागृहामध्ये अधिक सविस्तर स्वरुपाचे उत्तर दिले. परंतु हे उत्तर देत असतांना त्यांनी तीन वेळा सर्व्हे केल्याचे सांगितले. जर आपणाकडून याबाबतीत चूक झाली नव्हती तर तीन वेळा सर्व्हे कां केला?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (पुढे सुरू....

चूक झाली नाही तर शासनाला तीन वेळा याबाबतचा सर्व्हे का करावा लागला ? यामध्ये निश्चितपणे अधिकाऱ्यांची चूक झालेली आहे. नाहक शेतकऱ्यांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले गेलेले आहे. शेतकऱ्यांना उपोषण करण्यास लावलेले आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागलेला आहे. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.नारायण राणे : काही आंदोलने ही राजकीय झालेली आहेत. त्यामुळे कोणावर कारवाई करण्याचा प्रश्न नाही.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले त्यामधून नवीन प्रश्न निर्माण झालेला आहे. 42 हजार हेक्टर जमिनीपैकी फक्त 1800 हेक्टर वन संज्ञा म्हणून जमीन दाखविण्यात येते. याचा अर्थ असा होतो की, 40 हजार हेक्टर जमीन खाजगी वन म्हणून तशीच रहाणार आहे. ती जमीन शेतकऱ्यांना मिळणारच नाही. कोणत्याही प्रकारे ही 42 हजार हेक्टर जमीन वन जमीन म्हणूनच रहाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, 42 हजार हेक्टर जमिनीपैकी किती हेक्टर जमीन शेतकऱ्यांना शेतीसाठी, घर बांधण्यासाठी मोकळी रहाणार आहे ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, 1998 चा फॉरेस्ट ॲक्ट आहे. वन सदृश्य जमीनीवर वनेतर कामे करता येत नाहीत. त्यानंतर 1975 चा फॉरेस्ट ॲक्ट आला त्यामध्ये 12 हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत देण्यात आलेली आहे. उरलेली जमीन ही फॉरेस्ट म्हणून विचार करताना ती विकण्यात आली. त्याचा मोबदला शेतकऱ्यांना मिळणार आहे. सिंधुदूर्ग जिल्हयामधील 12 हेक्टर जमीन सोडून बाकीच्या जमिनीच्या नोंदी झालेल्या आहेत ,काही जमिनींच्या नोंदी व्हायच्या आहेत. 40 हजार हेक्टर पूर्ण फॉरेस्ट जमीन आहे, असा अर्थ होत नाही. याबाबतीमध्ये राज्य सरकार सुप्रीम कोर्टामध्ये काही गोष्टी मांडणार आहे. 12 एकर जमीन वनेतर कामे करण्यासाठी वन क्षेत्रावर लागवड करण्याठी घेण्यात येणारी रक्कम घेण्यात येऊन नये तसेच वन क्षेत्रात वनेतर कामासाठी तेवढेच दुसरे क्षेत्र देण्याची मागणी आहे, ते दुसरे क्षेत्र देण्यात येऊ नये, अशा दोन गोष्टी सुप्रीम कोर्टाकडे मागत आहोत. 12 हेक्टर जमीन परत देण्यात आली. त्याचा योग्य मोबदला किंवा शेती किंवा अन्य ॲक्टीव्हीटी शेतकरी करत असेल तर त्याबाबत त्याला मुभा देण्यात यावी, अशी सुप्रीम कोर्टाकडे मागणी करत आहोत.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : नागपूर शहरातील विस्थापित सिंधी समाजाला कायम स्वरूपी भाडेतत्वावर भूखंड देण्याची करण्यात आलेली मागणी.

**मु. शी**. : नागपूर शहरातील विस्थापित सिंधी समाजाला कायम स्वरूपी भाडेतत्वावर भूखंड देण्याची करण्यात आलेली मागणी, यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर शहरातील गेल्या 58 वर्षांपासून विस्थापित सिंधी समाजाला राहण्याकरीता शासनाने दिलेली जमीन, सदरहू समाजातील लोक हे भारत, पाकिस्तान विभाजनानंतर नागपूरमध्ये शरणार्थी म्हणून येणे, सन 1997-98 दरम्यान खामला येथील शरणार्थ्यांना नझुल विभागाकडून देण्यात आलेले भाडेतत्वावर भूखंड, त्याच परिसरामध्ये अनेक नागरिक अतिक्रमण करुन गेल्या अनेक वर्षापासून आपल्या कुटुंबियांसमवेत राहत असणे, परंतु त्या नागरिकांना भाडेतत्वावर भूखंड उपलब्ध करुन न देणे, समाजातील गोरगरीब सिंधी समाजातील शरणार्थींना सदरहू विभागाकडून लिज पट्टयाबाबत होत असलेला त्रास, सदरहू शरणार्थींना कायम स्वरुपी भाडेतत्वावर भूखंड देण्याकरीता नागरिकांनी केलेली मागणी, त्याचप्रमाणे उक्त लिज पट्टयांचे नुतनीकरण करुन कायमस्वरुपी भूखंड अतिक्रमित नागरिकांच्या नावावर करण्याकरीता नागरिकांची असलेली दीर्घकालीन मागणी, याबाबत शासनाकडे त्या भागातील नागरिकांनी वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापपावेतो त्यावर न झालेली कारवाई, परिणामी त्या परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे ( पुनर्वसन व मदतकार्य राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....

अप्रसिद्धीसाठी नाही / असुधारित प्रत

SKK/ MHM/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नागपूर शहरातील खामला येथे पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी सन 1955 मध्ये 507 भूखंड उपलब्ध करण्यात आले होते. शासन निर्णय, कमांक एनएनडी 2466/264580/अे, दिनांक 24.8.1972 च्या तरतुदीनुसार खामला येथे 244 निर्वासितांना स्थायी लीज पट्टयाने देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये चार संवर्ग करण्यात आलेले आहेत. स्पॉन्सर्ड ॲन्ड रजिस्टर्ड, अन स्पॉन्सर्ड ॲन्ड रजिस्टर, स्पॉन्सर्ड बट अन रजिस्टर्ड आणि अन स्पॉन्सर्ड ॲन्ड अन रजिस्टर्ड असे चार संवर्ग आहेत. अशाप्रकारे त्यांचे पुनर्वसन करण्याचे शासनाचे धोरण आहे. सध्या खामला येथील सिंधी बांधव विस्थापित आहेत. त्या जागेत त्या कुटुंबांनी रहावे यासाठी त्यांना जागा मालकी पट्टयाने वाटप करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल काय ? दिनांक 24-8-1972 च्या शासन निर्णयानुसार चार संवर्ग निर्माण केले आहेत, त्या सर्वांनाच संरक्षण देण्यात यावे....

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

अशी मी सिंधी बांधवाच्या वतीने विनंती करतो. त्या निर्णयामध्ये दुरुस्ती करण्यात येणार आहे काय ? 1 मे 1964 नंतर कब्जा केलेल्या धारकांकडून अतिक्रमण धारक म्हणून त्यावेळी त्या जागेची जेवढी किंमत होती तेवढी किंमत भरुन घेऊन त्यांना लीजवर पट्टे देण्यात येतील काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे, नागपूर येथील खामला या ठिकाणच्या निर्वासितांचा हा महत्वाचा प्रश्न आहे. या निर्वासितांसाठी 1955 ला 507 भूखंड तयार केलेले होते. त्यापैकी 244 व्यक्तींना पट्टे लीजवर दिलेले होते. मार्च, 2005 मध्ये तसेच जुलै, 2005 मध्ये या 244 व्यक्तींची लीजची मुदत संपली. या 244 लोकांच्या लीजचे रिन्यूअल करण्याचे काम चालू आहे. हे करीत असताना त्या ठिकाणी 213 अर्ज प्राप्त झाले. 153 लोकांच्या बाबतीत रिन्यूअल करीत आहोत. बाकीच्या लोकांच्या बाबतीत रिन्यूअल करण्याच्या प्रक्रियेमध्ये कागदपत्रांची तपासणी करीत आहोत. उरलेले जे 369 लीजधारक आहेत त्यांच्या दृष्टीने हा महत्वाचा प्रश्न आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे 1972 च्या जी.आर. प्रमाणे या सर्व बाबी तपासून घेत आहोत. कारण निर्वासितांसाठी असलेले हे भूखंड लीजवर देत असताना आपल्याला जे पुरावे लागतात त्यामध्ये प्रामुख्याने त्यांची शासनाकडे नोंदणी झालेली असली पाहिजे. त्यांच्याकडे सेटलमेंट कमिशनरचे प्रमाणपत्र असले पाहिजे. असे दोन तीन पुरावे लागतात. ते पुरावे तपासणचे काम करीत आहोत. 369 लोकांना त्या ठिकाणी पट्टे देत असताना 1972 चा जी. आर. मॉडिफाय करुन या संबंधित उरलेल्या लोकांना न्याय देण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे. त्यादृष्टीने शासनाचे प्रयत्न चालू आहेत. माननीय जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा अशा पध्दतीच्या सूचना दिलेल्या आहेत आणि सर्व कागदपत्रांची आणि पुराव्यांची तपासणी करुन उरलेल्या लोकांना भूखंड लीजवर देण्याच्या संदर्भात शासन कार्यवाही करीत आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

**पृ. शी.** : उरण परिसरामध्ये जेटी उभारण्याच्या संदर्भात सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे शासनाने होत असलेले आर्थिक नुकसान

**मु. शी.** : उरण परिसरामध्ये जेटी उभारण्याच्या संदर्भात सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे शासनाने होत असलेले आर्थिक नुकसान यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, भास्कर जाधव, सदाशिवराव पोळ, जगन्नाथ शेवाळे, वसंतराव पवार, प्रा. फौजीया खान, श्रीमती मंदा म्हात्रे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उरण परिसरामध्ये उलवा येथे नामांकित संस्थेची जेटी कार्यरत असतांना ग्रेट व्हाईट या कंपनीने त्याच परिसरात जेटी उभारण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने प्रस्ताव मंजूर केलेला असतांना, सदर प्रस्तावासंदर्भात सिडकोच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे असलेले आडमुठे धोरण, त्यांच्या हेतूपुरस्पर भुमिकेमुळे शासनाचे होत असलेले प्रचंड आर्थिक नुकसान, सिडकोनेच सीआरझेडचे उल्लंघन करुन घेतलेले निर्णय, सदर ठिकाणी एक जेटी कार्यरत असतांना त्याच बाजुला जेटी उभारण्यास परवानगी नाकारण्यात येत असल्याने संबंधितांची सदर प्रकरणी असलेली संशयास्पद भूमिका, सदर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन ग्रेट व्हाईट या कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन त्वरित निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी संबंधित अधिकाऱ्यांच्या दुटप्पी धोरणामुळे सदर कंपनीवर होत असलेला अन्याय, त्याचबरोबर सिडको अधिकाऱ्यांकडून घेण्यात येत असलेल्या संशयास्पद निर्णयामुळे शासनाच्या होत असलेल्या नुकसानीचा विचार करता, सदर प्रकरणी त्वरित सकारात्मक निर्णय घेण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री. राजेश टोपे : नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, निवेदनामध्ये सुरुवातीला मे. ग्रेट व्हाईट मरीन सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी उलवे नोडमधील सर्व्हे क्र. 37 तारघर येथील जागेची सप्टेंबर, 2004 मध्ये जेटी विकसित करण्यासाठी मागणी केली होती असे म्हटले आहे. यामध्ये तशी परिस्थिती नसून महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने जाहिरात काढली होती आणि टेंडर प्रोसेसमधून ही जेटी मंजूर करण्यात आली. त्यामुळे हे उत्तर चुकीचे आहे. त्यांनी जेटी मागितली नाही. त्या टेंडरमध्ये कोळसा, सल्फर, फॉस्पेट, खते असे काहीही नव्हते. त्यामुळे हे निवेदन चुकलेले आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, नवी मुंबईच्या सुधारित विकास आराखड्यानुसार ही जागा रहिवाशी क्षेत्रात मोडते. त्याउलट निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, सिडकोमार्फत तेथे सागरी मार्गाचे बांधकाम प्रस्तावित आहे. या निवेदनामध्ये विरोधाभास दिसतो त्यामुळे हे निवेदन सुधारणे गरजेचे आहे. त्या ठिकाणी बाजूला अंबूजा कंपनीची जेटी आहे. ती जेटी मोडून आपण मार्ग कसा काढणार ? त्या ठिकाणी अडीच कोटी रुपयांचा आंतरराष्ट्रीय फंड येणार आहे. अशा प्रकल्पाला शासन चालना देणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्या ठिकाणी मे. ग्रेट व्हाईट मरीन सर्व्हिसेस प्रा. लि. च्या जेटीला परवानगी देण्याच्या संदर्भातील हा विषय आहे. हा विषय नगरविकास विभागाकडे यासाठी येतो की, त्या ठिकाणची प्लॅनिंग ॲथॉरिटी सिडको आहे. त्या ठिकाणी दोन तीन अडचणी होत्या. त्या ठिकाणी डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये रहिवाशी विभाग आहे. दुसरा महत्वाचा विषय म्हणजे त्या प्लॉटमध्ये जी 21 हेक्टर जमीन मागत आहेत त्या ठिकाणी डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये सागरी मार्ग दाखविलेला आहे. त्या ठिकाणाहून बदलापूर-उरण अशी जी लोकल रेल्वे लाईन जाणार आहे त्या रेल्वेचा काही भाग त्या ठिकाणाहून जाणार आहे. यामध्ये सागरी मार्गाचा अडचणीचा विषय आहे तसेच रेल्वे मार्गाचा अडचणीचा विषय आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:45

(श्री. राजेश टोपे ...)

सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितल्या प्रमाणे हा मोठा इन्व्हेस्टमेंट प्रोजेक्ट असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केलेली आहे. ही समिती अभ्यास करुन 15 दिवसात अहवाल सादर करणार आहे. हा अहवाल सादर झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री याबाबतीत उचित निर्णय घेतील.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भांडूप (पश्चिम) मुंबई येथील श्री. सुरेश नाडर यांच्या हत्येचा योग्य तपास न होणे

**मु. शी** : भांडूप (पश्चिम) मुंबई येथील श्री. सुरेश नाडर यांच्या हत्येचा योग्य तपास न होणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी,विनोद तावडे व मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

भांडूप (पश्चिम),मुंबइ येथील श्री.सुरेश सॅम्युअल नाडर यांच्या झालेल्या हत्येची नोंद पार्क साईड, विक्रोळी येथे सन 2003 मध्ये सी.आर.नं.180/2003 अन्वये होणे,या हत्येचा योग्य तपास न झाल्याने गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई यांनी सी.आर.नं.147/2006 अन्वये पुनर्तपास करण्याबाबत आदेश देणे, श्री.सुरेश नाडर यांच्या हत्येतील संशयीत आरोपी श्री.जॉर्ज पुन्नाकल जोसेफ हे एक धनाढ्य बांधकाम व्यावसायिक असल्यामुळे त्यांना पाठीशी घालण्याचा पोलिसांकडून होत असलेला प्रयत्न, श्री.जॉर्ज जोसेफ यांचेविरुध्द भांडूप पोलीस स्थानकात अनेक गुन्ह्यांची नोंद असूनही पोलिसांकडून त्यांच्या शस्त्रपरवान्याचे नूतनीकरण केले जाणे, श्री.सुरेश नाडर यांच्या हत्येत हात असल्याचा आरोप असणाऱ्या या संशयित आरोपींविरुध्द पोलिसांनी अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करता त्यांच्या शस्त्राच्या परवान्याचे नूतनीकरण करण्यास मंजूरी देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द स्थानिक जनतेत पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, शासनाने याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:45

श्री. पांडुरंग फुंडकर : भांडूप येथील श्री सुरेश नाडर या कार्यकर्त्याचा 15 सप्टेंबरला खून झ ाला आणि 17 तारखेला भांडूप पोलीस स्टेशनला गुन्हा नोदविला गेला. त्यानंतर ज्याने हा खून केला तो आणि पोलीस यांनी संगनमताने हा गुन्हा दडपण्याचा प्रयत्न केला. परंतु या प्रकरणी आमदार श्री. सरदार तारासिंग यांनी केलेल्या तक्रारीमुळे पुन्हा चौकशी सुरु करण्यात आली. या हत्येबाबत पार्क साईड, विक्रोळी, साकीनाका आणि भांडूप या ठिकाणी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. जॉर्ज जोसेफ याच्या विरुध्द गुन्हा दाखल झालेला असून त्याला शस्त्राचा परवाना दिलेला आहे. ज्याने सुरेश नाडरचा खून केला तो जॉर्ज जोसेफ हा राजरोस फिरत असून दिनांक 10.1.2006 रोजी त्याच्या शस्त्र परवान्याचे नूतनीकरणही करण्यात आले. त्याच्याकडील शस्त्र पोलिसांनी जप्त केले नाही. आता तरी या अरोपीकडील शस्त्र जप्त केलेले आहे काय ? तसेच शस्त्र परवाना रद्द केलेला आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : शस्त्र परवाना जप्त करुन शस्त्र जप्त करण्यात आलेले आहे. हा गुन्हा जोसेफ याच्या घराच्या कम्पाऊंडच्या आवारात घडला. कोणीही साक्षीदार नाही...

श्री. पांडुरंग फुंडकर : आमदार सरदार तारासिंग यांनी तक्रार केल्यानंतर या प्रकरणी पुनश्च चौकशी सुरु करण्यात आली. असे असताना या प्रकरणाची संपूर्ण माहिती सभागृहापुढे येत नाही. सभापती महोदय, याबाबतीत आपण माननीय गृह राज्यमंत्र्यांना समज द्यावी...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ब्रेन मॅपिंगसाठी कोर्टाकडे विनंती केल्यानंतर खालच्या कोर्टाने त्यास मान्यता दिलेली आहे. त्या विरुध्द हायकोर्टात अपिल करण्यात आले. 23 तारखेला हायकोर्टामध्ये सुनावणी होणार आहे. ब्रेन मॅपिंग होईल आणि त्यानुसार कारवाई होईल.

श्री.मधुकर चव्हाण : श्री.रत्नपारखी नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने जी कामात कुचराई केली त्याच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे का? खून झाल्याचे हे प्रकरण आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सदर प्रकरणाचा तपास करण्यामध्ये श्री.रत्नपारखी किंवा इतर कोणी अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असेल तर त्याची चौकशी केली जाईल आणि योग्य ती कारवाई केली जाईल. श्री.जोसेफ यांच्यावर विविध प्रकारचे गुन्हे आहेत. त्या सर्व गुन्हयांचा तपास क्राईम ब्रँच करीत आहे. गुन्हयांचे स्वरुप पाहता आणि त्यांची दहशत पाहता मोका कायद्यांतर्गत कारवाई करता येईल का या संदर्भात तज्ञांशी चर्चा करण्यात येईल.

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रकरण उघडकीस आणल्यानंतर मोका अंतर्गत कारवाई करणार आहात. असे किती बांधकाम व्यावसायिक मोकाट सुटले याची आपल्याला कल्पना आहे का? इमारत कोसळून 6 लोक मृत्युमुखी पडले. त्या बिल्डरचा हा प्रचंड गुन्हा आहे. पाकिस्तानातून येऊन तो महाराष्ट्रात स्थायिक झाला. कमीत कमी 100 गुन्हे असलेला माणूस मोकाट सुटतो. गोरेगाव येथील रॉयल पाम क्लबमधील बांधकाम कोसळून 6 लोक ठार झाले. या मालकाविरुध्द कारवाई करणार आहात का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तपासून माहिती घेतली जाईल.

**उपसभापती** : तपास किती दिवसात पूर्ण करणार आहात?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तपासून माहिती घेतली जाईल.

**उपसभापती** : ज्याअर्थी मी या आसनावरुन बोलत आहे, मी जबाबदारीने व गांभीर्याने बोलत आहे. मी या संदर्भात शासनाला पत्र लिहिले होते हे आपल्या माहितीसाठी सांगतो. इतके प्रचंड गुन्हेगार मोकाट सुटत असतील तर सरकार त्याची चौकशी करणार की नाही ? चौकशीची माहिती आमच्यापर्यंत आली, तुमच्यापर्यंत आली नाही ? तेव्हा 15 दिवसात कारवाई करतो असे मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : आपल्या निर्देशाप्रमाणे महिन्याभरात जी जी प्रकरणे असतील त्या प्रकरणांची चौकशी करण्यात येईल आणि योग्य ती कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती** : माहिती हवी असेल तर मी पूर्ण फाईल दाखवितो. प्रकरणाची सत्यता पडताळून तथ्य असेल तर मोक्का अंतर्गत ॲक्शन घेणार का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

---------------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**लक्षवेधी क्रमांक 6 बाबत**

**उपसभापती** : लक्षवेधीसूचना क्रमांक 6 चे निवेदन आलेले नसल्यामुळे सदरहू लक्षवेधीसूचना आज चर्चेसाठी घेण्यात येणार नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचनेचा जो विषय आहे त्यासंदर्भात मी आठ दिवसापूर्वी औचित्याचा मुद्दा सभागृहामध्ये उपस्थित केला होता. तो मुद्दा देखील या लक्षवेधी सूचनेशी क्लब करुन शासनाने निवेदन करावे.

---

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात वंशाच्या दिव्याच्या हव्यासापायी स्त्रीभ्रूणाची होणारी छुपी हत्या.

**मु.शी.** : राज्यात वंशाच्या दिव्याच्या हव्यासापायी स्त्रीभ्रूणाची होणारी छुपी हत्या यासंबंधी डॉ.दीपक सावंत, ॲड.अनिल परब, श्री.अरविंद सावंत, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यातील स्त्री-पुरुषांचे प्रमाण १००० पुरुषांमागे ९२२ महिला (मुली) अशी विसंगती निर्माण झाल्याने राज्यात वंशाच्या दिव्याच्या हव्यासापायी स्त्रीभ्रूणाची आजही छूप्याप्रकारे हत्या सुरु असणे, मुलींची गर्भातच हत्या करण्यात येणे, परिणामी स्त्री-पुरुषांच्या संख्येत निर्माण झालेला असमतोल व त्याचा समाजजीवनावर होणारा परिणाम, राज्य शासनाने स्त्रीभ्रूणहत्येविरुध्द केलेल्या कायद्याची तंतोतंत व काटेकोरपणे अंमलबजावणी न होणे, मुलींचे प्रमाण दिवसेंदिवस घटत असल्याने ज्या जोडप्यांना मुली झाल्या व होतील त्यासाठी मोफत शिक्षण, नोकरीत प्राधान्य आदि खास आकर्षक अशा योजना शासनाकडे नसल्याने त्या तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य उपेक्षा व दिरंगाई, मुलींचे घटणारे प्रमाण हा आतापर्यंतचा निचांक असल्याने हा गंभीर विषय शासनाने योग्य प्रकारे न हाताळल्याने त्यांचे होणारे अनिष्टपरिणाम ही सामाजिक समस्या सोडविण्याबाबत शासनाने दाखविलेल्या उदासिनतेमुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्यमंत्री) : सभापती महोदय, निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सामाजिक हिताच्या दृष्टीने लक्षवेधी सूचना सदनासमोर आणलेली आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे घटते प्रमाण हा लक्षवेधी सूचनेचा आशय आहे. मी सुरुवातीलाच सूचनेमध्ये म्हटले आहे की, वंशाच्या दिव्याच्या हव्यासापायी स्त्रीभ्रूणाची आजही हत्या होत आहे. राज्य शासन आणि आरोग्य विभाग स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यामध्ये कमी पडत आहे हे खरे आहे काय? राज्यात एकूण सोनोग्राफी मशिन वापरणारी नोंद झालेली केंद्रे किती आहेत? राज्य शासन महापालिका, नगरपालिका व जिल्हा परिषद स्तरावर सोनोग्राफी यंत्र कशी चालतात व किती सोनोग्राफी झाल्या? याची चौकशी करण्यासाठी सर्वेक्षण समिती नेमून त्या समितीचा अहवाल दर महिन्याला मागविणार आहे का?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, राज्य शासन किंवा आरोग्य विभाग कुठेही कमी पडत नाही. लिंग भेद प्रतिबंध कायदा, 1994 राज्यात लागू झालेला आहे त्या कायद्यातील तरतुदीकडे दोन मुद्यांच्या अनुषंगाने पहावे लागेल. राज्य सरकारने या माध्यमातून चांगल्या पध्दतीने अव्हेरनेस कॅम्पेन राबविलेली आहेत. राज्य सरकार याबाबतीत कुठेही कमी पडलेले नाही. देशामध्ये पहिल्यांदा चांगल्या पध्दतीने याची अंमलबजावणी व्हावी, मुलींचे प्रमाण कमी होत आहे या मुद्यांवर विधिमंडळामध्ये मागील काळात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यशाळेला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांकडून अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला होता.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )

डॉ. विमल मुंदडा......

यांसदर्भात माननीय सभापती तसेच माननीय अध्यक्षांनी राज्यसरकारच्या कामाचे अभिनंदन केलेले आहे. गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र ( लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम 2003 या कायद्याची राज्यात कडक अंमलबजावणी करण्यासाठी माननीय मंत्री ( सार्वजनिक आरोग्य) यांच्या अध्यतेखाली राज्य पर्यवेक्षीय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचे अध्यक्षतेखाली राज्य सल्लागार समिती नियुक्त करण्यात आली आहे. या शिवाय राज्यस्तरावर, महानगरपालिका स्तरावर आणि तुालकास्तरावर समुचित प्राधिकरण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यात एकूण 423 समुचित प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. वरील कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे सोनोग्राफी केंद्रधारकांविरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करुन संबंधितांविरुध्द न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. राज्यात एकूण 57 प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये गर्भलिंग तपासणी करत असल्याचा संशय आल्यावरुन गरोदर स्त्रीस बनावट ग्राहक म्हणूनन गर्भलिंग तपासणी करतांना 12 खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.अशा प्रकारे जरब बसावी म्हणून कार्यशाळा करण्यात आलेली आहे. या अधिनियमांतर्गत राज्यात आता पर्यंत 5927 सोनोग्राफी सेंटरची नोंदणी करण्यात आली आहे. या केंद्राची जिल्हा व महानगरपालिका स्तरीय समुचित प्राधिकरण अधिकारी यांचे मार्फत तपासणी केली जाते या अधिनियामासंबंधी जनजागृती करण्याकरिता अंगणवाडी कार्यकर्त्या, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, खाजगी व्यावसायिक, स्त्री शिक्षिका, स्त्री वकील, लोकप्रतिनिधी तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील इंटर्नशीप करणारे डॉक्टर्स व विद्यार्थी यांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत तसेच जनतेमध्ये लोकप्रतिनिधीमार्फत जनजागृती करण्यासाठी राज्यातील सर्व विधानमंडळ सदस्यांची दि. 18.4.2006 रोजी कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेच्या संदर्भात माननीय विधान परिषद सभापती व माननीय विधानसभा अध्यक्ष यांनी शासनाचे अभिनंदन सुध्दा केलेले आहे. ज्या संस्थांनी या ॲक्ट मधील रजिस्ट्रेशन केलेले आहेत अशा संस्थाना 15 हजार रुपये अनुदान देत असतो. संपूर्ण देशात लिंग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा.....

निवडीच्या संदर्भात महाराष्ट्रात सगळयात चांगले काम होत आहे. तसेच आरोग्याच्या प्रश्नाच्या संदर्भात महिलांचे प्रमाण वाढविण्याबाबतच्या संदर्भात, दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक समिती तयार करुन त्यामध्ये डॉक्टर असलेल्या सदस्यांचा समावेश करुन गठीत करावी, अशी माझी इच्छा आहे. या समिती मार्फत वर्षभराचा कार्यक्रम घेतला जाईल. अशा प्रकारे मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील अशी शासनाची भूमिका आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, स्त्रीभूण हत्येच्या संदर्भात अनेक वेळा या सदनात चर्चा झालेली आहे. शासनातर्फे यासंदर्भात जन जागृती कार्यक्रम राबविला जातो, ही चांगली गोष्ट आहे. मंत्रीमहोदयांचा या संदर्भात हेतू चांगला आहे. प्रत्यक्षात केसेस रजिस्टर करण्याबाबत प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हा आरोग्य अधिका-यांना जबाबदार धरणे आवश्यक आहे. जोपर्यंत जिल्हा आरोग्य अधिकारी यासंदर्भात पुढाकार घेणार नाही तोपर्यंत या कार्यक्रमाला गती येणार नाही. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र अधिनियमाचा उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात वर्षानुवर्षे केसेस चालू आहेत परंतु त्याचा निवाडा होत नाही. त्यामुळे गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्राच्या संदर्भात केसेस दाखल करण्यासाठी जिल्हा आरोगय अधिका-यांवर जबाबदारी टाकली आहे का, त्यांनी यासंदर्भात पाठपुरावा केला आहे काय, यासंदर्भात आपण काय उपाययोजना केलेली आहे ? खरे म्हणजे महिलांनाच वाटते की, आपल्याला सुध्दा मुलगा असावा. परंतु लिंग तपासणीच्या संदर्भात महिलांना काही शिक्षा देऊ नये असे मला वाटते कारण एका बाजूला महिलांची संख्या अगोदरच कमी होत आहे आणि त्यात जर आपण महिलांवर अशा पध्दतीने केसेस केल्या तर ते योग्य होणार नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

हा समाज प्रबोधनाचा विषय आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, कायद्याची अंमलबजावणी करीत असताना बचत गटातील महिलांचा व्यापक सहभाग शासन घेणार आहे काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, मी अगोदच सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. जेथे आर्थिक सुबत्ता आणि सुशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे तेथेच स्त्रियांच्या प्रमाणात प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा आपल्याला प्रथम समाजाची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. स्त्रीभ्रूण हत्येस आळा बसण्यासाठी राज्यात एकूण 423 समुचित प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी आणि सिव्हील सर्जन यांची प्राधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. समुचित प्राधिकरणामार्फत 12 खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना गर्भलिंग तपासणी करताना पकडण्यात आलेले आहे. दुसरे म्हणजे सिव्हील सर्जनला आदेश देण्यात आलेले आहेत की, ज्या ज्याठिकाणी सोनोग्राफी सेंटर्स आहेत त्याठिकाणी 15- 15 दिवसांनी त्यांनी सरप्राईज व्हीझीट द्यावी व त्या संबंधीचा आढावा दर तीन महिन्यांनी संचालकांना द्यावा. संचालक तो आढावा मंत्रिमहोदयांना सादर करतील. या गोष्टींमुळे स्त्रीभ्रूण हत्येस आळा बसेल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, गर्भजल चिकित्साचे करण्याचे प्रमाण वाढत आहेत आणि हे प्रमाण ग्रामीण भागाच्या तुलनेत मोठ्या शहरांमध्ये जास्त प्रमाणावर आहे. मुंबई, पुणे, नाशिक, सांगली हे प्रगत जिल्हे आहेत. या जिल्ह्यांमध्ये स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण जास्त आहे. मराठवाडा आणि विदर्भात हे प्रमाण कमी आहे, हे खरे आहे काय ? गर्भजल चिकित्सा केंद्र उपलब्ध असणे, मुलीस नाकारणे या सर्व गोष्टींबाबत समाज प्रबोधन करण्यामध्ये शासन कमी पडत आहे. तेव्हा समाज प्रबोधन करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? स्त्री ही स्त्रीची दुष्मन नसते. स्त्री ही पुरुषांची दुष्मन नसते तर पुरुष प्रधान संस्कृती ही स्त्री जातीची दुष्मन आहे. तेव्हा आपल्याला स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी समाज प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सामाजिक परिस्थिती या गोष्टीस जबाबदार आहे. समाजामध्ये महिलांना नेहमीच दुय्यम स्थान आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत आहे. गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र अधिनियम 2003 या कायद्याची राज्यात कडक अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. सांगली जिल्ह्यामध्ये 1991 मध्ये दर हजार पुरुषामागे 924 स्त्री असे प्रमाण होते. आज हे प्रमाण 851 इतके आहे. मुंबई, ठाणे, पुणे या ठिकाणी समुचित प्राधिकरणावर जबाबदारी टाकून त्यांच्याकडून चांगल्या पध्दतीने काम करुन घेतले जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, ही जबाबदारी सिव्हील सर्जनकडे देणार आहे. माझे या संदर्भात सजेशन आहे की, जितकी सोनोग्राफी सेंटर्स आहेत त्याठिकाणी दर महिन्याला किती महिलांची सोनोग्राफी करण्यात आली याची माहिती तेथील महानगरपालिका, नगरपालिका यांच्याकडे सादर करण्याबाबत सक्तीचे करणार काय ?

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, निश्चितपणे कम्पलसरी केले जाईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, निवेदनामधे 12 खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना रंगेहात पकडण्यात आले, अशी माहिती याठिकाणी दिलेली आहे. याबाबत मी विचारु इच्छितो की, वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर आपण कोणती कारवाई केली ? त्यांच्याकडील मेडिकल प्रॅक्टीस करण्याचे लायसन्स जप्त केले काय ? तसेच, याठिकाणी 57 प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत व याची अंमलबजावणी 2003 पासून होत आहे. यामध्ये इन्व्हेस्टीगेशन आणि कन्विक्शन रेट फार कमी आहे, असे माननीय मंत्री महोदयांना वाटत नाही का व याबाबत त्यांची भूमिका काय आहे ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, 57 प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत. फास्ट ट्रॅक कोर्टच्या बाबतीत आपण विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन प्रकरणांचा निपटारा लवकर करण्याच्या दृष्टीने विचार करणार आहोत. याबाबतीत आपण विभागाची यंत्रणा उभी करणार आहोत. 57 प्रकरणांची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. नोंदणी नसलेली 34 प्रकरणे आहेत, रेकॉर्ड न ठेवण्यासंबंधीची 4 प्रकरणे आहेत तसेच प्रसिध्दीच्याबाबतचीही काही प्रकरणे आहेत. या 12 डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन कोर्टामध्ये सिध्द झाले आहे. याबाबतीत आपण मेडीकल प्रॅक्टीशनर ॲक्टप्रमाणे कारवाई करु शकतो व याबाबतची शिफारस आपण मेडीकल कौन्सिलकडेही करु शकतो. परंतु आपण ही रजिस्ट्रेशन्स रद्द केलेली आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी म्हटल्याप्रमाणे, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे याबाबतीत परिणाम होत आहे, ही गोष्ट खरी आहे. मुलींना शिक्षण देण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले यांनी फार मोठे काम केलेले आहे. दिपावलीच्या निमित्ताने माननीय श्री.विजयसिंह मोहिते-पाटील साहेबांनी अतिशय सुंदर ग्रिटींग आम्हाला पाठविले होते. आईच्या गर्भामध्ये असलेले मूल आईला पत्र लिहून विचारत आहे की, माझी हत्या का करीत आहात? अशाप्रकारचे ते ग्रिटींग होते. ते ग्रिटींग अतिशय इफेक्टीव्ह आहे. याबाबतीत आपण राज्यभर कॅम्पेन केले पाहिजे. स्त्रीभ्रूण हा जीव असून त्याची हत्या करण्यात येत आहे. त्यामुळे याबाबतीत आपण जर जागृती केलीतर अशाप्रकारे हत्या करण्यास लोक प्रवृत्त होणार नाहीत. त्यामुळे याबाबतीत आपण एखादा दिवस ठरवून अशाप्रकारचे कॅम्पेन करणार का ?

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय भावनिक प्रश्न मांडला. अशाप्रकारचे कॅम्पेन करण्यात येईल. याबाबतीत एखादा दिवस ठरवून वर्षभरासाठी कार्यक्रम करु व त्यामध्ये गर्भलिंगातून आपण कशाप्रकारे एका जीवाची हत्या करीत आहोत, हे लोकांना सांगू. खरे म्हणजे, हा खूनच केल्यासारखे आहे. पोटातील जीवालाही जगण्याची संधी दिली पाहिजे. त्यामुळे याबाबतीत आपण अवेअरनेस प्रोग्राम करु.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांना, मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात एक औचित्याच्या मुद्दा मांडण्यात आला होता, त्यासंबंधीचेही निवेदन मंत्री महोदयांनी करावे. डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, ठीक आहे. निवेदन वितरित करण्यात येईल.

-----------

..3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई येथील व्हीजेटीआय संस्थेतील विद्यार्थ्यांना मिळणारी इन्स्टिटयूट फ्रीशीप व स्कॉलरशीप बंद करणे

**मु. शी.** : मुंबई येथील व्हीजेटीआय संस्थेतील विद्यार्थ्यांना मिळणारी इन्स्टिटयूट फ्रीशीप व स्कॉलरशीप बंद करणे यासंबंधी श्री.संजय दत्त,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई येथील वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्थेतील (व्हिजेटीआय) विद्यार्थ्यांना मिळणारी इन्स्टिटयूट फ्रीशीप व स्कॉलरशिप संस्था संचालकांनी अचानक बंद केल्याचे दिनांक 24 मार्च, 2007 रोजी वा त्यादरम्यान आढळून येणे, गेल्या अनेक वर्षापासून विद्यार्थ्यांना फ्रीशीप व स्कॉलरशिप देण्यात येणे, 50 हजार रुपयाहून कमी उत्पन्न असणारे विद्यार्थी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना इन्स्टीटयुट फ्रिशीप दिले जात असणे, परंतु गेल्या तीन वर्षापासून या विद्यार्थ्यांना फ्रीशीप देण्यात येणार नसल्याचे संचालक यांनी विद्यार्थ्यांना सांगणे, काही विद्यार्थ्यांनी फ्रीशीप व स्कॉलरशिप का बंद करण्यात आली याबाबत अर्जाद्वारे विचारणा केली असता त्याबाबत कोणतेही कारण संस्था संचालकांकडून न देणे, वर्ल्ड व्हीजन स्कॉलरशीप म्हणून विद्यार्थ्यांना रुपये 10 हजार दिले जातात व याबाबतची नोटीस बोर्डावर लावली जाते परंतु संचालकांनी वर्ल्ड व्हीजन स्कॉलरशिपची नोटीस बोर्डावर लावली नसल्याने विद्यार्थ्यांना अर्ज करता न येणे, सर्व विद्यार्थी वर्ल्ड व्हीजन स्कॉलरशिपपासून वंचित असणे, मुलांच्या शिक्षणासाठी अनेक विद्यार्थ्यांचे वडील आपली शेतजमीन गहाण ठेवणे प्रसंगी विकणे, काही मुलांचे शिक्षण फ्रीशिप व स्कॉलरशिपवरच होत असणे, संचालकांच्या स्वत:च्या तंत्राचे विद्यार्थी बळी पडत असून शासन याकडे डोळेझाक करीत असल्याने या सर्वसामान्य व गरीब विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब या सर्व विद्यार्थ्यांना फ्रीशिप व स्कॉलरशिप त्वरित देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..5.....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सदर संस्थेने 3 टक्के शुल्काप्रमाणे विद्यार्थ्यांकडून फीच्या नावाखाली किती रुपयांची रक्कम शासनाची पूर्व परवानगी न घेता स्वत:कडे ठेवली ? व ती वसूल करण्याबाबत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येत आहे ? तसेच, याबाबतीत जे कोणी जबाबदार आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, व्हीजेटीआय ही संस्था स्वायत्त संस्था असून ती विद्यार्थ्यांकडून 3 टक्के शुल्क घेत आहे. इकॉनॉमिक बॅकवर्ड विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशीपच्या रक्कमेची फिगर सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही, त्याबाबतची माहिती घेऊन मी ती माहिती पटलावर ठेवतो. याबाबतीत गर्व्हन्मेंट ऑडीट होऊन त्यामध्ये ऑब्जेक्शन निघाल्याप्रमाणे आपण व्हीजेटीआयच्या डायरेक्टरांना आदेश दिले आहेत की, आपण हे जे करीत आहात, ते चुकीचे आहे व यापुढे अशाप्रकारची कार्यवाही होऊ नये तसेच, विद्यार्थ्यांची फी गर्व्हन्मेंट ट्रेझरीमध्ये जमा करावी, अशाप्रकारचे निदेश आपण डायरेक्टरांना दिलेले आहेत.

नंतर कु.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सुरेश शेट्टी ...

या संदर्भात लवकरात लवकर फॉलोअप केला जाईल. तसेच फ्रीशीप व स्कॉलरशीप देणे हे चांगले काम आहे. याबाबत जी डिस्क्रेपन्सि समोर आलेली आहे, त्याबाबत कारवाई करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर विषय आहे. व्ही.जे.टी. आय . मध्ये संचालकांच;k लहरी प्रमाणे कारभार चालू आहे.हा विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ आहे. किती वर्षापासून ही फ्रीशीप चालू होती, विद्यार्थ्योना 3 वर्षापासून स्कॉलरशीप दिली जात नव्हती ती 3 वर्षाची बाकी असलेली फ्रीशि्प शासनाकडून विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे का ?

श्री. सुरेश शेट्टीः सभापती महोदय, या संस्थेमधील मागासवर्गीय विद्यार्थ्योना स्कॉलरशीप देणे या वर्षी पण चालू आहे, ती बंद केलेली नाही. आर्थिकदृष्टया मागासलेले जे विद्यार्थी आहेत त्यांना देखील या वर्षी स्कॉलरशीप देण्यात येणार आहे. पुढील वर्षी ही स्कॉलरशीप कोणत्या पद्धतीने द्यावी या संदर्भात आम्ही अशी सूचना केली आहे की, सेप्रेट कॉर्पस फंडातून विद्यार्थ्यांना मदत करण्यात यावी. तसेच या संदर्भात नियम ठरविण्यात येणार आहे. ही स्कॉलरशीप 3 वर्षापासून दिलेली नाही, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते बरोबर नाही. मागील 3 वर्षापासून सर्व विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप दिलेली आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी घेऊ नये,असे शासनाचे धोरण असताना संचालकांनी फी घेतली आहे, तेव्हा यासंदर्भात शासनाकडून कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी शासनातर्फे रिइंबर्स केली जाते. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी वसूल करण्यात आली आहे, असे उदाहरण अजून समोर आलेले नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी आपल्या निवेदनात असे म्हटले आहे की, " आर्थिक्द्ष्टया दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफ करण्यासाठी इतर विद्यार्थ्यांकडून मिळणारे शिक्षण शुल्क पूर्णपणे शासनाकडे जमा न करता त्यापैकी 3 टक्के शुल्क शासनाची पूर्व परवानगी न घेंता संस्थेकडे ठेवून घेण्यात येत होते. ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर संस्थेचे अनुदान निश्चित करताना संस्थेने पूर्व परवानगीविना ठेवून घेतलेली रक्कम संस्थेकडून वसूल करण्याचे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे"

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, व्ही.जे.टी.आय च्या संस्थेच्या संचालकांनी शासनाचे नियम धाब्यावर बसवून कारवाई केली आहे त्या संदर्भात शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही गोष्ट शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर दिनांक 22 मार्च 2007 ला असे सांगितले की, शासनाकडून जे पैसे विद्यार्थ्यांना देण्यात येतात ते पैसे गव्हमेंटच्या ट्रेझरी मध्ये डिपॉजिट करण्यात आले. विद्यार्थ्यांना फ्रीशीप व स्कॉलरशीप देण्यात आली नाही, हे योग्य नाही. या संदर्भात सदर बाब संस्थेच्या नियामक मंडळासमोर मांडून आर्थिक दृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना फ्रीशीप देण्याचा निर्णय घेतला आहे.पुढील वर्षापासून या संबंधी निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र शासन स्तरावर अधिकाऱ्याबरोबर आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांच्या संदर्भात चर्चा करुन मार्ग काढला जाईल.शासनास स्कॉलरशीप देण्याची पध्दत पुढे चालवावयाची आहे.गर्व्हमेंटचे जे नॉर्म्स आहेत त्यानुसार काम न करणा-या संस्थेविरुध्द चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यां व्यतिरिक्त प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची जी पाल्ये आहेत, त्यांनी फी भरलेली आहे ती नि:शुल्क शिक्षण योजनेअंतर्गत शासनाकडून परत मिळेल का ? 3 ते 4 वर्षापासून ही फी विद्यार्थ्यांना परत मिळालेली नाही. असे काही विद्यार्थी आहेत की, जे शिक्षकांचे पाल्य असूनही त्यांची फी माफ करण्यात आलेली नाही. सभापती महोदय, त्या संस्थेमध्ये शिकणारे जे विद्यार्थी आहेत, त्यांच्या फ्रीशीपच्या संदर्भात हा प्रश्न मी सन्माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो. ज्या विद्यार्थ्यांची शासनाकडून फी माफ केली जाते, त्या विद्यार्थ्यांना ती फी परत का केली जात नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या संदर्भात माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

यानंतर श्री रोझेकर

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SRR/ MHM/ KGS/ प्रथम कुमारी धनश्री......... 15:15

**पृ.शी.**: सुझलॉन कंपनीने सांगली जिल्हयातील शेतक-यांची जमीन पवनउर्जा प्रकल्पासाठी अल्पदरात घेऊन केलेली फसवणूक

**मु.शी.**: सुझलॉन कंपनीने सांगली जिल्हयातील शेतक-यांची जमीन पवनउर्जा प्रकल्पासाठी अल्पदरात घेऊन केलेली फसवणूक संबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अपारंपारिक उर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सुझलॉन कंपनीने मौजे नरसिंहवाडी, ता.तासगांव, जि.सांगली आणि कवठे महांकाळ, तासगांव, आटपाडी, जत, सांगोला या दुष्काळी भागात पवन ऊर्जा प्रकल्प राबविले जाणे, या प्रकल्पासाठी लागणारी शेतजमीन सुझलॉन कंपनीने अल्पदरात घेणे, एस.ई.झेड.साठी शेतक-यांच्या फसवून सहया घेणे, स्वीकारलेले धोरण पवनचक्क्यांच्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांना लागू न करणे, मृत शेतक-यांच्या सर्व वारसदरांना रेकॉर्डवर न घेता, महसूल अधिका-यांच्या संगनमताने जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण करुन दलालामार्फत शेतक-यांची फसवणूक करणे, शेतीला किमान 2 लाख भाव न देणे, शेतक-यांच्या दोन मुलांना कंपनीत काम न देणे, स्थानिक लोकांना ठेकेदारी न देणे, इतर राज्यातील लोकांना ठेकेदारी देणे, यामुळे येथील शेतक-यांच्या मनात तीव्र असंतोष पसरला असून या परिसरात तणावाचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनय कोरे (अपारंपारिक उर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रत माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारत असतांना पुन्हा एकदा 'हे राज्य विजेचे साम्राज्य' असे म्हणून मी सुरुवात करतो. सांगली जिल्हयामध्ये कवठे महांकाळ, जत, तासगाव, सांगोला हे दुष्काळी तालुके आहेत. या दुष्काळी पट्टयातील हजारो एकर जमीन पवनउर्जा प्रकल्पांसाठी हडप करण्याचा प्रयत्न आहे. दलालांच्या मार्फत 3000 हजार रुपये देऊन व त्यातूनही काही रक्कम दलालांनी काढून घेऊन शेतक-यांची बोळवण करण्यात आली आहे. जे व्यवहार झाले आहेत त्या व्यवहारांचे दस्तावेजदेखील शेतक-यांना देण्यात आलेले नाहीत, वारसांची नावे रेकॉर्डवर घेण्यात आली नाहीत, स्थानिक लोकांना नोकरी देण्यात आली नाही, जमीन गेली, नोकरी नाही अशा प्रकारे शेतक-यांचे पुढचे संपूर्ण आयुष्य अंध:कारमय झालेले आहे. जी जमीन घेतली आहे त्या पडिक जमिनीला एकरी 2 लाख रुपये व शेत जमिनीला एकरी 4 लाख रुपये भाव द्यावा, अशी शेतक-यांची मागणी आहे. अशा प्रकारचे कम्पलशन सुझलॉन या कंपनीवर घालणार काय ? प्रत्येक पवनचक्कीमागे 3 लोकांना नोकरी दिली तर 1500 पवनचक्क्या मिळून 4500 स्थानिक लोकांना नोकरी मिळू शकते. सुझलॉन कंपनी असेल किंवा आणखी कोणत्या कंपन्या असतील त्यांच्यावर अशा प्रकारचे बंधन शासन घालणार काय ? या कंपन्यांचे मालक कोण आहेत ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, जमीन विकणे आणि विकत घेणे असे जमिनीचे व्यवहार हे दोन व्यक्तिंमधील व्यवहार असतात. या व्यवहारामध्ये सरकारला हस्तक्षेप करता येईल काय ? शेतक-यांच्या भावना समजून घेऊन, शेतक-यांच्या हिताचे धोरण आखता येईल काय ? अशा प्रकारची भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे ती कायदेशीररित्या तपासून काय करता येईल त्याबाबत शासन प्रयत्न करेल.

सभापती महोदय, दुस-या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी पवनचक्क्या उभारल्या जात आहेत त्या ठिकाणी स्थानिक लोकांना रोजगार द्यावा, अशा प्रकारच्या सूचना या मंत्रालयाकडून संबंधित पवन उर्जा निर्माण करणा-या कंपन्याना दिलेल्या आहेत. लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने आपल्या परिसरातील पवन उर्जा प्रकल्पांची माहिती मी या ठिकाणी आणलेली आहे. साधारणत: कवठे महांकाळ, तासगाव, सांगोला व जत या ठिकाणी पवनऊर्जा निर्मितीचे काम झाले आहे. त्यामधून 230 मेगावॅट एवढया क्षमतेची पवनऊर्जा स्थापीत झाली आहे

..3.........

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

17-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) TT-3

SRR/ MHM/ KGS/ 15:15

श्री.विनय कोरे..........

व 156 स्थानिक लोकांना कायम स्वरुपी आणि 40 स्थानिक लोकांना सुरक्षेच्या कार्यक्रमाअंतर्गत नोक-या उपलब्ध झाल्या आहेत. नवीन इरेक्शनचे काम सुरु आहे त्या ठिकाणी 198 लोक काम करीत असून त्यात 100 स्थानिक लोकांना कायमची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मला आश्चर्य वाटले ते मंत्री महोदयांच्या उत्तराचे. शेतक-यांच्या जमिनी आहेत, विकत घेणा-या कंपन्या आहेत, सरकारचा काही संबंध नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. मल्टिनॅशनल कंपन्या भारत देश विकत घेण्यास आले तर सरकार काय शांत बसणार आहे का ? सुझलॉन ही टिचभर असलेली कंपनी व या कंपनीचा 10 रुपये असलेला शेअरचा भाव आज हजारो रुपयांवर गेला आहे व या माध्यमातून या कंपनीने करोडो रुपयांचा प्रॉफिट कमावला आहे. या कंपन्यांचे मालक करोडपती नाही तर अरबोपती झाले आहेत. गोरगरीब शेतक-यांच्या जमिनी घेतल्या, त्यांना याबाबतची टेक्नॉलॉजी काय माहित आहे ? त्यांच्या जमिनीतून सोने निघणार आहे, याची त्यांना कल्पना नाही. त्यामुळे हा ॲप्रोच आपल्याला बदलावा लागेल. कोणत्याही नैसर्गिक साधनसंपत्तीची मर्यादा असते. या कंपन्यांचा आऊटपुट केवळ 15 ते 16 टक्के आहे. थ्रु-आऊट दि इयर मर्यादित वीज मिळते. त्यामुळे शेतक-यांना या कंपनीचे इक्विटी शेअर्स दिले पाहिजेत. त्यामुळे ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना डिव्हिडंडच्या स्वरुपात तरी काही मोबदला मिळू शकेल.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी........

उद्ध्वस्त झालेल्या शेतक-यांना आता कोण उपजिविका देणार ? याबाबत माझा असा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या कंपन्यांमध्ये प्रकल्पग्रस्त शेतक-यांना समान भागीदारी देण्यासाठी सरकार सक्ती करणार आहे का ? अन्यथा या प्रकल्पांना सरकार मान्यता देणार नाही असे ठोस व निश्चित धोरण सरकार स्वीकारणार आहे का ? संबंधित शेतक-यांना सरकार दुस-या जमिनी घेण्यासाठी मदत करणार आहे का ? सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे साहेबांनी याबाबत जे मुद्दे विचारले त्याबाबतही सरकार विचार करणार आहे का ? याबाबत सरकारने पळपुटेपणा करु नये.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, या प्रश्नापासून लांब पळावयाचा सरकारचा हेतू नाही. यामध्ये प्रामुख्याने दोन तीन गोष्टींचा विचार शासनाला करावयाला पाहिजे तो म्हणजे असा की, इलेक्ट्रीसिटी ॲक्ट,2003 हा जो कायदा केंद्रसरकारने आपल्या देशात अस्तित्वात आणला. या कायद्यांतर्गत कोणीही कधीही विजनिर्मितीचा प्रकल्प उभारु शकतो आणि त्यातून निर्माण झालेली वीज कोणालाही विकू शकतो, अशा प्रकारचा कायदा या देशामध्ये अस्तित्वात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जोशी यांनी जी भावना या ठिकाणी व्यक्त केली की असे लोक शेतक-यांच्या भरमसाठ जमिनी विकत घेतील आणि यातून फायदा करुन घेण्यासाठी प्रयत्न करतील तर हे होऊ नये, म्हणून उद्योग आयुक्तांच्या परवानगीनेच अशा प्रकारच्या जमिनी खरेदीचे व्यवहार पडताळण्याची व तपासण्याची परवानगी तेथील स्थानिक अधिका-यांना देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जोशी यांनी इक्विटी शेअर तेथील शेतक-यांना देण्याबाबतही एक मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मला असे साांगवयाचे आहे की, सदर प्रकल्पांतर्गत डेव्हलपर आणि इन्व्हेस्टर अशा दोन प्रकारची मंडळी कार्यरत असतात. अशा प्रकारचे प्रकल्प डेप्रिसिएशन बेनिफिट व इन्कमटॅक्स पेयर असलेल्या लोकांनाच आस्थापित करणे परवडण्यासारखे आहे कारण ते इन्कम टॅक्टस पेयर असल्यामुळे प्रकल्पात आलेला डेप्रिसिएशन इन्कम टॅक्स डिपार्टमेंटकडे क्लेम करता येतो त्यामधून मळणारी इक्विटीही या प्रकल्पात येत असते आणि याच माध्यमातून हे प्रकल्प आस्थापित होत असतात म्हणून यातून मिळणारे इक्विटी शेअर्स हे शेतक-यांना द्यावे, अशा प्रकारचे धोरण सरकारला घेता येणार नाही. महाराष्ट्र सरकारने आदिवासींच्या जमिनीसाठी एक वेगळे धोरण आखलेले आहे ते असे की, ज्या ठिकाणी जमीन खरेदीविक्रीचा व्यवहार करता येत नाही त्या ठिकाणच्या जमिनींवर मालकी

UU - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे......

हक्क हा आदिवासी यांचाच ठेऊन विंड मिल्सच्या प्रकल्पासाठी ही जमीन भाडयाने देता येण्याची तरतूद केल्यानंतर विंड मिल्समधून येणारे जे उत्पन्न आहे त्याचा एक भाग या आदिवासींना कायमस्वरुपी भाडे म्हणून देण्यात यावा, अशा प्रकारचे एक धोरण आदिवासींच्या जमिनींसाठी या विभागाने अस्तित्वात आणलेले आहे आणि हेच धोरण सगळया शेतक-यांसाठी अंमलात आणण्याचा सरकार विचार करीत आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माझ्या नंदुरबार जिल्हयामध्येही अशाच प्रकारचे प्रकरण घडलेले आहे. सुझलॉन कंपनीने तेथील शेतक-यांकडून 25 हजार रुपये एकरी असा भाव देऊन हजारो एकर जमिनी खरेदी केल्या आणि त्याच जमिनी पुढच्याच महिन्यात साडे आठ ते नऊ लाख रुपयांना या कंपनीच्या इतर शाखेला ट्रान्सफर करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. हे सर्व त्या गरीब व सर्वसामान्य शेतक-याला कळत नाही हे मला मान्य आहे, त्याला माहित नव्हते म्हणून त्याने आपली जमीन 25 हजार रुपये एकर या भावाने खाजगी कंपनीला विकली व या कंपनीनेही त्या जमिनी 25 हजार रुपये एकर या भावाने विकत घेऊन दुस-या महिन्यात साडे आठ ते नऊ लाख रुपयांना आपल्याच इतर शाखेला ट्रान्सफर केली. या कंपनीच्या प्रकल्पातून मिळणा-या उत्पन्नातील काही भाग रॉयल्टी म्हणून त्या शेतक-याला द्यावी, अशी आमची या निमित्ताने विनंती आहे किंवा या कंपनीच्या सदर जमीन खरेदी व्यवहारानंतर जो अधिक पटीने त्यांना नफा प्राप्त झालेला आहे तो त्या कंपनीकडून काही अंशी तरी शेतक-यांना वितरीत करण्यात येईल यासाठी शासन प्रयत्न करणार आहे का ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सदर प्रकार म्हणजे शहरामध्ये एखादी बिल्डर जशी एखादी जमीन विकत घेतो व त्यावर बिल्डींग बांधून त्यामधील फ्लॅट विकतो तसा प्रकार आहे, याच प्रकारे सुझलॉन या कंपनीने शेतक-यांकडून जमिनी खरेदी केल्या आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्याप्रमाणे बिल्डर बिल्डींग बांधून फ्लॅट विकतो त्याप्रमाणे कंपनीने घेतलेली जमीन ते विकू शकतात, असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. माननीय मंत्री महोदयांनी दिलेली माहिती उद्देशाला छेद देणारी आहे. दुसरी गोष्ट अशी की, अशा पद्धतीने जे जमिनी विकत घेतात त्यांच्यावर आपण दंड आकारणार काय ? कंपनीने विकत घेतलेली जमीन फायदा मिळविण्यासाठी ते पुन्हा विकत असतील तर शासनाने ती जमीन परत घेतली पाहिजे. ज्या कामासाठी जमीन घेतली त्याच कामासाठी ती वापरली गेली पाहिजे असा शासनाने त्यांच्यावर दंडक घालावा, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. पवन चक्क्यांचे उदाहरण दिले जाते ते पुरेसे नाही, ते परिस्थितीचा विपर्यास करणारे आहे, हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतांना व्यवहार कसे होतात, हे सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. प्रकल्पामध्ये गुंतवणूक करणारा तिसरा माणूस असतो. प्रत्यक्षात प्रकल्प उभा करणारा चौथा माणूस असतो आणि जमीन पाचव्या माणसाची असते....

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी आपले उत्तर पूर्ण करावे.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी ठराविक रक्कमेला जमीन खरेदी केली जाते आणि ठराविक रक्कमेला ती ट्रान्सफर केली जाते यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला आहे. हा व्यवहार कसा घडतो, हे सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. केंद्र सरकारच्या इलेक्ट्रिसिटी ॲक्ट, 2003 प्रमाणे कोणालाही वीज निर्मिती करण्याची आणि वीज विक्रीची परवानगी देण्यात आलेली आहे. कंपनीवर बंधन घालता येणे शक्य आहे काय यासंदर्भात शासन कायद्याचा अभ्यास करुन निर्णय घेईल, हे मी मघाशीच सांगितलेले आहे.

**तालिका सभापती** : प्रश्न असा आहे की, जमीन खरेदी करतांना ज्या उद्देशासाठी जमीन खरेदी करण्यात आली आहे त्या उद्देशासाठीच ती वापरली जाते का ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, जमीन प्रत्यक्ष प्रकल्पाकरिताच वापरली जाते.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, सरकार असे दाखविते की, सरकारला जसे काही माहीतच नाही. सरकारला कंपनीबरोबर पॉवर परचेस ॲग्रीमेंट करावे लागते. गोरगरीब शेतक-यांना न्याय देण्यासाठी सरकार कंपनीवर बंधन घालू शकत नाही काय ?

**तालिका सभापती** : कंपनीवर बंधन घालता येईल काय यासंदर्भात कायद्याचा अभ्यास करुन निर्णय घेऊ, असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, गुंतवणूकदारांची देखील फसवणूक होते. कंपनी प्रकल्पासाठी 25 हजार रुपयांना जमीन विकत घेते आणि नंतर त्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम न करता त्या जमिनीची किंमत 9 लाख रुपये दाखविली जाते. अशा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणा-या भारतीय माणसाची फसवणूक होत आहे. म्हणून यावर शासनाने अंकुश ठेवला पाहिजे.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, ज्या ठिकाणी वा-याचा वेग जास्त आहे अशा ठिकाणीच पवन ऊर्जा प्रकल्पासाठी जमिनी घेतल्या जातात. म्हणून आपण त्या प्रकल्पाला मान्यता देतो. ज्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी घ्यावयाच्या असतात त्यांची यादी ग्रामपंचायतीमध्ये लावली जाते व ज्यावेळी सात-बारा उतारा मिळण्यासाठी अर्ज केला जातो त्यावेळी परवानगी दिली जाते, एवढाच शासनाचा रोल आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.बोरले 15:30

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, तेथील स्थानिक लोकांना ठेकेदारी व नोकऱ्या दिल्या पाहिजेत, अशी माझी विनंती आहे. तशा प्रकारचा जी.आर. शासन काढणार आहे का ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, अशा प्रकारे किती लोकांना ठेकेदारी व नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत याची माहिती सांगितली आहे. स्थानिक लोकांना विजेचा वाटा द्यावयाचा की नाही हे एम.ए.आर.सी. ठरविते. त्यामुळे या प्रश्नावर मी शासनाच्या वतीने उत्तर देऊ शकत नाही.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्रमांक 6 (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 198 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचनेवरील 1 ते 198 निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 198 ही निवेदने कृपया छापावीत)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक.

**मु.शी.**: सन 2005 चे वि.स.वि.क्र.89, महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानपरिषदेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानसभेने सहमती दिल्याबद्दलचा संदेश व विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यासंबंधी प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु)

**तालिका सभापती** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

सहसचिव : कळविण्यात येत आहे की, सन 2005 चे वि.स.वि. क्र.89 - महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक, 2005 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 27 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे. या विधानपरिषदेच्या प्रस्तावास विधानसभेने आपल्या दिनांक 17 एप्रिल, 2007 रोजीच्या सभेत सहमती दिली आहे. आणखी असे कळविण्यात येत आहे की, या संयुक्त समितीवर विधानसभेने पुढील सदस्य नामनिर्दिष्ट केले आहेत :-

1. श्री.चंद्रकांत हंडोरे, सामाजिक न्याय मंत्री
2. श्री.धर्मारावबाबा आत्राम, सामाजिक न्याय राज्यमंत्री
3. श्री.रामदास कदम, वि.स.स.
4. श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स.
5. श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
6. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.स.स.
7. श्री.दत्ताजी नलावडे, वि.स.स.

.....4



8. श्री.सुभाष देसाई, वि.स.स.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

9. श्री.नरसय्या आडम, वि.स.स.

10. श्री.सुधाकर परिचारक, वि.स.स.

11. श्री.जनार्धन चांदुरकर, वि.स.स.

12. श्री.नाना पटोले, वि.स.स.

13. श्री.वामनराव चटप, वि.स.स.

14. श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.

15. श्री.अजित घोरपडे, वि.स.स.

16. श्री.नितीन राऊत, वि.स.स.

17. श्री.दिलीप बनसोड, वि.स.स.

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 89 - महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक, दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे. हया सभागृहाने संमत केलेल्या प्रस्तावास विधानसभेची सहमती मिळाल्यावरुन हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे आणि हया समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

1. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

2. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

3. प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स.

4. श्री.मधुकर सरपोतदार, वि.प.स.

5. श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स.

6. श्री.कपिल पाटील, वि.प.स.

7. श्रीमती उषा दराडे, वि.प.स.

.....5



8. श्री.गुरुनाथ कुलकर्णी, वि.प.स.

9. श्री.उल्हास पवार, वि.प.स.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10. डॉ.एम.ए.अझिज, वि.प.स.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**तालिका सभापती** : श्री.चंद्रकांत हंडोरे, सामाजिक न्याय मंत्री यांना मी या संयुक्त समितीचा समिती प्रमुख म्हणून नियुक्त करतो.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, 2004.

**मु.शी.** : सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 28 - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक 2004 यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधीचा प्रस्ताव.

--

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक यावर विचार करण्याकरिता नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावा असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून एकमताने संमत झाला.

.

***

...... एक्सएक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, 2007.

**L. A. BILL NO. XXVI OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)**

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 26 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 26 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या निमित्ताने मी सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट आहे त्यानुसार नगरपालिका व महानगरपालिकांचे जे विकास आराखडे असतात त्यात काही मायनर मॉडिफिकेशन त्यांना करावयाचे असेल तर 37 कलमाचा वापरन करावा लागतो आणि 37(1) च्या माध्यमातून शासनाला निदेश देता येतात. त्या संबंधात स्थानिक स्वराज्य संस्थांना मग ती नगरपालिका असेल वा महानगरपालिका असेल त्यांना 60 दिवसांचा कालावधी दिला जातो की, त्या संस्थांनी आपल्या जनरल बॉडीमध्ये ठराव घेऊन त्यासाठी सक्षम अधिकारी नेमावा. तसा त्यांनी तो नेमला नाही तर शासनाला तो अधिकारी नेमून तत्संबंधात सूचना व हरकती मागविता येतात. सभापती महोदय, यामध्ये हा जो 60 दिवसांचा कालावधी आहे तो 90 दिवसांचा करावा अशी विनंती करणारे पत्र मुंबई महानगरपालिकेकडूनर शासनाला आले आहे. कारण इम्प्रूवमेंट ट्रस्ट आणि अन्य सगळ्या माध्यमातून त्यासाठी जो विलंब लागतो त्यामुळे हा 60 दिवसांचा कालावधी कमी पडतो म्हणून हा कालावधी 60 ऐवजी 90 दिवसांचा करावा अशी आग्रही विनंती मुंबई महानगरपालिकेने केलेली आहे आणि त्यानुसार यात सुधारणा करणारे हे विधेयक

...... एक्सएक्स 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

आम्ही येथे आणलेले आहे. सभापती महोदय, माननीय सदस्यांना मला सांगावयाचे आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये त्यांचीच सत्ता आहे आणि आपणच महापालिकेत हा ठराव करून शासनाला विनंती केली आहे. तेव्हा आपल्या आग्रही मागणीप्रमाणेच हे विधेयक शासनाने आणले आहे तरी आपण ते संमत करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाच्या बाबतीत मला एवढेच म्हणावयाचे आहे की, 60 दिवसांचा कालावधी वाढवून तो 90 दिवसांचा करण्यासंबंधी उपसूचना करण्यात आली आहे. यामध्ये अडचण अशी आहे की, मुळात कलम 37(1) अन्वये शासनाने आपल्याकडे अधिकार घेऊन कै. राजीव गांधी यांनी आणलेल्या पंचायत राजचा गळा घोटला आहे. आणि आता आपण कलम 37(1) मध्ये दुरुस्ती आणीत आहात. याठिकाणी त्या त्या महिन्याला त्या त्या महानगरपालिकांच्या बैठकी होत असतात, त्या बैठकींच्या तीन दिवस अगोदर हे प्रस्ताव येतात. त्यामुळे त्या बैठकीमध्ये विचार न होता तो विषय पुढील बैठकीपर्यंत नेला जातो. आणि पुढील बैठकीच्या आदल्या दिवसापर्यंत 60 दिवस पूर्ण होतात. त्यामुळे अडचण अशी आहे की, सुधार समितीमध्ये या विषयावर विचार झाला नाही तर हा विषय लॅप्स होतो. आणि मग त्यासंबंधी निर्णय घेण्यास शासन मोकळे होते. आणि म्हणून शासनाकडून अशाप्रकारचा ठराव महानगरपालिकेकडे गेल्यानंतर 90 दिवसांचा कालावधी असला पाहिजे. नाहीतर बिल्डर, डेव्हलपर हे महानगरपालिकेमध्ये आणि आपल्या शासनाच्या नगर विकास विभागामध्ये सर्व प्रकारचे अंडरस्टँडींग करीत असतात. आणि हा विषय उशिरा कसा येईल हे बघत असतात. त्यावेळी आपल्याला आपले मत मांडावयास वेळ मिळत नाही, आणि मत मांडले गेले नाहीतर हा विषय लॅप्स होतो. हा विषय लॅप्स झाल्यानंतर शासनाला अधिकार प्राप्त होतो. याकरिता माझा आग्रह आहे की, आपण वर वर 90 दिवसांचा कालावधी दाखविला आहे तो पुरेसा नाही. महानगरपालिकेच्या बैठकीच्या दिनांकापूर्वी पाच दिवसाच्या आत ताबडतोब हा विषय त्यांच्याकडे गेला पाहिजे अशाप्रकारची आपण दुरुस्ती केली पाहिजे. तसे जर आपण केले तर आपला उद्देश साध्य होईल. महानगरपालिकेचा अर्धा गळा घोटला आहे,उरले सुरले अधिकार महानगरपालिकेच्या हातात ठेवावयाचे असतील तर आणि डी.सी. रुल ठेवावयाचा असेल तर आपण माझी सूचना मान्य करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे त्याबाबत येणाऱ्या पुढील काळात निश्चितपणे विचार करण्यात येईल. आणि त्यादृष्टीने जी काळजी घ्यावयाची आहे ती निश्चितपणे घेतली जाईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ KGS

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विकास आराखडयाच्या अंमलबजावणी संदर्भात्तील महत्वाचे विधेयक आहे. या विधेयकान्वये आपण 60 दिवसांचा कालावधी 90 दिवसांचा करणार आहात. आपण ही सर्व नाटके कशासाठी करीत आहात? मुंबई शहराचा विकास आराखडा मंजूर होत असतांना माननीय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे सदनामध्ये उपस्थित होते. आपण विकास आराखडा मंजूर करुन त्यांची अंमलबजावणी करुन बिल्डरकडे भूखंड देऊन टाकले. हाऊस फॉर डिसहाऊस बिल्डरकडे दिले. बिल्डरकडे देत असतांना मध्ये रस्ते आडवे येतात, उद्याने आडवी येतात. ज्या लोकांचे पुनर्वसन ज्या भागामध्ये करावयाचे आहे तो भाग तुम्ही बिल्डरला दिला. माझ्या दादर भागामधील एक भूखंड आहे त्याकडे वेगळया पध्दतीने बघितले जाते . Plot was reserved for municipal theatre असतांना तुम्ही तो ॲक्वायर केला. तो प्लॉट ॲक्वायर केल्यानंतर त्याच्यावरील रिझर्व्हेशन अंमलात आणण्यापूर्वी तो प्लॉट मूळ मालकाला परत दिला पाहिजे अशी संकल्पना आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे...... 15:45

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू...

तो प्लॉट महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. त्या ठिकाणी जुनी कौलारू घरे होती. हाऊस फॉर डीस हाऊससाठी असलेला प्लॉट एका खजगी दूध निर्मात्याला विकला आणि त्या ठिकाणी दोन एफएसआय देऊन खाजगी बिल्डर्स इमारती बांधत आहेत. हाऊस फॉर डीस हाऊसच्या प्लॉटला एफएसआय कसा मिळतो ? राखून ठेवलेला भूखंड होता. मुंबईमध्ये राखून ठेवलेले भूखंड हद्दपार झाले.बरेच भूखंड आहेत त्या विषयाच्या संदर्भात एक श्वेतपत्रिका काढावी, असे आवाहन मी केलेले होते. टीडीआरचा विषय विधेयकामध्ये आणलेला आहे. महानगरपालिकेने विकास आराखडा तयार केलेला आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचा विषय आहे. मी सरकारला टी.डी.आर.च्या श्वेतपत्रिका काढण्याबाबत आवाहन केलेले आहे. नुसताच हॅन्डओव्हेर करून चालणार नाही तर ते प्रॉपर फॉर्ममध्ये हॅडओव्हर केला पाहिजे. टीडीआर देताना त्या ठिकाणी रस्ता असेल, आणखी काही असेल तर तो त्यांनी बनवून दिला पाहिजे. त्या ठिकाणी उद्यान असेल ते रिकामे करून दिले पाहिजे, धर असेल तर ते रिकामे करून दिले पाहिजे. महानगरपालिकेकडे पैसे नाहीत म्हणून त्यांना टीडीआर दिलेला आहे. त्या बाजूला झोपड्या असतील तर त्यांना ॲडीशनल एफससआय दिलेला आहेम्हणजे त्यांना टीडीआरही मिळाला आणि ॲडीशनल एफएसआयही मिळाला. हे सगळे घेऊन कॉन्ट्रॅक्टर फार मोठया इमारती बांधत आहेत. हिअरींग देऊन त्या आरक्षणाच्या संदर्भातील निर्णय घेणे, या प्रक्रियेसाठी 60 दिवसावरून 90 दिवसाची मुदत दिलेली आहे. आणखी काही व्यवस्थापन निर्माण करण्याच्या संदर्भातील ही मुदत आहे. कोणत्याही शहराचे डेव्हलपमेंट प्लॅन हा शहरातील जनतेला मोकळा श्वास घेण्याकरिता आणि नागरी सुविधा देण्याकरिता असतो. हिंदू कॉलनीमध्ये मोडकांचा बंगला आहे, त्या ठिकाणी राखीव जागा ठेवलेली आहे, शाळेकरिता भूखंड राखीव आहे, त्याबाबतचे सुदर नियोजन केलेले आहे. एक किलोमिटरच्या परिसरामध्ये किती लोकवस्ती होईल, त्यासाठी कोणती गरज लागेल, याचे नियोजन केलेले होते. आता त्याचे तीन-तेरा वाजलेले आहेत. या संदर्भात आपल्या विभागाने गांभीर्याने विचार करावा,असे मला प्रामाणिकपणे सांगावयाचे आहे. आपण या संबंधाने एक समिती नेमून मुंबईमधील भूखंडाचे काय झ ालेले आहे? ते पहाणे अत्यंत आवश्यक आहे, एवढी विनंती करून माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

2...

17-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) ZZ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MHM/

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मला दोनच मिनिटे बोलायचे आहे. नियम 37 अन्वये चेंज ऑफ रिझर्वेशनच्याबाबतीत मंत्रालयातून महापालिकेकडे प्रस्ताव जातात. परंतु महानगरपालिकेच्या कामाची पध्दत वेगळी आहे. त्या संबंधातील त्यांना गाईडलाईन्स दिल्या पाहिजेत. प्रो बिल्डर आणि ॲन्टी पीपल म्हणजे विकासकाच्या बाजूने आणि जनतेच्या विरोधात धोरण राबविण्यामध्ये सरकारने आघाडी घेतली तर पुढच्या काळामध्ये नागरी समस्या निर्माण होतील. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी उल्लेख केला. नागरी जमीनीच्याबाबतीत समिती आहे, त्या समितीमध्ये जी चर्चा होते, त्याचे मिनिटस् होत नाहीत. जनरल बॉडीमध्ये चर्चा होत नाही आणि आयत्यावेळेस विषय आणून ठराव केला जातो...

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

ज्या ठिकाणी शाळेची जागा होती त्या ठिकाणी इमारत झाली हे लोकशाहीमध्ये लोकांना समजले पाहिजे. शाळा खड्डयात घातली आणि त्याऐवजी इमारत झाली. त्याचे मिनिट्स लोकप्रतिनिधींपर्यंत कळविले जात नाहीत. याकडे पाहात असताना बिल्डर आणि लुबाडणारे लोक याच दृष्टीकोनातून पाहू नये. लोकशाही मजबूत करण्यासाठी या कायद्यामध्ये परिवर्तन करीत असताना जसे आपण 60 दिवसांचे 90 दिवस केले त्याचप्रमाणे 15 दिवस अगोदर लोकप्रतिनिधींना नोटीस दिली पाहिजे. तेथील सगळ्या लोकप्रतिनिधींना त्यांचे काही म्हणणे असेल तर ते मांडण्याची संधी दिली पाहिजे. सगळी उद्याने, शाळा संपुष्टात येत आहेत. महापालिकेने याबाबत व्यवस्थित चर्चा करुन ठराव केल्यानंतर दुसऱ्या मिनिट्समध्ये ते कन्फर्म झाले पाहिजे. हे जर आपण करणार नसाल तर हे शासन बिल्डरच्या बाजूचे आणि जनतेच्या विरोधात आहे असे होईल. आता नगरसेवक म्हणतील की, ठराव आला आणि पास झाला, आम्हाला काही समजलेच नाही. यामध्ये कोट्यवधी रुपयांचा जमिनीचा व्यवहार होणार आहे तसेच काळा पैसा निर्माण होणार आहे त्याबाबतीत बंधन घालणारा जी. आर. शासन काढणार काय आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणार काय ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आपण नियोजित, सुंदर आणि स्वच्छ शहरामध्ये राहावे अशी सर्वांची इच्छा असते. या ठिकाणी प्रामुख्याने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मी एवढेच सांगेन की, कलम 37 चा जो प्रस्ताव आहे त्यामध्ये अधिक जास्त पारदर्शकता यावी, महापालिकेच्या जनरल बॉडीमध्ये जो ठराव केला जातो त्याची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना व्हावी असे मुद्दे उपस्थित करण्यात आले. कलम 37 च्या संदर्भातील जी वैधानिक प्रक्रिया असते त्या माध्मातून त्या भागातील आरक्षणाच्या बाबतीत मायनर मॉडिफिकेशन करतो त्यासंदर्भात सुध्दा सूचना आणि हरकती मागविण्याच्या संदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाते. ती जाहिरात एकाच नव्हे तर दोन तीन वर्तमानपत्रांमध्ये द्यावी अशा सूचना असतात. जनतेला माहिती व्हावी तसेच जनरल बॉडीतील सर्व सन्माननीय सदस्यांना व्यवस्थित माहिती व्हावी अशी व्यवस्था निश्चितपणे शासनाच्या वतीने करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी टी.डी.आर. बाबत उल्लेख केला. कोणतेही आरक्षण विकसित करण्यासाठी टी.डी.आर. हे एक चांगले टूल आहे. परंतु टी.डी.आर. च्या माध्यमातून अनियमितता होत असेल तर त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे विचार व्यक्त केले त्याची नोंद निश्चितपणे शासनाच्या वतीने घेतली जाईल. हे सुधारणा विधेयक सभागृहाने मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 26 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**तालिका सभापती** : सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 26 संमत झाले आहे.

---- यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक.

**L.A.BILL NO. VII OF 2007**

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966)

डॉ. राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 7 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 7, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, जमीन महसूल संहिता 1966मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 नुसार कोणत्याही जमिनीचा उपयोग अथवा त्यामध्ये बदल करावयाचा असेल तर त्यासाठी जिल्हाधिका-यांची परवानगी घेणे आवश्यक होते. शेतक-याला जर स्वत:च्या शेतामध्ये घर बांधावयाचे असेल तर त्याला ती जागा एन.अे. -अकृषक करण्याची गरज भासू नये, त्याला अकृषक सारा भरावा लागू नये अशी ग्रामीण भागातून अनेक वर्षापासून मागणी येत होती. म्हणून आता कोणत्याही शेतक-याला स्वत:च्या राहाण्यासाठी घर बांधावयाचे असेल तर त्याला येथून पुढच्या काळामध्ये जिल्हाधिका-यांची परवानगीची किंवा एन.अे.ची गरज राहाणार नाही. त्याला अकृषक सारा देखील भरावा लागणार नाही. मात्र त्याने त्या घराचा स्वत:च्या राहाण्यासाठी उपयोग केला पाहिजे. ते घर त्याला भाड्याने देता येणार नाही.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या अकृषक करासंबंधीचा विषय मी माननीय मुख्यमंत्र्यांसमोर मांडलेला आहे. आता शेतक-याकडून अकृषक कर घेण्यात येणार नाही. त्याच्या स्वत:च्या शेत जमिनीमध्ये घर बांधण्यासाठी त्याला जिल्हाधिका-याची परवानगी घ्यावी लागणार नाही. परंतु जी घरे अस्तित्वात आहेत त्या घरांना देखील संरक्षण मिळाले पाहिजे. त्या संदर्भात खुलासा होणे आवश्यक आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : इतरांसाठी देखील ही तरतूद लागू आहे. ते जर त्या ठिकाणी राहाणार असतील तर त्यांना अकृषक कर लागणार नाही.

डॉ. दीपक सावंत : ज्या शेत जमिनीमध्ये पूर्वी पासूनची घरे आहेत आणि जे अकृषक कर भरत आहेत त्यांच्या बाबतीत शासनाला वेगळा जी.आर. काढावा लागेल. हा जी.आर. शासन काढणार आहे की नाही ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : आता अकृषक सारा आकारण्यात येणार नाही.

श्री. विक्रम काळे : अशा बांधकामांना परवानगीची आणि नोंदणीची आवश्यकता राहाणार नाही काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : अशा घरांच्या बाबतीत अकृषक सारा आकारण्यात येणार नसला तरी ग्रामपंचायतीकडून बांधकामाची परवानगी घ्यावी लागेल.

सभापती महोदय, हे विधेयक विचारात घ्यावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007चे वि.स.वि. क्रमांक 7 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2007चे वि.स.वि. क्रमांक 7 संमत झाले आहे.

--

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : सभागृहाची बैठक दुपारी 04.15 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

**(04.01 ते 04.15 मध्यंतर)**

---------

..नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कच-याची विल्हेवाट लावण्याचा उग्र होत असलेला प्रश्न.

**मु.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कच-याची विल्हेवाट लावण्याचा उग्र होत असलेला प्रश्न या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री मुझफ्फर हुसेन, सुधीर सावंत, भास्कर जाधव, राजन तेली, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. संजय दत्त यांचा प्रस्ताव .

(चर्चा पुढे सुरु.....

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी 260 अन्वये घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा घडवून आणलेली आहे. या विषयाच्या संदर्भात मी या आगोदर सुध्दा भाष्य केलेले आहे. परंतु यासंदर्भात काही महत्वाच्या मुद्यांचा उल्लेख करावयाचा राहिलेला आहे. घनकचरा व्यवस्थानाच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकार आणि त्या अनुषंगाने राज्य सरकार घनकचरा व्यवस्थापन नियम 2000 अन्वये ॲक्शन प्लॅन करण्याच्या दृष्टीने निर्णय घेतलेला आहे. यासंदर्भात ट्रेनिंग आणि मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देऊन तसेच या कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्यशासन, महाराष्ट्र पोल्यूशन डिपार्टमेंट, नगरविकास विभाग सातत्याने प्रयत्न करीत आहेत. या ठिकाणी मी दोन-तीन महत्वाच्या मुद्यावर विचार व्यक्त करणार आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांना डंपिग ग्राऊंडची परवानगी देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. डंपिंग ग्राऊंडसाठी लागणारा निधी आपल्याला बाराव्या वित्त आयोगाकडून मिळतो. तेव्हा केंद्र सरकारने 50-60 टक्के निधी खर्च करावा ..............

## सभागृहातील कॅबिनेट मंत्र्यांची अनुपस्थिती

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज सकाळपासून ही परिस्थिती आहे. सभागृहाच्या कामकाजाबाबत सरकार किती गंभीर आहे हे दिसून येते. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

**उपसभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 4.30 पर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 4.21 ते 4.30 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: राज्यात मोठया प्रमाणात होत असलेल्या शहरीकरणामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा उग्र होत असलेला प्रश्न.

**मु.शी.**: राज्यात मोठया प्रमाणात होत असलेल्या शहरीकरणामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा उग्र होत असलेला प्रश्न या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री मुझफफर हुसेन, सुधीर सावंत, भास्कर जाधव, राजन तेली, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी जो म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेसाठी आणलेला आहे, त्यावर चर्चा करण्याच्या दृष्टीने जवळपास 13 सन्माननीय सदस्यांनी भाग घतला. मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासंबंधी शासनाची कार्यवाही, भूमिका आणि राज्यस्तरावर कशा पध्दतीने नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये घणकचरा व्यवस्थापन केले जाते, याबाबत मला सांगितले पाहिजे की, यासंदर्भात केंद्र शासनाची गाईड लाईन असून केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वन विभागाने जी काही नियमावली,2000 तयार केलेली आहे, त्याप्रमाणे ॲक्शन प्लॅन राबविण्याचे काम राजय शासन करीत आहे. मी याठिकाणी सांगतो की, ऑल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हन्मेंटच्या माध्यमातून एक आयएएस अधिकाऱ्यांचा सेल निर्माण केला असून त्यामार्फत ट्रेनिंग देण्याचे काम केले जाते. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अशी विचारणा केली की, राज्यातील सर्वच नगरपालिका आणि महानगरपालिकांनी घणकचरा व्यवस्थापनाची योग्य ती व्यवस्था करण्याबाबतची कडक भूमिका राज्य शासनाने घेतली आहे का ? याबाबतीत मी सांगू इच्छितो की, 12 व्या वित्त आयोगामार्फत 56.50 टक्के निधीची उपलब्धता असून तो निधी घनकचरा

..2.....

श्री.राजेश टोपे...

व्यवस्थापनावर खर्च करण्यात येईल, अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे संबंधित महानगरपालिकेने घनकच-याची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने उपाययोजना केली पाहिजे, अशाप्रकारचे बंधन आपण त्यांच्यावर टाकलेले आहे. परंतु एवढया निधीच्या स्त्रोतातूनही हे काम होणार नाही, त्यासंदर्भात मी जाहीर करु इच्छितो की, कुठल्याही परिस्थितीत घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात नगरपालिका आणि महापालिकांना भरीव निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्य शासन येणा-या अधिवेशनात बजेटमध्ये हेड निर्माण करुन घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध करुन देणार आहे. स्वच्छतेचे महत्व आघाडी शासनाने गंभीरपणे घेतले आहे. आज संत गाडगेबाबा अभियानांतर्गत स्वच्छतेचा कार्यक्रम ग्रामीण भागातच नव्हेतर शहरी भागातही उत्साहाने राबविण्यात येत आहे. स्वच्छेतेसंबंधी प्रचार आणि प्रसार करणे, मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. याबाबतचे काम राज्य शासनाच्या वतीने आणि नगरविकास विभागाच्या वतीने करण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेच्यावतीनेही स्वच्छतेच्या संदर्भात प्रचार आणि प्रसार करण्याच्या दृष्टीने अनेक सेलिब्रिटीजना बोलावण्यात येते. याबाबतीत मेकॅनाईज पध्दती अवलंबिण्यात येत आहे. रोडची स्वच्छताही मेकॅनाईज पध्दतीने होण्याच्या दृष्टीने आपण पाहत आहोत. त्यामध्ये मोठया प्रमाणावर मेकॅनाईज पध्दतीने हाताळणी केली जाणार आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी अशी भावना व्यक्त केली की, मुंबई महापालिकेच्यावतीने सायंटीफिक पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत आहे. तसेच, कमी जागेमध्ये अधिक चांगल्या पध्दतीने घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी बायो-मिथीनायझ ेशन आणि कंम्पोस्टींगचे काम करण्याचे महापालिकेने ठरविले आहे. ज्या महापालिका सायंटीफीक पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणार नाहीत, त्यांच्यावर आम्ही नियमांप्रमाणे कारवाई करु. लॅण्ड फिल्ड साईटपासून 200 मिटरच्या अंतराचा जो नियम आहे, त्याचे जो उल्लंघन करील त्याच्यावरही योग्य ती कारवाई केली जाईल.

नंतर कु.गायकवाड...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

सभापती महोदय, या ठिकाणी बायो मेडिकल वेस्टच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपाले मनोगत व्यक्त केले आहे. हा प्रश्न अनेक मोठया शहरामध्ये निर्माण झालेला आहे. मुंबईची महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून, हॉस्पिटल्समध्ये वापरलेली सिरींजेस जी असतात, रक्ताळलेला कापूस असतो यासर्व मेडीकल वेस्टचे शिवडी येथे डिसइन्फेक्श्न करण्याचे काम केले जाते. तळोजा येथे 10 टन बायो मेडीकल वेस्ट वर प्रक्रिया करणारा प्रोजेक्ट तयार करण्यात आलेला आहे. सर्व नगरपालिका व महानगरपालिका मध्ये मिनिस्टरी ऑफ एन्व्हायरमेंट ॲड फॉरेस्ट द्वारे बायो मेडिकल वेस्टच्या संदर्भात कायदा करण्यात आला आहे. त्यामध्ये सगळया स्थानिक स्वराज्य संस्थांना वेस्ट डिस्पोज ऑफ करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या कचऱ्याचे योग्य विल्हेवाट न लावल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची तरतूद या कायद्यामध्ये आहे. त्यामुळे या कायदयामध्ये असलेल्या सर्व तरतुदींची अंमजबजावणी व्हावी अशी गरज निर्माण झालेली आहे. परंतु या संदर्भात अद्यापही नगरपालिका व महानगरपालिका यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. या कायद्यामध्ये सर्व तरतुदींचा समावेश केलेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्याकडे बायो मेडिकल वेस्टच्या संदर्भात इंन्सूलेटर बसविण्याचे काम झालेले नसल्यामुळे ते BOT तत्वावर बसवून ते काम पर कॉट या प्रमाणे चार्जेस लावून अनेक महानगरपालिकांनी बायो मेडिकल वेस्टच्या प्रकल्प विकसित केले आहेत. शासनाच्या माध्यमातून अ, ब, क नगरपालिका व महानगरपालिका यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या संदर्भात आवश्यक ती पावले उचलली जातील.

सभापती महोदय, इलेकट्रॉनिक वेस्टच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात मुद्दे मांडले. भविष्यामध्ये इ-वेस्टच्या माध्यमातून गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे एमएमआरडीए रिजनमध्ये 23 हजार मेट्रिक टन इ-वेस्ट तयार होतो. सन 2015 पर्यंतची प्रोजेक्टेड फिगर आपण पाहिली तर आपल्या लक्षात येईल की, 50 हजार मॅट्रिक टन इ-वेस्ट तयार होणार आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आज या संदर्भात कोणताही कायदा केंद्रसरकारने किंवा कोणत्याही राज्यसरकारने केलेला नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3G 2

श्री. राजेश टोपे.....

त्यामुळे सायन्टिफिक डिझाईन फॅसिलिटी डिस्पोज करण्याच्या संदर्भात कायदा करणारे महाराष्ट्र राज्य हे एकमेव राज्य आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने एम.पी.सी.बी चे श्री. मोराळकर ,एम.डी, सीइओ यांच्या अध्यक्षतेखाली ई-वेस्ट डिस्पोजलच्या संदर्भात एक कायदा तयार करण्याच्या दृष्टीने, इंन्टिटयूशनल मॅकानायझम तयार करण्याच्या संदर्भात एक कमिटी गठीत केलेली आहे. त्या कमिटीचा अहवाल देखील एका महिन्यात येईल. मी स्वत: श्री. मोराळकर यांच्याशी चर्चा केलेली आहे. त्यांनी सुध्दा या संदर्भात अभ्यास करुन आणि चर्चा करुन या संदर्भातील अहवाल लवकरात लवकर येणार आहे असे सांगितले. असा कायदा निर्माण करणारे महाराष्ट्र राज्य हे देशामधील पहिले राज्य असणार आहे. या संदर्भात काही चांगली सर्क्युलर्स इश्यु करुन इ- वेस्ट डिस्पोज कसे करता येईल यादृष्टीने पावले उचलण्यात येणार आहे.

डेब्रिजच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली. अनेक खाणी आहेत त्यांच्या माध्यमातून डेब्रिजची विल्हेवाट लावण्याचे काम होत असते.मुंबईतील डेब्रिज नवी मुंबईमध्ये टाकण्याच्या संदर्भात अनेक प्रश्नांची उत्तरे येथे देण्यात आलेली आहेत. महानगरपालिकांनी यासाठी साईट्स ठरविलेल्या असतात त्या ठिकाणी हा कचरा न टाकता पैसे वाचविण्यासाठी,खर्च कमी करण्यासाठी अनेक बिल्डर्स डेब्रिज टाकण्याचे काम करतात. त्यासंदर्भात शासनाकडून कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. ट्राफिक रुल्सच्या माध्यमातून किंवा महानगरपालिकेच्य व नगरविकास विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

यानंतर श्री. रोझेकर..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.............

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने बेवारस कुत्र्यांचा विषय अनेक सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. मी एवढेच सांगतो की, मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर निर्बिजिकरण करण्याचे काम चालू आहे. सन्माननीय सदस्य, डॉ.दीपक सावंत हे नेहमी यासंदर्भातील प्रश्न सभागृहात उपस्थित करीत असतात. अनेक वेळा त्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या विषयाकडे लक्ष वेधले आहे. त्यांना या प्रश्नाची चांगली जाण आहे. या प्रश्नाची व्याप्ती खूप मोठी आहे. अनेक एनजीओंच्या माध्यमातून काही कोटी रुपयांचा खर्च करुन महापालिका यासंदर्भात प्रयत्न करीत आहे. कोर्टाच्या सूचनेच्या अनुषंगानेही प्रयत्न होत आहेत. यावरील कायमस्वरुपी इलाज शोधण्याच्या दृष्टीकोनातून सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी सभागृहात अशासकीय ठराव दाखल केला होता. या अन्वये कुत्र्यांना ताबडतोब ठार मारण्याऐवजी भूल देण्याचे औषध प्राण जाईपर्यन्त द्यावे, अशा प्रकारची तरतूद करावी, असे त्यांनी सूचविले होते. राज्य शासनाच्या वतीने जे शपथ पत्र दिले आहे त्यामध्ये अशाच पद्धतीची तरतूद व्हावी, असे म्हटलेले आहे. हा केंद्राचा कायदा आहे. जरुर माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणा-या राज्यातील खासदारांच्या बैठकीमध्ये ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल व प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमल ॲक्ट, 1968 मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याबाबत प्रयत्न केले जातील.

सभापती महोदय, या चर्चेत प्लॅस्टिक कच-यासंबंधी प्रामुख्याने ब-याच सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. 50 मायक्रॉनपेक्षा कमी असलेल्या प्लॅस्टिकवर सरकारने बंदी आणलेली आहे. रॅग पिकर्सच्या माध्यमातून, विविध संस्थांच्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगार मिळण्याचे काम तर होतेच परंतु कमी मायक्रॉनच्या प्लॅटिकच्या पिशव्या उचलण्याचे कामही त्या माध्यमातून होते. मोठया प्रमाणावर रिसायक्लिग करण्याचा प्रकल्प प्लॅस्टिक वेस्टच्या माध्यमातून करता येणे शक्य आहे.

सभापती महोदय, बहुतेक सर्व सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले असावे. शेवटी मी एवढेच सांगेन की, सन्माननीय सदस्य, श्री.मुझफ्फर हुसेन व चर्चेत भाग घेतलेल्या इतर सन्माननीय सदस्यांनी घनकचरा व्यवस्थापनामध्ये विविध घनकच-याच्या संदर्भाने ज्या बाबी

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.............

निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्याकडे शासन गांभीर्याने लक्ष देऊन आहे. निश्चितपणे घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा होईल असा विश्वास या निमित्ताने मी देऊ इच्छितो.

धन्यवाद.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, घनकचरा व्यवस्थापन हा अतिशय महत्वाचा व संपूर्ण राज्याला भेडसावणारा असा प्रश्न आहे. याविषयीची चर्चा मी सभागृहात उपस्थित केली होती. या अनुषंगाने केंद्र शासन, राज्य शासन यांनी केलेल्या उपाययोजना, धोरण, नियम, ग्रॅन्टस् उपलब्ध करुन देणे इत्यादिबाबत सविस्तर माहिती देऊन चर्चा उपस्थित केल्यानंतर तसेच महापालिकेच्या अंतर्गत असलेले विविध प्रश्न उपस्थित केल्यानंतर या एकाही प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळालेले नाही, असे माझे मत झाले आहे.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

---------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**अंतिम आठवडा प्रस्तावाबाबत**</u>

**उपसभापती** : आता सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकरी आणि शेती यासंदर्भात विरोधी पक्षाने अंतिम आठवडा प्रस्ताव दिलेला आहे. नजिकच्या पाच-सात वर्षामध्ये शेतक-यांची अत्यंत वाईट अवस्था झाली आहे आणि राज्यामध्ये सुमारे 3500 शेतक-यांनी आत्महत्या केली आहे. आत्महत्या करण्यासाठी जी परिस्थिती कारणीभूत आहे त्याबाबतचा हा अतिशय व्यापक प्रस्ताव आहे. महाराष्ट्राचे सरकार शेतक-यांप्रती किती उदासीन आहे हे यावरुन दिसून येते. आठ दिवसांपासून ही फाईल हातात घेऊन आम्ही फिरत आहोत पण हा प्रस्ताव सारखा पुढे ढकलला जात आहे.

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......
शेवटच्या दिवशीसुध्दा कार्यक्रम पत्रिकेत हा ठराव दाखविला असतांना देखील माननीय सहकार मंत्र्यांनी माननीय सभापतींच्या दालनामध्ये आम्हाला सांगितले की, मी तेथे बारा साडे बारा वाजता येतो व ते आले नाहीत, असे असतांना देखील माननीय सहकार मंत्री,पणन मंत्री कृषीमंत्री असे तीन चार मंत्री जे या प्रस्तावाशी सबंधित आहेत त्यांच्यापैकी एकही मंत्री आता सभागृहामध्ये उपस्थित नाही यावरुन हे सरकार शेतक-यांच्या प्रश्नांबाबत किती उदासिन आहे हे दिसून येते आणि म्हणून या सरकारचा आम्ही सर्व निषेध करीत आहोत आणि हा ठराव मला या ठिकाणी मांडावयाचा नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे नावही या प्रस्तावावर आहे, तेही यावर आपले मत माझ्यानंतर व्यक्त करतील. या अधिवेशनामध्ये शेतक-यांसंबंधी अनेक प्रश्न उपस्थित झाले. उदा.विजेचे अतिरिक्त भारनियमन या राज्यामध्ये 18 - 18 तास भारनियमन होत असतांना शेतकरी आत्महत्या करीत असतांना,शेतक-याची शेती उध्वस्त होत असतांना ट्रेझरी बेंचवर एकही मेंबर येथे उपस्थित नव्हता यावरुन हे सरकार किती उदासिन आहे , हे दिसून येते. या सर्व बाबींचा मी निषेध करतो व मला या सभागृहामध्ये सदर प्रस्ताव मांडावयाचा नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या सभागृहात या प्रस्तावाबाबत आपले मत व्यक्त केल्यानंतर आम्ही बर्हिगमन करणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये आता कोणते शब्द वापरावयाचे हा प्रश्न आहे. खरे म्हणजे या संपूर्ण अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये विजेचे भारनियमन,शेतकरी आत्महत्या यासारखे अनेक महत्वाचे विषय मांडले गेले परंतु या विषयावरील प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्रीमहोदय उपस्थित नाहीत म्हणून सभागृह स्थगित करण्यात येत होते.

श्री.विनय कोरे : सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात सभागृहामध्ये उपस्थित झालेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : त्यांच्या एकटयाने येऊन चालणार नाही, या सरकारची मनमानी आम्ही सहन करणार नाही, तुम्ही आम्हाला काय समजताय ? सभापती महोदय, या शेतक-याच्या प्रश्नावर या विधीमंडळात चर्चा व्हावी आणि त्यांचे प्रश्न या माध्यमातून सरकार दरबारी पोहोचावेत याकरिता आम्ही सुरुवातीपासून हा प्रस्ताव मांडण्याकरिता प्रयत्न करीत आहोत. सदर प्रस्ताव हा विरोधी

3I - 2


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

पक्षाचा असतांना देखील तो चर्चेस आला नाही म्हणून तो शेवटी अंतिम आठवडा प्रस्ताव म्हणून मांडण्यापर्यंत पाळी आली. या प्रस्तावावरील चर्चा ऐकण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित राहत नाहीत त्याकरिता सभागृह बंद पडते यावरुन या सरकारचा असा अर्विभाव दिसून येतो की, या सदनामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात आम्हाला काही गांभीर्य नाही, निर्लज्जपणा हा एक असा शब्द आहे की, तो फक्त या सरकारमधील मंत्र्यांनाच लागू पडेल, त्यांचे म्हणणे असे असते की, भारनियमन असले म्हणून काय होते ? आम्ही निवडून येतो ना ? इतक्या निर्लज्जपणाने या खात्यावर हात ठेवनू मंत्री असे सांगतात. माननीय ऊर्जामंत्री म्हणाले की, येथे तुम्ही कधीच बसू शकणार नाही ! एवढा मस्तवालपणा या सरकारमध्ये आलेला आहे. जनतेला आम्ही जोडयाने हाणले तरी कोणीही आमचे काहीही वाकडे करु शकणार नाही, एवढा मस्तवालपणा या सरकारला घातक होऊ शकतो. अपारंपारिक ऊर्जा खात्यावर असा मंत्री पाठविलेला आहे की, ज्याने विजेचे एकही युनिट निर्माण केलेले नाही, ज्याला काहीही काम येत नाही असा मंत्री कॅबिनेट मिनिस्टर म्हणून येथे बसलेला आहे. सदर प्रस्तावावरील चर्चा ऐकण्यासाठी माननीय सहकार,पणन,कृषी मंत्री उपस्थित नाहीत. शेतक-यांना सात टक्के दराने एक रुपयाचे तरी कर्ज या सरकारने वाटले आहे काय ? एकातरी शेतक-याला सात टक्के दराने कर्ज मिळालेले आहे काय ? शेतक-यांची फसवणूक करणा-या सरकारकरिता आम्हाला कोणते शब्द वापरावे हा प्रश्न पडलेला आहे. सरकारबाबत निषेध व्यक्त करुन आम्ही आता बर्हिगमन करतो.

( सन्माननीय विरोधी पक्षाचे सदस्य बर्हिगमन करतात.)

---------





**आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत.**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, काल दिनांक 16 एप्रिल,2007 रोजी चर्चा केल्याप्रमाणे आंबा उत्पादक शेतक-यांना झालेल्या नुकसानीची भरपाईची घोषणा करण्याबाबत शासन निवेदन करणार होते त्यावेळी संबंधित खात्याचे मंत्री देखील उपस्थित होते. आंबा उत्पादक शेतक-यांना हेक्टरी किती रुपये नुकसान भरपाई देणार हे सांगण्याचे कबूलही केले होते.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, काल असे ठरले होते की, यू.एल.सी. ॲक्ट संदर्भात कॅबिनेटची बैठक होणार असेल तर त्या बैठकीमध्ये आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा विषय मांडावा आणि निर्णय झाला तर सभागृहामध्ये निवेदन करावे. खालच्या सभागृहामध्ये काल लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय उपस्थित झाला होता. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितलेले आहे की, 15 दिवसात सर्व्हे केला जाईल आणि त्यानंतर निर्णय घेतला जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कोकणातील आमदारांची बैठक घेण्याचे ठरले होते. ती बैठक अद्याप झालेली नाही. आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाची अनास्था आहे. असे असेल तर सन्माननीय सदस्यांनी कशासाठी प्रस्ताव मांडायचा, कशासाठी चर्चा करायची, वांझोटी चर्चा करण्याला काय अर्थ आहे ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात काल सभागृहामध्ये चर्चा झाली. आंबा उत्पादक शेतक-यांना किती नुकसान भरपाई देण्यात येणार आहे याची माहिती माननीय फलोत्पादन राज्यमंत्री श्री.विनय कोरे सभागृहामध्ये जाहीर करणार होते. मला अशी माहिती मिळालेली आहे की, उद्या माननीय पणन मंत्री कोकणातील सर्व आमदारांची बैठक बोलाविणार आहेत. आंबा उत्पादक शेतक-यांना किती नुकसान भरपाई द्यावयाची हे माननीय फलोत्पादन मंत्री ठरविणार आहेत की पणन मंत्री ठरविणार आहेत ?

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : माननीय फलोत्पादन राज्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, परवा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन कोकणातील नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत सभागृहामध्ये चर्चा करावी, असे पोटतिडकीने सांगितले. मी अडीच तासाची चर्चा दिली. त्या चर्चेला आपण समर्पक उत्तर दिलेले आहे. गेल्या दोन वर्षामध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, हा विषय आहे. आपण सभागृहाचे कामकाज अजून अडीच ते तीन तास चालविणार आहोत. माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेता आला तर त्यादृष्टीने माननीय फलोत्पादन राज्यमंत्र्यांनी प्रयत्न करावा.

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, यावर्षी आंब्याचे उत्पादन कमी आलेले आहे. आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यास शासनाने सहमती दर्शविली आहे. 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेले असेल तर आंबा बागायतदारांना मागच्या वर्षीपेक्षा जास्त नुकसान भरपाई दिली जाईल, हे मी आधीच सांगितलेले आहे. सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर कोकणातील सर्व आमदारांची एकत्र बैठक घेतली जाईल. आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोकणातील सर्व आमदारांना विश्वासात घेतले जाईल. काल खालच्या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: ही घोषणा केलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. सर्व्हे होत राहील. त्याचे आम्हाला काही घेणे देणे नाही. आंबा उत्पादक शेतक-यांना शासन हेक्टरी किती मदत जाहीर करणार आहे ?

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, मागच्या वर्षी आंबा उत्पादक शेतक-यांना जी मदत देण्यात आली होती त्यापेक्षा जास्त मदत दिली जाईल, असे मी जाहीर केलेले आहे.

**सभापती** : अशा परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 54 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

-------

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17.09

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार)**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 5 वाजून 9 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली )

नंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर.. )

**सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

सभागृहाची बैठक सायंकाळी 5.24 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 5 वाजून 38 मिनिटांनी 20 मिनिटांकरिता स्थगित करण्यात आली.)

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6-00 वाजता 20 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

---

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**मु.शी.**: मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत ) ( सुधारणा ) विधेयक

**मु.शी.** : सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 73-महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत ) (सुधारणा) विधेयक या विधानसभेने संमत केलेल्या विधेयकात विधान परिषदेने केलेल्या सुधारणांना विधानसभेने सहमती दिल्याबद्दलचा संदेश

**उपसभापती** : विधेयकासंबंधी विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. प्रधान सचिव तो वाचून दाखवतील.

<u>संदेश</u>

सहसचिव : महाराष्ट्र विधानसभा नियम 144(1) अन्वये कळविण्यात येत आहे की, विधानसभेने दिनांक 6 डिसेंबर, 2005 रोजी संमत केलेल्या सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 73-महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक यात विधान परिषदेने दिनांक 16 एप्रिल, 2007 रोजीच्या बैठकीत संमत केलेल्या पुढील सुधारणांना विधानसभेने आपल्या दिनांक 17 एप्रिल, 2007 रोजीच्या बैठकीत संमती दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ KGS/ MHM

सहसचिव .......

| अ.क्र. | खंड | सुधारणा |
|---|---|---|
| 1. | खंड 4 | पृष्ठ क्रमांक 2 वर ओळ क्रमांक 28 व 29 ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा-<br>" आणि कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, सहकारी संस्थेच्या जिल्हा उपनिबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याची, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल आणि निरनिराळ्या स्थानिक क्षेत्रांसाठी, निरनिराळ्या अधिका-यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल." |
| 2 | खंड (7) (क) | पृष्ठ क्रमांक 4 वर, ओळ क्रमांक 7 व 8 मधील "पोट-कलम (3) मध्ये," या मजकुराने सुरु होणा-या व "हा मजकूर दाखल करण्यात येईल" या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा - "पोट-कलम (3) मध्ये "एका वर्षापर्यंत वाढविता येईल" या मजकुराने सुरु होणा-या आणि "या दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-<br>"सहा महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयापेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील," |

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM

**पृ.शी.**: 26 जानेवारी व 15 ऑगस्ट या दिवशी तहसील कार्यालयाच्या झेंडा वंदनाचा कार्यक्रम आमदारांच्या हस्ते होण्याबाबत.

**पृ.शी** : 26 जानेवारी व 15 ऑगस्ट या दिवशी तहसील कार्यालयाच्या झेंडा वंदनाचा कार्यक्रम आमदारांच्या हस्ते होण्याबाबत माननीय राजशिष्टाचार राज्यमंत्री यांचे निवेदन.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( राजशिष्टाचार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत मी खालीलप्रमाणे निवेदन करीत आहे.

माननीय विधान परिषद सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत शासनामार्फत साकल्याने विचार करण्यात आला. राष्ट्रध्वजासंदर्भातील बाबी हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. यास्तव याबाबत केंद्र शासनाचे मार्गदर्शन मिळविण्यात आले. दिनांक 26 जानेवारी व 15 ऑगस्ट या दिवशी साजरे करण्यात येणारे प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनाचे राष्ट्रीय समारंभ भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार साजरे करण्यात येतात. या समारंभाची सर्वसाधारण रुपरेषा कशी असावी व कोणाच्या हस्ते ध्वजारोहण व्हावे, याबाबतच्या सूचना केंद्र शासनाकडून दिल्या जातात व त्यानुसार समारंभाची आखणी केली जाते. या प्रकरणी केंद्र शासनाने असे कळविले आहे की, उपविभागीय स्तरावर मंत्री / उपविभागीय दंडाधिकारी यांनी ध्वजारोहण करणे अभिप्रेत आहे. सध्याच्या या प्रचलित पध्दतीत बदल करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन नाही. केंद्र शासनाच्या या अभिप्रायानुसार राज्यात 26 जानेवारी व 15 ऑगस्ट रोजी साजऱ्या करण्यात येणाऱ्या प्रजासत्ताक व स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी तालुक्याच्या ठिकाणी शासकीय समारंभात तहसिलदारांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याची सध्याची प्रचलित पध्दत कायम ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

---

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने, "राज्यात विशेषत: औरंगाबाद, गडचिरोली, यवतमाळ व सोलापूर जिल्ह्यात कुपोषणामुळे बालकांच्या मृत्यूत झालेली वाढ" या विषयावरील सर्वश्री सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरीया, मुझफ्फर हुसेन सय्यद, संजय दत्त, धनाजी साठे, प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री श्रीकांत जोशी व प्रतापसिंह मोहिती-पाटील, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 19650ला दिनांक 13 जुलै, 2006 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे कृपया अधिक माहिती छापावी.)

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय शिक्षण मंत्री उपस्थित नाहीत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शिक्षकांच्या संदर्भातील विधेयक या सभागृहामध्ये गोंधळामध्ये मंजूर करण्यात आले. त्यावेळी शिक्षकांचे प्रतिनिधीत्व करणा-या सन्माननीय सदस्यांनी, त्या विधेयकावर त्यांना विचार मांडावयाचे असल्यामुळे ते विधेयक गोंधळामध्ये मंजूर करु नये, अशी विनंती केली होती. परंतु ते विधेयक चर्चेविना मंजूर करण्यात आले. त्यानंतर त्या विषयाच्या संदर्भात नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. ज्यांनी या प्रस्तावाबाबत आग्रह धरला होता ते सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे तसेच प्रा. बी.टी.देशमुख आणि अन्य सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. दुसरे असे की, तालिका सभापतींनी आजच्या कामकाजपत्रिकेवरील नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात येतील असे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा प्रस्ताव नंतर नाकारला जाऊ नये म्हणून मी हे सर्व रेकॉर्डवर आणित आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांची परवानगी असेल तर आता मी विधानसभेकडून संमत होऊन आलेले विधेयक चर्चेसाठी घेतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक

**L.A.BILL NO XXIX OF 2007**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGPUR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965)**

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 29 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 29, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, याच विषयाच्या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये विधेयक संमत केले होते. महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या राखीव जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्र भरताना स्वत:चा जातीचा दाखला देणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी त्यांना तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला होता.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे........

सभापती महोदय, या तीन महिन्याच्या कालावधीच्या माध्यमातून जे विधेयक किंवा अध्यादेश त्यावेळी काढला होता त्याचे कारण एकच होते ते म्हणजे नगरपालिका व महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. त्याच दरम्यान जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असणारे बिल आले. या दोन्ही बाबी एकाच वेळी झाल्यामुळे जनतेला सुध्दा याची माहिती नव्हती. जो उमेदवार निवडणुकीला उभा राहणार आहे त्याला याची पूर्वकल्पना नव्हती की, अशा पध्दतीचा अधिनियम अस्तित्वात येणार आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात सगळीकडून प्रेशन डेव्हलप झाले. आम्हाला याची माहिती नसल्यामुळे वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी कालावधी दिला जावा अशी मागणी करण्यात आली. खास करुन नामनिर्देशन पत्र दाखल करीत असताना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव दाखल केला आहे याचा पुरावा अर्जासोबत सादर करावा एवढीच अट घालण्यात आली होती आणि निवडून आल्यानंतर तीन महिन्याच्या काळात जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा निवडून आलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल अशा प्रकारची तरतूद करण्यात आली होती. 169 नगरपालिकांच्या निवडणुका नोव्हेंबर, 2006 मध्ये पार पडल्या. या 169 नगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने पहिल्यांदा शासनाने बिल आणले असल्यामुळे आणि नव्याने कायदा झाला असल्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची संख्या कमी होती, ती संख्या वाढविण्याचा प्रयत्न झाला. सहा ऐवजी आता 13 जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या निर्माण केल्या आहेत. तरी देखील काही प्रमाणात वेळेत काम न होऊ शकल्यामुळे 169 नगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये 35 उमेदवारांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र सादर करता न आल्यामुळे त्यांची निवड रद्द करण्याचा प्रसंग आला आहे. अशा परिस्थितीत हा वेळ देण्याचा विषय नाही. परंतु यापुढे कालावधी रद्द करुन कायमस्वरुपी जनतेला याची माहिती झाल्यानंतर ज्यांना निवडणूक लढवावयाची आहे त्यांना नामनिर्देशन पत्रासोबत` जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले स्वत:चे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेच पाहिजे ही अट बंधनकारक असणार आहे. त्यामुळे आता नव्यानेच नगरपालिका व महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या असल्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्याची मुदत एका महिन्याने वाढवून ती चार महिन्याची करण्यात येत आहे एवढे बोलून मी माझे विचार पूर्ण करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कायदा अंमलात आणता येत नाही याची शासनाने कबूली दिली त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, तीन महिन्याच्या कालावधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून मिळणे शक्य नाही म्हणून ही मुदत एका महिन्याने वाढविण्यात येत आहे. असे करताना मंत्रीमहोदयांनी सभागृहाला हे सांगणे आवश्यक होते की, महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या दिवशी निवडणूक लढविली त्याच्या दुसऱ्या दिवशी पडताळणी समितीकडे किती प्रस्ताव दाखल झाले? त्यापैकी किती प्रस्ताव निकाली काढले? किती प्रस्ताव अनिर्णित राहिले? प्रशासकीय यंत्रणेकडे कामाची आवक वाढल्यामुळे, मोठया प्रमाणात अर्ज आल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली म्हणून तीन ऐवजी चार महिन्याची मुदत केली जात आहे. परंतु मंत्रीमहोदयांनी असे कारण सांगितले नाही. मुदत का वाढवित आहात? तीन महिन्याच्या काळात किती जात प्रमाणपत्रांची पडताळणी झाली? माझ्या माहितीप्रमाणे तीन महिन्यात कोणाच्याही अर्जाची पडताळणी झाली नाही? असे असेल तर एक महिन्यात काय होणार आहे? महाराष्ट्रात किती निवडणुका झाल्या? पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. या काळात किती अर्ज आले व किती तक्रारी आल्या? हे विधेयक सभागृहासमोर आले होते तेव्हा मी मुद्दा मांडला होता त्याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे. जात प्रमाणपत्र पडताळणी होत असताना एखाद्याचा अर्ज फेटाळला गेला किंवा अमान्य झाला त्याला जातीचा दाखला ज्या अधिकाऱ्यांनी दिला असेल त्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे हा विषय मी मांडला होता. हा मुद्दा अंमलात आला पाहिजे. अन्यथा पैसे घेऊन जात प्रमाणपत्राचा वैध दाखला दिला गेला तर त्यातून लोक निवडणूक लढवायला उद्युक्त होतील. जसे हे मॅनेज केले तसे पुढे करता येईल या भूमिकेतून निवडणूक लढविली जाईल. उमेदवाराला ज्या लोकांनी निवडून दिले त्याचे प्रमाणपत्र अवैध ठरले तर तो बाजूला जाणार आहे. लोक मतदान पक्षाला करीत असतात, व्यक्तीला करीत नाहीत. जातीचा दाखला अवैध ठरला तर हा प्रश्न निर्माण होणार आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्यांनतर दोन नंबरवर जो काणी उमेदवार असेल तो विजयी होईल का यासंदर्भात काहीही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. आता आपण जो कायदा करीत आहात तो पुन्हा बदलण्याची वेळ आपल्यावर येऊ नये अशी विनंती करतो. आपण मागील अधिवेशनाच्या वेळेस सांगितले होते की, पक्षाचा व्हीप मोडला तर त्या सदस्याला बाद करण्यात येईल परंतु तसे होतांना मात्र काही दिसत नाही. या सभागृहात चर्चा झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी तातडीने होणे आवश्यक आहे परंतु तसे होतांना दिसत नाही. यासंदर्भातील जो प्रश्न आहे, त्याला सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना तोंड द्यावे लागलेले आहे तसेच चंद्रपूरमध्ये सुध्दा हा प्रश्न निर्माण झालेला आहे. खरे म्हणजे अधिका-यांनी वेळेत नियमावली न केल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणी जे कायदे तयार होत असतात त्यावर आम्ही आमचे विचार व्यक्त करीत असतो तसेच विधेयकास समर्थन देत असतो परंतु तयार झालेला कायदा अंमलात आणण्याच्या दृष्टीने मागच्या सारखीच परिस्थिती परत येणार नाही याची काळजी सरकारने घेण्याची आवश्यकता आहे. जातपडताळणी मध्ये एखादा उमेदवार बाद झाला तर त्या ठिकाणी दोन नंबरवर जो उमेदवार असतो तो विजयी होईल की, त्या ठिकाणी पुन्हा नव्याने निवडणूक होईल याचे स्पष्टीकरण माननीय मंत्रीमहोदयांनी करावे अशी विनंती आहे.

-----------------------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. या विधेयकाच्या संदर्भात अगोदर जी 3 महिन्याची मुदत देण्यात आलेली होती ती मुदत एक महिन्यानें वाढवून दिलेली आहे. आपण हे विधेयक एवढया घाई-घाईने का आणले हे काही समजत नाही. हे विधेयक आणण्यामागील आपले काही तरी राजकीय कारण असावे असे आम्हाला वाटते. त्यामुळे हे विधेयक एवढया घाई-घाईने आणण्याचे काही कारण नव्हते. अगोदर जी 3 महिन्याची मुदत होती ती मुदत आपण एक महिन्याने वाढवून दिलेली आहे. आता एक महिना मुदत वाढवून दिल्यानंतर यामध्ये काही फरक पडणार आहे काय ? कायद्यावर माननीय राज्यपाल महोदयांनी सही केल्यानंतर आपली एकच धावाधाव होते, पक्ष एका बाजूला धावतो, मंत्री एका बाजूला धावतात तर अधिकारी एका बाजूला धावत असतात. हे काम तीन महिन्यात पूर्ण व्हावे यासाठी शासनाने काही प्रयत्न केलेले दिसत नाही, अधिकारी काही कामे करीत नाहीत. शेवटी आम्हाला निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांची भेट घ्यावी लागली, त्यांनी यासंदर्भात आदेश दिल्यानंतर मग अधिका-यांची धावाधाव सुरु झाली. त्यानंतर या कामास सुरुवात झाली. खरे म्हणजे या शासनाने लोकशाहीचा पार खेळखंडोबा करुन टाकलेला आहे. हे सरकार मनात वाटेल तेव्हा कायदा करते आणि मनात वाटेल तेव्हा त्यामध्ये बदल करीत असते. पहिल्यांदा हातवर करुन मतदान घेण्याचे ठरले तर नंतर पुन्हा हात खाली करुन आवाजी मतदान घेण्याचे ठरले. सभापती महोदय, हे सार्वभौम सभागृह आहे. या ठिकाणी कायदा मंजूर झाल्यानंतर त्या कायद्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे. गत पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मंजूर झाले होते. आता बारावीच्या विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र लागणार आहे परंतु आपला सगळा स्टाफ राजकीय व्यक्तींच्या जातपडताळणीच्या कामामध्ये गुंतलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र आता लवकर मिळू शकणार नाहीत असे दिसते. आपण प्रशासन चालवित आहात की, चाळ कमिटीचे काम करीत आहेत हे समजत नाही. या विधेयकामध्ये म्हटले आहे की, "राखीव पदावर निवडून आलेल्या काही पालिका सदस्यांनी असे प्रतिवेदन केले आहे की, पडताळणी समितीकडून

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी उक्त तीन महिन्यांची मुदत अपुरी आहे." सभापती महोदय, या विधेयकाचा काय परिणाम होईल याचा आपण विचारच केला नाही. आता आपण एक महिन्याची मुदत वाढवून मागितलेली आहे. एक महिना वाढवून दिलेल्या मुदतीत खरोखरच काम होईल की, अजून आपल्याला दोन महिन्याची मुदत वाढवून घ्यावी लागेल ?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

किमान विधेकात दुरुस्ती केल्याप्रमाणे त्या मुदतीत काम झाले पाहिजे. तसेच त्याठिकाणी त्याठिकाणी जो स्टाफ आहे त्यांचा देखील विचार झाला पाहिजे. कारण एखाद्या उमेदवाराच्या प्रमाणपत्राची पडताळणी करायची असेल तर त्या उमेदवाराच्या गावाला जाऊन तपासणी करावी लागते. त्यासाठी तेथील लोकल पोलीस बरोबर जातो, काही वेळा तो जात नाही. त्यासाठी लक्ष्मी दर्शन करावे लागते. मग अशाप्रकारे चारधाम यात्रा करुन कसेबसे सर्टीफिकेट मिळते. सभापती महोदय, पूर्वी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली होती, त्यामध्ये आता एक महिन्यांची वाढ करण्यात येत आहे. परंतु हा एक महिना पुरेसा आहे काय ? आता महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या त्यामध्ये निवडून आलेल्या उमेदवाराविरुध्द क्रमांक दोनच्या उमेदवाराने खोटी कागदपत्रे दाखविली अशी तक्रार केली अशाप्रकारच्या पिटीशन्स पेडींग आहेत. तेव्हा याबाबतची छाननी करण्यासाठी कालावधी अपुरा पडत असेल तर त्याबाबत आताच विचार करुन त्यात आणखी मुदतवाढ केली पाहिजे. सरकारने यापूर्वीच असा विचार केला असता तर ही सुधारणा आणण्याची नामुष्की सरकारवर आली नसती. याचा अर्थ सरकारला प्रशासनाचा अनुभव नाही हे सिध्द झालेले आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनी कबूल करावे.

सभापती महोदय, निवडणुकीच्या संदर्भात जातप्रमाणपत्र देण्यासाठी वेगळा स्टाफ असावा आणि विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र देण्यासाठी वेगळा स्टाफ असावा. कारण विद्यार्थ्यांना वेळेवर प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे त्यांचे आयुष्य टांगणीला लागलेले आहे. काही ठिकाणी कॉलेज मॅनेजमेंट विद्यार्थ्यांकडे सर्टीफिकेट नाही म्हणून त्यांना प्रवेश देत नाहीत. अशा कॉजेजेसमध्ये डोनेशन घेतले जाते किंवा कसे याची मला माहिती नाही. विद्यार्थ्याने सर्टीफिकेट आाणले नाही तर ती सीट रिकामी राहणार त्यामुळे कॉलेजेसचे नुकसान होणार आहे. तेव्हा विद्यार्थ्यांना जातपडताळणी सर्टीफिकेट देण्यासाठी वेगळा स्टाफ निर्माण केला पाहिजे आणि निवडणुीच्या संदर्भात प्रमाणपत्र देण्यासाठी वेगळा स्टाफ निर्माण केला पाहिजे. तेव्हा याबाबत विचार झाला पाहिजे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

सभापती महोदय, कोकण भवनातून सर्टीफिकेट आणावयाचे झाल्यास तोंडाला फेस येतो. तेथील अधिकारी कोणाचेही ऐकत नाहीत. मंत्रिमहोदयांनी फोन केला तरी काही उपयोग होत नाही. अगोदरच शालेय शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांच्या मार्कामध्ये घोळ घातलेला आहे. त्यामुळे विद्यार्थी त्रस्त आहेत. तेव्हा या विधेयकाद्वारे जी एक महिन्यांची मुदत वाढविण्यात येत आहे त्यामध्ये आणखी मुदतवाढ करण्याबाबत आताच विचार करावा अन्यथा सरकारला पुन: अध्यादेश काढावा लागेल, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.स.वि.क्र. 29- महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक 2007 यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. सुरुवातीस असे सांगण्यात आले होते की, नामनिर्देशनपत्रासोबत जातपडताळणी समितीचे प्रमाणपत्र सादर केले जावे. परंतु अचानक निवडणुका जाहीर झाल्यामुळे उमेदवारांना वैध प्रमाणपत्र आणणे शक्य झाले नाही. त्यावर असा निर्णय घेण्यात आला की, नामनिर्देशनपत्रासोबत फक्त रिसीट जोडावी आणि निवडणूक झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत जातप्रमाणपत्र आणावे, अन्यथा निवडणूक रदबादल होईल. परंतु आज अशी परिस्थिती आहे की, मोठ्या प्रमाणावर अर्ज आलेले असल्यामुळे त्या अर्जांची छाननी करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्यांनी दुकाने उघडली आहेत.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

चौकशी अधिकारी ज्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची छाननी करतात, त्यांच्या विरोधात लढलेल्या उमेदवारांबरोबर फिरत असतात. पध्दत अशी आहे की, अर्ज दाखल करताना इतर कागदपत्रे व जातीचे प्रमाणपत्र घेतले जाते. प्रथम दिलेली कागदपत्रे बरोबर आहेत की नाही, याची छाननी होत असते. यामध्ये प्रत्येक कागदपत्रांची छाननी होत असते. कागदपत्रे बरोबर आहेत की नाहीत याची शहानिशा होऊनच जातीचे वैधता प्रमाणपत्र दिले जाते. त्यामुळे याठिकाणी स्क्रुटीनीची पध्दत काय असेल याबाबतच्या सगळया गोष्टी ठरवून घेणे आवश्यक आहे. यासाठी तीन महिन्यांचा कालावधी कमी पडतो, अशी भावना सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मांडली. एका बाजूला विद्यार्थ्यांच्या कागदत्रांची स्क्रुटीनी चालू आहे व दुसऱ्या बाजूला निवडून आलेल्या सदस्यांच्या कागदपत्रांची स्क्रुटीनी चालू आहे, परंतु या कामासाठी आपल्याकडे स्टाफ कमी पडत आहे, ही वस्तुस्थिती आहे. तीन महिन्यांच्या आत हे काम होऊ शकत नाही. निवडणुकीमध्ये जे हरलेले उमेदवार आहेत ते याबाबतीत फायदा घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांची अशी भावना असते की, याबाबतचे पिटीशन स्मॉल कॉज कोर्टामध्ये पडलेले असल्यामुळे याची स्क्रुटीनी लवकर झाली नाहीतर त्या जागी निवडणुकीमध्ये हरलेला उमेदवारास विजयी घोषित केले जाईल. त्यामुळे जो उमेदवार निवडणुकीमध्ये जिंकलेला आहे, त्याच्यापेक्षाही निवडणुकीत हरलेला उमेदवार या कामामध्ये आक्रमक झालेला आहे किंवा या कामामध्ये त्याचा इंट्रेस्ट वाढलेला आहे. तसेच, याबाबतीत जात पडताळणी करणारे अधिकारी काय करतात, ते आपण पाहतोच. त्यांनी आज दुकाने उघडलेली आहेत, ते कोणाला भेटतात, कोणाकडून पैसे घेतात, दोन्ही बाजूच्या उमेदवारांकडून कसे पैसे घेतात, हे सर्व आपण पाहतो. अशाप्रकारे यामध्ये भ्रष्टाचाराचे फार मोठे कॉम्प्लेक्स उघडलेले आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरु नये. जात पडताळणीच्या नावाखाली अधिकाऱ्यांकडून वेगवेगळी जज्जमेंट अगोदरच दिली जातात. जात पडताळणीचा चौकशी अधिकारी अगोदरच सांगतात की, आपण डिस्क्वॉलिफाय होणार आहात. ज्या उमेदवाराच्या मुलाच्या कागदपत्रांची स्क्रुटीनी होऊन, त्यास प्रमाणपत्रही मिळालेले असते व ते प्रमाणपत्र सादर केल्यानंतरही चौकशी अधिकारी त्यांस सांगतात की, आपण बाद होणार आहात. एवढे-एवढे पैसे आणून दिले नाहीतर आम्ही असे-असे रिमार्क मारु, असे चौकशी अधिकारी सांगत आहेत. ज्या

..2.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

उमेदवाराने किंवा विद्यार्थ्याने त्याच्या वडिलांचे, चुलत्यांचे किंवा नातेसंबंधातील व्यक्तिचे वैधता प्रमाणपत्र सादर करुन जर प्रमाणपत्र घेतले असेल तर अशावेळी त्याच्या विरोधात उभा असलेला उमेदवार शाळेतील प्राचार्यावर दबाव आणून त्याला सोयीचे असेल ते लिहून घेतो. कारण, फार वर्षापूर्वी 1947 च्या आधी लोक जन्माचा दाखला किंवा जातीचे प्रमाणपत्र घेत नसत. अशावेळी जेव्हा जातीच्या प्रमाणपत्राची गरज लागे, तेव्हा ते शाळेत जाऊन प्राचार्याकडून लिव्हींग सर्टीफिकेटवर व्यवस्थित नोंदी करुन आणत असे. यामध्ये राजकीय पक्षांचा जास्त प्रमाणात हस्तक्षेत होत आहे. उमेदवारांचा फायदा करण्याच्या दृष्टीने विशेषत: आपल्या राज्यकर्त्यांचा जास्त हस्तक्षेप होत आहे. जात पतडताळणी समितीला जरी क्वॉसी ज्युडिशिअरी अधिकार असलेतरी ती समिती आज दबावाखाली काम करीत आहे. त्यामुळे याकडे माननीय मंत्री महोदयांनी बारकाईने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, जात तडताळणीच्या प्रोसेसचे काम तीन महिन्यांत होणे शक्य नाही. या बिलाच्या माध्यमातून आपण तीन महिन्यांमध्ये सदरचे काम होत नाही, हे मान्य केलेले आहे. त्यामुळे यामध्ये आपण एक महिन्यांची वाढ सुचविली आहे व ती चार महिने केली आहे, परंतु चार महिन्यांमध्ये वैधता प्रमाणपत्र मिळेल याची खात्री आपण देणार का ? याठिकाणी मी ठामपणे सांगतो की, हे काम चार महिन्यांमध्ये होऊ शकणार नाही. अजूनही बरेच अर्ज प्रलंबित आहेत. जात पडताळणी कार्यालयामध्ये तारखावर तारखा दिल्या जातात. जात पडताळणी कार्यालयामध्ये गेल्यानंतर आपले अधिकारी सांगतात की, याठिकाणचे पहिले अधिकारी उत्तर प्रदेशात निवडणुकीच्या कामांसाठी गेलेले आहेत, ते जोपर्यंत परत येत नाहीत, तोपर्यंत आम्ही यावर कुठलाही निर्णय घेणार नाहीत. अशाप्रकारे पुढील तारखा देण्याचे काम चालू आहे. आज कुठल्याही अर्जाची स्क्रुटीनी होत नाही, संशोधन अधिकाऱ्याचे रिमार्क होत नाहीत. ज्यांना डिस्क्वॉलिफाय करावयाचे आहे त्यांना तिसऱ्या महिन्याच्या शेवटच्या आठवडयात कळविले जाऊन निर्णय दिले जावे व अशाप्रकारे यामध्ये व्यूहरचना आखली जात आहे.

नंतर कु.गाकयवाड...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MHM/ KGS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. पुरी. 18.50

ॲड. अनिल परब......

सभापती महोदय,यामध्ये दुसरा सर्वात महत्वाचा भाग असा आहे की, शासनाने जो जी.आर काढलेला आहे त्याच्या आधारे सर्टिफिकेट बनविले जातात. या संदर्भात मी आपणास एक किस्सा सांगू इच्छितो,"कुरियन-शेट्टी" नावाची एक मागासवर्गीय जात गॅझेटमध्ये होती. पूर्वी ती एकच जात होती परंतु त्यात स्वल्पविराम दाखविल्यामुळे एका जातीच्या दोन वेगवेगळया जाती त्यामध्ये दाखविल्या गेल्या. काही उमेदवारांनी कुरीयन शेट्टी जातीच्या आधारावर 22 वर्षापूर्वी मागासवर्गीय जातीचे प्रमाणपत्र घेतले होते. या जातीचा सर्वच उमेदवारांनी 22 वर्षापासून फायदा घेतला व या जातीच्या आधारावर अनेक लोकांना नोकऱ्या देखील मिळाल्या होता परंतु यासंदर्भात आतापर्यंत कोणीही काहीही बोलले नाही. परंतु आता निवडणुकांमध्ये जे उमेदवार जिंकले आहे त्यांच्या विरोधात समाज कल्याण खात्याकडून पत्राद्वारे तक्रार केली गेली. कुरीयन,शेट्टी अशी जात नसून कुरीयन शेट्टी अशी ती जात आहे. त्यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही स्क्रुटीनी न करता 20 तारखेला डिसक्वालिफाय करुन टाकणार आहे. अशा प्रकारे दिलेल्या अधिकारांचा मोठया प्रमाणात गैरवापर जात पडताळणी समिती कडून होत आहे. त्यामुळे जात पडताळणी करण्याचे काम तीन महिन्यात पूर्ण होणार नाही. तहसिलदासराकडून जात पडताळणी करण्यासाठी प्रमाणपत्रावर जबाब लिहून घेतला जातो. त्यावेळी माझ्याकडे आलेले सर्व कागदपत्रे मी बघितली व त्यानुसार प्रमाणपत्र दिले. एवढेच उत्तर त्यांच्याकडून मिळते. दिलेले प्रमाणपत्र योग्य आहे की अयोग्य हे बघण्यासाठी जात पडताळणीचे शुक्लकाष्ठ मागे लागले आहे. त्यामुळे ही सिस्टिम फूलप्रुफ असणे आवश्यक आहे. त्या यंत्रणेमध्ये कोठेही भ्रष्टाचार असू नये. नाहीतर जो विरोधक आहे त्याच्याकडून व जो निवडणूक लढला आहे त्याच्याकडून अशा प्रकारे दोन्ही उमेदवारांकडून पैसे घेतले जातात व स्वतःच्या सोयीप्रमाणे निर्णय दिले जातात,अधिकारी प्रमाणपत्र देऊन आपले हात झटकून टाकतात. सभापती महोदय, केवळ तीन महिनेच नव्हे तर चार महिन्याचा कालावधी देखील जात पडताळणीसाठी कमी आहे. जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी किमान सहा महिन्याचा कालावधी देण्याची आवश्यकता आहे.अशी सुधारणा शासनाकडून केली जाईल अशी मी आशा बाळगतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र !



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित ) : सभापती महोदय, सन 2007चे वि.स.वि. क्र 29 हे विधेयक सभागृहात मांडले आणि या विधेयकान्वये जात पडताळणीचा तीन महिन्यांचा कालावधी एक महिन्यांनी वाढवून चार महिन्यांचा करण्यात यावा,अशी दुरुस्ती करण्यात यावयाची आहे. हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. या ठिकाणी केवळ एक महिन्याचा कालावधी वाढवून देण्यात येईल असे सांगण्यात आले आहे .सभापती महोदय, आताच नगरपालिका व महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. त्या निवडणुकांमध्ये मुंबईचे साधारण 227 उमेदवार उभे होते. ज्या ज्या ठिकाणी कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले नाही त्या सर्व ठिकाणी कॉंग्रेसच्या उमेदवारांनी निवडून आलेल्या उमेदवारांच्या विरुद्ध जात पडताळणी अधिकाऱ्यांकडे फेर तपासणीसाठी अर्ज केलेला आहे. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, या फेर तपासणी मधून ज्यांची जात चुकीची ठरते त्यांच्या ऐवजी निवडून न आलेला क्रमांक दोनचा उमेदवार विजयी घोषित केला जाईल. अशी सर्वसामान्य माणसाच्या मनात भावना निर्माण झाली आहे. सभापती महोदय या संदर्भात मी आमच्या विभागातील एक उदाहरण देऊ इच्छितो. निवडणुकीमध्ये कॉंग्रेसचे उमेदवार उभा होता, तो उमेदवार पराभूत झाला व समाजवादी पक्षाचा एक मुस्लिम उमेदवार निवडून आला. कॉंग्रेसच्या उमेदवाराने, समाजवादी पक्षाच्या उमेदवाराच्या विरुद्ध जात पडताळणी समितीकडे त्या उमेदवाराला डिसक्वालिफाय करण्यासाठी अर्ज करुन फेरतपासणीसाठी तक्रार दाखल केली. अशा प्रकारे मुंबईमध्ये अनेक ठिकाणी असे प्रकार घडलेले आहेत. जवळजवळ 70 ते 80 ठिकाणी जात पडताळणीसाठी चॅलेंज केले गेले. आताच सन्माननीय सदस्य ॲड अनिल परब यांनी सांगितल्याप्रमाणे येथे भ्रष्टाचाराचे खूप मोठे दालन उघडले गेले आहे. दोन्ही बाजूकडून पैसे घेतले जातात आणि न्याय काय दयायचा हे अधिकाऱ्यांकडून ठरविले जाते. अधिकारी जो निर्णय देतात तो मान्य केला जातो.

यानंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.......

ते लोक जात पडताळणी अधिका-यांकडे जातात. अशी किती प्रकरणे औरंगाबाद येथे गेली आहेत. त्या ठिकाणी त्यांच्यासमोर चर्चा सुरु झाली आहे. या दोन्ही उमेदवारांना औरंगाबादला बोलाविले गेले आणि दोघांची साक्ष घेऊन वैध उमेदवार कोणता आणि अवैध उमेदवार कोणता हे ठरविले जाणार आहे. यामधील जो मुस्लिम उमेदवार होतो तो माझ्याकडे आला आणि सांगायला लागला की, साहेब त्यांना समजावून सांगा, मी माझ्या जातीचा दाखला दिला आहे, तो बरोबर आहे, मला उगाच त्रास देण्यासाठी हे चालले आहे. मी त्याला सांगितले की, औरंगाबाद येथे जा आणि न्याय मिळवून घ्या, आम्हाला यासंदर्भात काही बोलता येत नाही. त्याचे कारण कायद्याच्या तरतुदी अशा केल्या आहेत की, जात पडताळणी अत्यावश्यक केली आहे.

सभापती महोदय, आता मला पुन्हा मागच्याच मुद्याकडे जावे लागते आहे. सन्माननीय शिवसेना प्रमुख, श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी मंडल आयोगाला विरोध केला होता. अतिशय धीटपणे देशामध्ये मेसेज दिला होता की, मंडल आयोग आणू नका, पोटाची भूक ही जातीची भूक समजू नका, पोटाची भूक महत्वाची ठरावी, जातीची ठरु नये. अशा पध्दतीने आम्ही देखील विधानसभेमध्ये मंडल आयोगाला विरोध केला होता. जाती आल्यामुळे जाती-जातीत संघर्ष सुरु झाला आहे. माझी जात शहाण्णवकुळी मराठा आहे, माझी ब्याणवकुळी मराठा आहे, हे जे चालले आहे ते जातीच्या निकषावर चालले आहे. आता काही शहाण्णवकुळी मराठयांमधील असे सांगतात की, आम्ही मराठा कुणबी समाजाचे आहोत. अशा पध्दतीने समाज विस्कळीत होत आहे व त्याचा परिणाम जाती-जातीत संघर्षाची ठिणगी पडण्यात होत आहे. सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी येथे हे विधेयक आणले आहे. मला त्यांना विचारायचे आहे की, हे जे काही चालले आहे ते त्यांनी तपासून पाहिले आहे का, यासंदर्भातील माहिती त्यांनी घेतली आहे का, तीन महिन्याची मुदत चार महिन्यांची करुन प्रश्न सुटणार आहे का, जे कोणी जात पडताळणी दाखला आणण्यासाठी जातात त्यांना दिलासा मिळेल असे या विधेयकामध्ये काय आहे ? हे माझे त्यांना प्रश्न आहेत.

सभापती महोदय, जे उमेदवार म्हणून उभे राहतात ते जातीचा दाखला आणण्यासाठी जातात, ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असतो ते दाखला आणण्यासाठी जातात,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

त्याशिवाय त्यांना प्रवेश मिळत नाही. समाननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला होता. कोणत्याही महाविद्यालयात प्रवेशासाठी गेल्यानंतर जातीचा दाखला बघून त्या विद्यार्थ्यांला कोणते कन्सेशन द्यायचे, फी माफ करायची का, प्रवेश द्यायचा की नाही, हे ठरविले जाते. ज्या विद्यार्थ्यांना कन्सेशन द्यायचे नसेल, प्रवेश द्यायचा नसेल त्याला जातीचा दाखला अयोग्य असल्याचे कारण सांगून परत पाठवायचे, अशी अनेक प्रकरणे आमच्याकडे नेहमी येतात. हा अतिशय चिंतेचा आणि काळजीचा विषय आहे. जाती-जातींमध्ये भिंती उभ्या करण्याचे काम या सगळया माध्यमातून होत आहे. जातींचे महत्व वाढले आहे. आमचा देश निधर्मी आहे, आम्ही सेक्युलर आहोत, अशी बोंब मारली जात असतांना अशा प्रकारे जाती-जातीत भिंती उभ्या करण्याचे काम होत आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, राजकीय पक्षांची सुध्दा अडचण होऊन बसली आहे. निवडणूका जाहीर केल्यानंतर उमेदवारी अर्ज भरण्याच्या तारखेअगोदर दोन दिवस उमेदवारी जाहीर होते, उमेदवारी जाहीर झाल्याशिवाय जातीचा दाखला आणता येत नाही आणि ज्यावेळी उमेदवारी जाहीर होते त्यावेळी धावपळ करुन दोन दिवसात दाखला आणावा लागतो. उमेदवार निवडणूकीला उभे राहण्याच्या अट्टाहासापायी लागेल तेवढा पैसा खर्च करतात, कर्ज काढतात, जमिनी विकतात, गाळे गहाण ठेवतात, स्पर्धेमध्ये भाग घेतल्यानंतर माघार घेता येत नाही आणि मग कसातरी दाखला आणला जातो. या उद्देशाने याकडे पाहिले पाहिजे. जो कायदा आपण करतो त्या कायद्यामुळे समाजाला खड्डयात घालायचे की खड्डयातून वर काढायचे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. आम्ही नेहमी आमचा कायदा असा तयार करतो की, जनतेला कुठल्याही बाबतीत जास्तीत जास्त त्रास होईल. यामुळे कोर्ट-कचे-या वाढतील, न्यायप्रविष्ट प्रकरणे वाढतील, कोणत्याही गोष्टी सहज, संघर्ष केल्याशिवाय पार पडत नाहीत.

सभापती महोदय, या विधेयकाच्या परिशिष्टामध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 यातील उतारे याचा उल्लेख केला आहे. सन 1888 चा मुंबई अधिनियम क्रमांक 3 हा जुना कायदा आहे.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.मधुकर सरपोतदार......

या कायद्याच्या परंतुकामध्ये असे म्हटले आहे की, एखाद्या व्यक्तीला जर निवडणूक जाहीर झालेल्या दिनांकापासून तीन महिन्याच्या मुदतीमध्ये जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले असल्यास व ते जर काही कारणास्तव अवैध आढळून आले तर त्या सदस्याचे सदस्यत्व भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मान्य करण्यात येईल आणि ती व्यक्ती आपल्याकडे सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल, हे या सरकारने काय केले आहे ? आता या परिच्छेद क्रमांक ( 6 ) मध्ये असे म्हटले आहे की,

" महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,1965 याच्या कलम 9 अ च्या दुस-या परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,जो राखीव जागेवर निवडून आलेला असेल,आणि ज्धला तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नसेल असा कोणताही पालिका किंवा परिषद सदस्य,वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तीन महिन्यांची मुदत,जणू काही,आणखी एक महिन्याने वाढविण्यात आली असल्याप्रमाणे,आणखी एक महिन्याच्या मुदतीकरिता पालिका किंवा परिषद सदस्याचे पद धारण करणे चालू ठेवील आणि तो निवडू आल्याच्या दिनांकापासून तीन महिने समाप्त झाल्याच्या दिनांकापासून सुरु होणा-या आणि महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा ( सुधारणा) अधिनियम,2007 याच्या प्रसिध्दीच्या दिनांकास समाप्त होणा-या कालावधीत अशा पालिका किंवा परिषद सदस्याने केलेली कोणतीही कार्यवाही ही,वैधरीतीने केलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि केवळ तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत त्याने वैधता प्रमाणपत्र सादर केले नव्हते या कारणावरुन,कोणत्याही न्यायालयात तिच्याबाबत आक्षेप घेता येणार नाही. "या ठिकाणी तीन महिन्याची मुदत एका महिन्याने वाढवून चार महिन्याची करण्यात आली आहे. परंतु याचे जे परिणाम आहेत ते या आदेशामधून निवडून आलेल्या लोकांवर होत आहेत. याबाबतची मुंबई महापालिकेची मी वस्तुस्थिती सांगितली. अनेक ठिकाणी या जात पडताळणी समितीवरुन संघर्ष झालेले आहेत व सर्वसामान्य माणसांमध्ये संभ्रमाची परिस्थिती निर्माण झालेली आहे तसेच, निवडून आलेल्या लोकांच्या डोक्यावर टांगती तलवार उभी राहिलेली आहे, हे

3W इ 2

श्री.मधुकर सरपोतदार.......

जातीचे प्रमाणपत्र योग्य नाही, हे अयोग्य आहे हे सिध्द करण्यासाठी वाटेल तेवढा पैसा खर्च करण्याची विरोधकांची तयारी आहे. सभापती महोदय, जर एखाद्याकडे भरपूर पैसा असेल तर या देशामध्ये,जगामध्ये कोणत्याही प्रकारचा चमत्कार होऊ शकतो किंवा तो घडवून आणू शकतो. एखाद्या सदस्याचे जातीचे प्रमाणपत्र त्या सदस्याच्या विरोधकांनी अवैध ठरवून त्या सदस्याचे सदस्यत्व नाकारले गेल्यानंतर जर तो सदस्य कोर्टामध्ये गेला तर त्याबाबत योग्य तो निर्णय होण्यासाठी कमीत कमी दोन वर्षाची रखड लागते. सभापती महोदय, हे जे चित्र या सुधारणेमुळे उभे राहते ते अतिशय भयानक असे चित्र आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, कोणताही कायदा करतांना तो भूतलक्षी प्रभावाने न करता भविष्यकाळामध्ये कसा प्रभावी ठरेल या दृष्टीकोनातून तयार केला पाहिजे. शासनाने कोणताही कायदा तयार करतांना त्याचे कमीत कमी दुष्परिणाम व जास्तीत जास्त चांगले परिणाम कसे होतील याची दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. कायद्यामध्ये विविध प्रकारचे कॉम्प्लीकेशन्स निर्माण करुन भ्रष्टाचाराची दालने वाढविण्याचा प्रयत्न या सरकारने केला नाही पाहिजे. कोणत्याही कायद्यातील तरतूदीमुळे सर्वसाधारण जनतेला किंवा एखाद्या उमेदवाराला कोणतीही चांगली गोष्ट करण्यासाठी स्वेच्छेने पुढे यावेसे वाटले पाहिजे, एवढा हा कायदा चांगला बनवा,परिणामकारक बनवा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. यानंतर येणा-या दुस-या अधिवेशनामध्ये आपल्याला सदर कायद्यातील ही तरतूद बदलावीच लागेल. म्हणून अशा पध्दतीचे अमेंडमेंट करु नका असे मला सांगावयाचे आहे. या कायद्यातील सुधारणेमुळे सामान्य जनतेला,उमेदवारांना व विद्यार्थ्यांना जो त्रास होत आहे तो त्रास कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावयाला हवेत. निवडून आलेल्या उमेदवाराला,सामान्य माणसाला,विद्यार्थ्यांना शासनाने या कायद्यातील ही सुधारणा बदलून दिलासा द्यावा आणि हा जो सगळा जातीचा बाजार मांडलेला आहे तो जातपडताळणीचा बाजार कुठेतरी थांबवावा, एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे व या विधेयकातील या सुधारणेला मी माझा विरोध दर्शवून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा विधेयकाच्या अनुषंगाने मला काही सूचना करावयाच्या आहेत. मागच्या वेळी सभागृहामध्ये ओ.बी.सी. समितीचा अहवाल सादर करण्यात आला होता. त्या समितीच्या अहवालामध्ये असे म्हटले होते की, महाराष्ट्रामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र देत असतांना गोंधळ होतो. महानगरपालिकेमध्ये, नगरपालिकेमध्ये सदस्य निवडून येत असतात. वैधता प्रमाणपत्र डिव्हीजन लेव्हलला दिले जाते. सदस्यांना सातत्याने तेथे जावे लागते. त्यामुळे अनेक वेळा गोंधळ आणि वाईट प्रकार घडतात. मागच्या वेळी सभागृहामध्ये ओ.बी.सी. समितीचा अहवाल सादर करण्यात आला होता. त्या अहवालामध्ये असे म्हटले होते की, डिव्हीजन लेव्हलला जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याचे अधिकार न ठेवता जिल्हा पातळीवर ठेवावेत. सामाजिक न्याय विभागामार्फत वैधता प्रमाणपत्र दिले जाते. ओ.बी.सी. समितीने केलेल्या सूचनेची शासनाने दखल घ्यावी आणि जिल्हावार समित्या गठित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा, अशी माझी शासनाला विनंती आहे. तीन महिन्यांची मुदत चार महिने करण्यासाठी सरकारला हे विधेयक आणावे लागले. मला असे वाटते की, जिल्हाधिका-यांना सक्षम अधिकारी केले तर गोंधळ थांबेल. ओ.बी.सी. समितीने केलेल्या सूचनेचा शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

---------

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन विभाग राज्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा या विधेयकावर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे, मधुकर सरपोतदार, सुधाकर गणगणे इत्यादी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करुन चांगल्या सूचना केलेल्या आहेत. मी सभागृहाचा थोडासा जास्त वेळ घेऊ इच्छितो. वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आपण तीन महिन्यांचा कालावधी दिला होता. त्याचे कारण असे आहे की, हा कायदा अंमलात आला त्यावेळी राज्यात महानगरपालिकांच्या, नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. महानगरपालिकेचे, नगरपालिकेचे नामनिर्देशन पत्र भरतांना वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. ज्यावेळी नामननिर्देशन पत्राबरोबर वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केले त्यावेळी राज्यात महानगरपालिकांच्या, नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. निवडणुकीचे फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. फॉर्म भरतांना वैधता प्रमाणपत्र सादर करणे अशक्य आहे, असे सर्व पक्षांकडून प्रेशर येत होते. त्यासाठी उचित कालावधी वाढवून देण्यासंदर्भात सुधारणा करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की, सारख्या-सारख्या सुधारणा आणू नये. ज्यावेळी जातीच्या प्रमाणपत्रावर निवडणुका लढविण्याची पद्धत होती त्यावेळी एस.डी.ओ. यांनी दिलेले प्रमाणपत्र बोगस आढळून आले होते. त्यामुळे नागपूर, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये पोट निवडणुका घ्याव्या लागल्या होत्या. म्हणून आपण जाणीवपूर्वक वैधता प्रमाणपत्र लागू करण्याचा कायदा आणला आणि या कायद्याचे सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले. नवीन कायदा लागू झाला त्यावेळी निवडणूका जाहीर झाल्या होत्या. वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी दिला होता. सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभाग या दोन विभागांच्या माध्यमातून वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही होत असते. जात पडताळणी करण्यासाठी 6 समित्या होत्या. हा कायदा आणल्यानंतर पॉलिटीकल प्रेशर वाढले होते. कामाचे स्वरुप वाढलेले असल्यामुळे 7 समित्या करण्यात आल्या. आता एकूण 13 समित्यांच्या माध्यमातून हे काम सुरु आहे. तरी सुध्दा हे काम वेळेत होऊ शकले नाही, असे निदर्शनास आले आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्री.गागरे ........

श्री.राजेश टोपे .....

मी सुरुवातीला सांगितले आहे की, 35 सदस्यांची निवड रद्द करण्यात आलेली आहे. या विधेयकातील सुधारणांमध्ये तात्पुरत्या स्वरुपाचा बदल करण्यात आलेला आहे. याबाबत मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, निवडणूक लढवायची असेल तर जात पडताळणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक असले पाहिजे, हे सर्व जनतेला समजले पाहिजे. जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी काही वेळ वाढवून देण्याची आवश्यकता आहे. नवीन कायदा अस्तित्वात येत असल्यामुळे आणि बऱ्याच निवडणूका एकत्रित जाहीर झाल्यामुळे ही मुदतवाढ देणे आवश्यक वाटते परंतु ही मुदतवाढ कायमस्वरुपी ठेवण्याची आवश्यकता नाही. पुढे कधी तरी ही तरतूद काढून टाकली पाहिजे व जात पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक करण्याची तरतूद केली पाहिजे. कारण सर्व लोकांना याची सवय झाली पाहिजे की, निवडणूक लढवायची असेल तर जात पडताळणी प्रमाणपत्र असले पाहिजे. याबाबत मी सांगू इच्छितो की, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे काम लवकर होण्यासाठी समित्यांची संख्या अजून वाढविण्यात येईल. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात अत्यंत जबाबदारीने जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कारभाराचा उल्लेख केला आहे, त्यांनी व्यक्त केलेल्या भावना ही वस्तुस्थिती आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी केवळ तीन महिने मुदत असल्याने वेळेचा गैरफायदा घेण्याची परिस्थिती तेथे जरुर चालू आहे. समितीतील काही लोक या कालमर्यादेमुळे भ्रष्ट नीती अवलंबित असण्याची शक्यता आहे. परंतु जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे हा काही लोकांसाठी नवीन विषय होता, त्यामुळे शासनाला या विधेयकात काही सुधारणा कराव्या लागल्या. मी नगरविकास खात्याचा मंत्री आहे, त्यामुळे माझ्या खात्याचा हा विषय नाही. तरीही याबाबत मी सभागृहात सांगतो की, जात पडताळणी समित्यांची संख्या वाढविणे, त्यांना अधिक कार्यक्षम करणे व नीटनेटके काम करण्याच्या सूचना सामाजिक न्याय व आदिवासी विभागाला देण्यात येतील.

सभापती महोदय, मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागेवरुन निवडून आलेल्या सदस्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. आताच काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, एक उमेदवार निवडून आल्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचा उमेदवार

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

त्याच्या निवडीमध्ये आठकाठी निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतो. सध्या समितीकडे बरीच प्रकरणे प्रलंबित आहे. जेष्ठता सूचीप्रमाणे एक-एक जात प्रमाणपत्र पडताळणी करुन देण्याचे काम समितीवर बंधनकारक आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विचारले की, निवडून आलेल्या उमेदवाराचे जात प्रमाणपत्र रद्द झाले तर निवडणूक निकालामध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सदस्याला विजयी घोषित करणार का ? याबाबत मी स्पष्ट करु इच्छितो की, या विधेयकातील तरतूदीनुसार जात प्रमाणपत्र रद्द झाल्यामुळे उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल व पोटनिवडणूक जाहीर होईल. परंतु न्यायालयाने विशेष बाब म्हणून काही निर्णय दिला तर दुसऱ्या क्रमांकावरील निवडून आल्याचे जाहीर केले जाते.

---------

.....3



PNG/ KGS/ MHM/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला कोणालाही अपात्र ठरविण्याचा अधिकार नाही, ही समिती फक्त त्यांचे निष्कर्ष देते. उमेदवाराला अपात्र ठरवायचे आहे किंवा नाही, याबाबतचा निर्णय निवडणूक आयोग घेतो. परंतु आता बऱ्याच उमेदवारांची अशी भावना अशी झालेली आहे की, ज्या दिवशी जात पडताळणी समिती त्यांचे निष्कर्ष देईल व त्या दिवशी निवडणूक आयोग त्याला अपात्र ठरवेल. ज्या उमेदवारांचे स्मॉल कॉज कोर्टामध्ये पिटीशन पेंडींग आहेत, त्या कोर्टामध्ये प्रमाणपत्र रद्द झालेल्या निर्णयाची प्रत दिली तर, त्याच्या आधारावर निवडून आलेल्या उमेदवाराला कोर्ट बाद करील व दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराला विजयी करील, अशा प्रकारचे भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. उमेदवारांमध्ये एकमेकांना अपात्र करण्याची व पैशाची स्पर्धा लागलेली आहे. मंत्री महोदयांनी याबाबत काही तरतूद सदरील विधेकायत करावी, असे माझे मत आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, मी त्याचे समर्थन करतो. मला हेच मुद्दे सांगावयाचे आहेत. सध्या महाराष्ट्रात निवडून आलेल्या उमेदवाराचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले तर तेथे पोटनिवडणूक घेतली जाते. विशेषत: मुंबई महानगरपालिकेमध्ये आपण बघितले तर कित्येक उमेदवारांकडे जात पडताळणी प्रमाणपत्र नसल्यामुळे त्याची निवड रद्द झालेली आहे. मुंबई महानगरपालिकेतील अशा प्रकारच्या केसेससाठी स्मॉल कॉज कोर्ट आहे. ज्या ठिकाणी स्मॉल कॉज कोर्ट नाही तेथे अशा प्रकारच्या केसेससाठी सिव्हील कोर्ट किंवा डिस्ट्रीक्ट कोर्ट आहे. परंतु महानगरपालिकेच्या ज्युरीडिक्शनमध्ये असे तंटे सोडविण्यासाठी कॉम्पीटंट कोर्ट म्हणून स्मॉल कॉज कोर्ट आहे. थोडया वेळापूर्वी माननीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला की, कोर्टामध्ये अशा प्रकारचे रिट पिटीशन दाखल केलेले असेल व निवडून आलेला उमेदवार अपात्र झाला तर कोर्टात द्वितीय क्रमांकाच्या उमेदवारला निवडून आल्याचे जाहीर केले जाते. याबाबत माननीय मंत्री महोदयांचे मत काय आहे ?

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश देशमुख : सभापती महोदय, यामध्ये परवाच्या ज्या नगरपालिकांच्या निवडणुका झ ााल्या त्यात बहुतांश बऱ्याच नगर पालिकांमध्ये एक दोन सदस्य हे जात पडताळणीमध्येच बाद झ ााले. ही वस्तुस्थिती आहे. माझ्याच नगरपरिषदेमध्ये अशा प्रकारे सहा सदस्य बाद झालेले आहेत आणि त्यात सगळ्याच पक्षांचे आहेत, कोठल्याही एका पक्षाचे आहेत असे नाही. त्या संदर्भात निकाल देताना मुंबई हायकोर्टाने जो निवडून आलेला सदस्य बाद झाला त्याच्या नंतरचा म्हणजे दोन नंबरवर असलेला उमेदवार निवडून आल्याचे जाहीर केले. पण तोही याच मुद्यावर बाद झाल्यामुळे तिसऱ्या नंबरवरील उमेदवाराला घोषित केले. तोही बाद झाल्यानंतर चौथ्या नंबरवरील उमेदवाराला घोषित केले आणि तोही बाद ठरल्यानंतर पाचव्याला घोषित केले. तेव्हा शासनाने याबाबतीत ही तरतूद करण्यास काहीच अडचण नाही. आम्ही पूर्ण ताकद लावून निवडणुका लढवायच्या आणि अशा प्रकारे उमेदवार बाद होणार असतील तर त्याच्या नंतरच्या क्रमांकावर असलेल्या उमेदवाराला निवडून आलेला उमेदवार म्हणून घोषित करण्यात काय अडचण आहे ? या संबंधात एक रिट पिटीशन औरंगाबाद कोर्टामध्ये दाखल केली गेली आहे. त्याची प्रत देखील मी आपणास देण्यास तयार आहे. तेव्हा यामध्ये दोन्ही पार्टीचे लोक असतात, ज्यांचे बोगस प्रमाणपत्र असेल त्याच्या मागे दुसऱ्या पार्टीचे लोक लागतातच. कारण शेवटी गावामध्ये त्या उमेदवाराची जात कोणती आहे हे सर्वांनाच माहिती असते. त्यामुळे एक बाद ठरल्यानंतर त्यानंतरच्या दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराला घोषित करण्याची तरतूद आपण करणार का ?

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.देशमुख यांनी जो मुद्दा येथे सांगितला, मुंबई हायकोर्टाच्या जजमेंटची माहिती देऊन, तो थोडा वेगळा आहे. जे पिटीशन स्मॉल कॉज कोर्टामध्ये पेंडींग आहे त्याच्यामध्ये जातीच्या आधारे सदर उमेदवार डिस्क्वालिफाय झाला म्हणून त्यानंतरच्या क्रमांकावरील उमेदवारास घोषित केलेले आहे. ही गोष्ट पूर्णत: वेगळी आहे. आता जात पडताळणी समितीकडून जी याबाबत स्कृटिनी केली जाते आणि त्या समितीचा जो अभिप्राय येतो त्यातून तो उमेदवार बाद ठरतो आणि त्या आधारे त्या उमेदवारास निवडणूक आयोगाने बाद केले. तर त्याचे ते जातीचे प्रमाणपत्र घेऊन दुसऱ्या क्रमांकाचा उमेदवार कोर्टामध्ये जाईल आणि त्याला डिस्क्वालिफाय केले जाईल. तेथे ही केस पूर्णपणे मेरिटवर चालेल आणि

...... 3झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परब .....

जातीच्या आधारावर त्याला डिस्क्वालिफाय केले जाईल. तेथे हे सांगतात ते लागू होते. परंतु आता ही परिस्थिती आहे. त्यावेळी तीन महिन्यांचा कायदा नव्हता. तो नसताना जेव्हा सर्व उमेदवार जात पडताळणी समितीला पैसे देऊन त्यांच्याकडून जातीचे प्रमाणपत्र घेतले की, ते घेऊन स्मॉल कॉज कोर्टामध्ये मी जाईल आणि त्याला बाजूला करून मी पुढे जाईन. तेव्हा त्याबाबतीत आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून स्पष्टीकरण पाहिजे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश देशमुख यांनी परभणीच्या बाबतीत येथे सांगितले. तेव्हा हा कायदाच अस्तित्वात नव्हता. त्यामुळे लोकांनी कोर्टामध्ये धाव घेतली होती. कोर्टाने त्यांना स्कृटिनी समितीकडे पाठविले. पण आता राज्याने कायदा केला आहे आणि त्यामध्ये आम्हाला हे स्पष्ट दिसते आहे की, यात आपण जात पडताळणीचे प्रमाणपत्र देण्याचे कलम टाकले आहे आणि त्यासाठी 3-4 महिन्यांचे बंधन घातले आहे. हे प्रमाणपत्र त्यांनी दाखल कोठे करायचे ? तर जेथून ते निवडून आलेले आहेत तेथे आणि त्यांना ते तीन महिन्यात मिळाले नाही तर त्याची जागा त्यामुळे रिक्त झाली म्हणून तेथील निवडणूक अधिकारी जाहीर करील. आता असा कोठलाही उल्लेख मला यात आढळला नाही की, तो जात पडताळणीमुळे बाद झाला म्हणून पुढच्याला घोषित करायचे. तसा कायदा नाही किंवा निवडणूक आयोगाच्या कोडमध्ये देखील तसे काही नाही. कोणत्याही कायद्यात वा घटनात्मक तरतूद देखील तशी नाही. शेवटी या सगळ्या घटनात्मक बाबी आहेत. निवडणूक हा प्रकारच घटनेतून आलेला आहे आणि त्यांना घटनेने एक चौकट आखून दिलेली आहे त्या चौकटीतून ते बाहेर जाऊ शकत नाहीत. तेव्हा असे झाले तर ती जागा रिक्तच होणार आहे आणि तेथे पोट निवडणूक होणारच. सन्माननीय सदस्यांनी जो काळातील मुद्दा सांगितला तेव्हा कायद्याच अस्तित्वात नव्हता आणि आता ते येथे लागू होणार नाही असे आमचे मत आहे. तेव्हा याबाबत मंत्री महोदयांनी काय आहे ते स्पष्ट करावे.

( यानंतर श्री. सरफरे .... 4ए 1 ..

**कुमारसेन बा. सुंबरे**, प्रतिवेदक
प्रतिवेदन शाखा, म.वि.सचिवालय,

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधान भवन, मुंबई 400 032.

दिनांक : 16 जून, 2007.

प्रति,

प्रधान सचिव,
म. वि. सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

माननीय महोदय,

मी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दिनांक 10.7.2007 ते 13.7.2007 या कालावधीत कार्यालयात उपस्थित राहू शकलो नाही. तत्संबंधात मी दिनांक 11.7.2007 रोजी पत्राद्वारे कार्यालयास कळवून सदरहू चार दिवसांची वैद्यकीय रजा मिळावी म्हणून विनंती केली आहे. त्यानुसार मी आज सोमवार, दिनांक 16 जून, 2007 रोजी रितसर कार्यालयात मध्यान्हापूर्वी रूजू होत आहे.

सोबत आवश्यक ते वैद्यकीय प्रमाणपत्र जोडत आहे.

कृपया माहितीसाठी सादर.

आपला नम्र,

( कुमारसेन बा. सुंबरे )
प्रतिवेदक,म.वि.स.

अ.मु.प्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ते याठिक्ाणी लागू होणार नाही असे माझे मत आहे त्याबाबत स्पष्टता करावी. आणि एकदा जात पडताळणी झाल्यानंतर जात पडताळणीमध्ये तो उमेदवार अपात्र ठरल्यानंतर त्याच्या जागेवर दुसरा उमेदवार निवडून येणार नाही. त्याठिक्ाणी आपल्याला निवडणूक घ्यावी लागेल. तसे स्पष्ट धोरण आपण जाहीर करावे. आणि तशाप्रकारचा संदेश लोकांपर्यंत गेला पाहिजे. त्यामुळे सध्या जात पडताळणीचे जे रेट वाढले आहेत ते कमी होतील...

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी महत्वाचा मुद्दा मांडला. त्याबाबत माझ्या उत्तराच्या भाषणामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे. जातपडताळणीमध्ये निवडून आलेला उमेदवार अपात्र ठरल्यानंतर त्या जागेवर दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवार निवडून आला असे घोषित न करता त्याठिक्ाणी निवडणूक घ्यावी अशाप्रकारचे मत आपण याठिकाणी मांडले आहे. याबाबतीत सांगू इच्छितो की, त्यांनी तीन महिन्याच्या आत आपले वैधता प्रमाणपत्र महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे सादर केले नाहीतर भूतलक्षी प्रभावाने त्याची निवड आपोआप रद्द होते. त्यामुळे याठिकाणी तीन-चार महिन्यानंतर जात पडताळणी प्रमाणपत्र रद्द झाले तरीसुध्दा त्याठिक्ाणी वैधता प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे. त्याठिक्ाणी अवैध प्रमाणपत्र असेल तर ते दाखल होऊ शकत नाही. त्याबाबत निवडणूक आयोगाला कळविले जाईल आणि निवडणूक आयोगामार्फत त्याठिकाणी पोट निवडणूक लागू होईल असे मी याठिकाणी स्पष्ट करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी दुसरा महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी अँटी डिफेक्शनचा मुद्दा उपस्थित केला. अँटी डिफेक्शनच्या माध्यमातून एखाद्याने व्हीप पाळला नाहीतर त्या ठिकाणी नगरपालिकेसाठी जिल्हाधिकारी आणि महानगरपालिकेसाठी आयुक्त यांचेमार्फत हियरींग घेतले जाईल ही बाब या कायद्याशी संबंधित नाही. हा अँटी डिफेक्शनचा कायदा ग्राम विकास विभागाचा आहे . याबाबत त्यांच्याकडे नियम तयार करुन पाठविण्याची आवश्यकता आहे, ते निश्चितपणे पाठविले जाईल असे याठिकाणी सांगतो. त्यामुळे याठिकाणी जात पडताळणी समिती वाढविण्याचे काम अधिक चांगले सक्षम व पारदर्शक ठेवण्यासाठी शासनाच्या वतीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील. त्यामुळे याठिकाणी कालावधी वाढविण्याबाबत विधेयकात करण्यात आलेला बदल मान्य करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे म्हणाले की, जात पडताळणी समितीचे विभागीय स्तरावर असलेले काम जिल्हा स्तरावर व्हावे अशी त्यांनी मागणी केली आहे. त्याकरिता आपल्याला कर्मचारी वर्ग लागेल. त्याचप्रमाणे जात पडताळणी प्रमाणपत्रावर सही करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांना सक्षम अधिकारी म्हणून अधिकार असावेत अशी त्यांनी मागणी केली. ही बाब सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाची असून याबाबत त्या विभागांना सूचना देऊन याबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही करु.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लोकसभेच्या, विधानसभेच्या, जिल्हा परिषदेच्या, महानगरपालिकेच्या निवडणुकीला उभे रहाण्यापूर्वी त्या उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरतांना आपली मालमत्ता जाहीर करावी लागते. परंतु या सर्व प्रकरणामध्ये उमेदवार निवडून येण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्राचे रेट कशापध्दतीने वाढविले जातात हे अनुभवाला आले आहे. जात पडताळणी प्रमाणपत्राचे वेगवेगळे रेट आहेत. याबाबत एक महिन्याच्या आत निर्णय घेतला जात नाही. तो एक महिन्याच्या आत घेणे बंधनकारक केले पाहिजे. त्याचप्रमाणे प्रमाणपत्र देण्याकरिता ज्या अधिकाऱ्यांना बसविण्यात येते त्यांच्या संपत्तीचे विवरणपत्र शासनाने दाखल करुन घेतले पाहिजे. खासदारांना, आमदारांना, नगरसेवकांना आपल्या संपत्तीचे विवरणपत्र सादर करावे लागते. तर मग जात पडताळणी प्रमाणपत्र देऊन तो अधिकारी किती वजनदार झाला आहे हे जाहीर झाले पाहिजे. तरच हे काम निपक्षपातीपणे होईल. ते विवरणपत्र जाहीर करणे त्यांच्यावर बंधनकारक केले पाहिजे अशी विनंती करतो. आज आपण वेगळया पध्दतीने अलिबाबाची गुहा उघडली आहे ती कुठेतरी थांबली पाहिजे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, या विधेयकावर चांगल्या प्रकारची चर्चा झाली. तरीही माझ्या मनामध्ये एक शंका आहे. माननीय सदस्य श्री. सुरेश देशमुख यांनी याठिकाणी उदाहरण दिले की, जात पडताळणीमध्ये पहिला उमेदवार बाद झाला, त्यानंतर दुसरा बाद झाला, त्यानंतर तिसरा बाद झाला अशाप्रकारे चौथा व पाचवा उमेदवार लागोपाठ बाद झाल्यानंतर आपण एकाच निर्णयामध्ये सहाव्या उमेदवाराला डिक्लेअर करणार.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (पुढे सुरू...

हा एकदा निर्णय झाला. त्या संबंधाने माझी शंका आहे, म्हणून मी विचारतो. जातपडताळणी नंतर करण्यापेक्षा अगोदर करणे आवश्यक आहे. समजा, एक उमेदवार बाद झाला, त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचा उमेदवाराला निवडले, तोही बाद झाला. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकाचा उमेदवारही बाद झाला... असे होत होत चारपाच क्रमांकापर्यन्त जाईल. डिपॉझिट जप्त झालेला उमेदवार देखील निवडून येऊ शकेल. म्हणून उमेदवारांचा अर्ज भरताना त्याच वेळेला वैधता प्रमाणपत्र त्याने दिले पाहिजें, अशी तरतूद शासन करणार काय ?

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, अशाप्रकारचे जातीचे खोटे प्रमाणपत्र देण्याची प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. आपण आता जातीचे प्रमाणपत्र देऊ आणि तीन महिन्यानंतर काय होईल पाहू, असे म्हणून उमेदवार अर्ज भरतात. स्वत:ची जात कोणती आहे हे प्रत्येकाला माहीत असते. असे असताना मागासवर्गीयांच्या जातीवर अतिक्रमण करण्याची प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सांगितल्याप्रमाणे जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय निवडणुकीला उभे रहाण्यास पात्र ठरवू नये. नाही तर एकदा निवडणुकीला पात्र ठरल्यानंतर तीन महिन्यानंतर पुढे काय होईल हे पाहू, असेच चालू रहाणार आहे. यापेक्षा हा कायदा स्ट्रिक्ट करावा. एखादा माणूस दोषी ठरला तर त्याच्यावर क्रिमिनल कारवाईची तरतूद केली पाहिजे. एखाद्या अधिकाऱ्यांने खोटे प्रमाणपत्र दिले तर त्या अधिकाऱ्याला सस्पेंड केले जाते, तसे या उमेदवारांच्याबाबतीत सुध्दा केले पाहिजे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, 22 वर्षानंतर टेक्निकल एरर शासनाच्या लक्षात आलेली आहे. "कुरियन शेट्टी" या नावाने तहसिलदाराने सर्टिफिकट दिलेले आहे. 22 वर्षांने शासनाच्या लक्षात आले की, यामध्ये स्वल्पवविराम असावयास नको होता. 22 वर्षांनी शासनाच्या लक्षात आल्यानंतर शासनाकडून ही "टायपोग्राफीकल एरर आहे" असे पत्र देऊन निवडून आलेला उमेदवार बाद करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता आहे, याबाबती शासनाचे काय मत आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी उपस्थित केलेला मुद्दा महत्वाचा आहे. जो काही आपण कालावधी देतो आहोत तो नसावा आणि नामनिर्देशन पत्र भरतानाच वैधता प्रमाणपत्र कंपल्सरी असले पाहिजे. हा मुद्दा खऱ्या अर्थाने शासनाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

श्री.राजेश टोपे (पुढे सुरू....

दृष्टीकोनातून महत्वाचा आहे. पण निवडणूक आणि कायदा एकाचवेळी आल्यामुळे संभ्रम निर्माण झालेला होता, म्हणून हा कायदा केलेला आहे. पुढे-मागे कायद्यामध्ये पुन्हा दुरुस्ती आणून ही मुदत काढून टाकावी लागेल. एकदा रुळावर गाडी आल्यानंतर मग ही सुधारणा करायला हरकत नाही. आता स्टार्टला गाडी थोडी खडकडत आहे. पुढे ज्याला निवडणूक लढवावयाची आहे त्याला जातीचे वैधता प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक रहाणार आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

ती सुधारणा आणावी लागेल. कुरीयन शेट्टी यासंबंधीचा विषय हायकोर्टामध्ये आहे. जर कोणी चुकीचे प्रमाणपत्र दिले असेल तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाते. स्वल्पविरामाच्या माध्यमातून चुकीचे सर्टिफिकेट दिले असेल आणि अनेक वर्षे त्या जातीच्या सदस्यांनी फायदे घेतले असतील तर...

ॲड. अनिल परब : यामध्ये त्याची चूक काही नाही.

श्री. राजेश टोपे : काही वर्षापूर्वी अनुसूचित जमातीची बोगस प्रमाणपत्रे दिली गेली आणि ते नोकरीला लागले. आज ज्यावेळी वैधताप्रमाणपत्र शासनाने कंपल्सरी केले त्यावेळी ते वैधता प्रमाणपत्र आणू शकत नाहीत. त्यांना नोकरीतून काढून टाकण्याचे आणि त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम शासनाच्या वतीने चालू आहे. अशा पध्दतीने बोगस सर्टिफिकेट इश्यू होऊ नये यादृष्टीने शासन निश्चितपणे पावले उचलणार आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 29 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 29 संमत झाले आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXVIII OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT.)**

श्री. राजेश टोपे ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 28- महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 28- महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, विधानमंडळ सदस्यांना सध्या रेल्वेने किंवा सडक मार्गाने प्रवास करताना पहिल्या वर्गाच्या भाड्याच्या दीडपट इतकी रक्कम प्रवासभत्ता म्हणून अनुज्ञेय होती. आता त्यांना व्दितीय वर्ग वातानुकूलित भाड्याच्या दीडपट इतकी रक्कम प्रवासभत्ता म्हणून देण्यात यावी अशी दुरुस्ती यामध्ये केलेली आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे...)

त्याच बरोबर मुंबई, नागपूर येथील विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी किंवा समितीच्या बैठकीला उपस्थित राहाण्यासाठी आमदारांना सध्या त्यांच्या राहाण्याच्या ठिकाणापासून ते अधिवेशनास किंवा समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहाण्यासाठी सध्या प्रति कि.मी. 5 रु. या दराने प्रवास भत्ता मिळतो. हा प्रवास भत्त्याचा दर प्रति कि.मी. 6 रु. दराने देण्यात यावा अशी तरतूद या विधेयकामध्ये केलेली आहे. यामुळे दरसाल रु. 70 लाख एवढा अतिरिक्त आवर्ती खर्च होईल असा अंदाज आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी प्रोटोकॉलच्यादृष्टीने सचिव आणि आमदार यांचा दर्जा काय आहे यासंबंधीची माहिती द्यावी अशी मी त्यांना विनंती करतो. सचिवांना आणि आमदारांना विमानाचे भाडे कोणत्या पध्दतीने दिले जाते ? सचिवांचा दर्जा हा आमदारांच्या दर्जापेक्षा वरचा असेल तर त्यांना मिळणारा भत्ता आणि विमान भाडे आम्ही मान्य करु. अन्यथा सचिवांना मिळणारे विमान भाडे व भत्ता यासंदर्भात आपणाला निर्णय घ्याला लागेल. शासकीय विश्रामगृहातील आरक्षणच्या संदर्भात देखील प्रोटोकॉल पाळला गेला पाहिजे. विश्रामगृहातील रुम खाली असेल तर ती प्रथम आमदारांना दिली पाहिजे...

डॉ. दीपक सावंत : परंतु असे होत नाही...

श्री. दिवाकर रावते : त्यांचा दर्जा काय आहे ते आम्हाला एकदा समजू द्या. विमान तसेच रल्वे आरक्षणाच्या बाबतीत त्यांना आधी आरक्षण मिळालेले असते आणि आम्हाला बॅगा घेऊन मागे मागे फिरावे लागते...

डॉ. दीपक सावंत : सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या याच भावना आहेत.

श्री. दिवाकर रावते : याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आमदारांच्या दर्जाबाबत सातत्याने विचारणा झालेली आहे. रेल्वे आरक्षण, विश्रामगृहाचे आरक्षण या बाबतीत राजपत्रित अधिका-यांकडून आमदारांचा अवमान होत असतो. यासंदर्भात आम्ही शासनाकडे लेखी निवेदने देखील दिलेली आहेत. आमदरांचा दर्जा आणि प्रतिष्ठा राखली जावी यादृष्टीने निर्णय घेण्याची गरज आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. ए. आर. अंतुले यांनी आमदारांचा दर्जा हा मुख्य सचिवांच्या दर्जाचा असतो असे स्पष्ट केले होते. आमदारांचा दर्जा हा राजपत्रित अधिका-याच्या दर्जापेक्षा वरचा आहे हे वळोवेळी क्लॅरिफाय झालेले आहे. जेव्हा अवमान होतो त्यावेळी लोकप्रतिनिधी तक्रार करीत असतात. अशा अवमानाच्या घटना लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. तेव्हा याबाबतीत निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा आणि गंभीर असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. कोट्यवधी लोकांचे प्रतिनिधी म्हणून आमदार याठिकाणी जेव्हा बसतात त्यावेळी त्यांना एक सन्मान प्राप्त झालेला असतो. हा सन्मान कसा असावा, काय असावा यासंबंधीचा खुलासा त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री श्री. ए.आर. अंतुले साहेब यांनी केलेला होता. त्यावेळी काही आदेश जिल्हाधिकारी आणि अन्य सर्व शासकीय अधिका-यांना पाठविले होते. त्यामध्ये असे नमूद केलेले होते की, सन्माननीय आमदार त्यांना भेटायला आले तर त्यांनी उठून उभे राहावे, ते अचानक मिटींगमध्ये असतील तर त्यांनी तेवढ्या वेळे पुरता बाहेर येऊन "मी मिटींगमध्ये आहे कृपया दालनात बसावे" असे सांगावे, अशा प्रकारचे अनेक आदेश दिलेले होते. परंतु ते दिलेले आदेश आणि त्यानंतरची वातावरण निर्मिती पाहता लोकप्रतिनिधींचा मान राखला जात नसल्याची प्रचिती वारंवार येते. याबाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना सारख्याच आहेत. तेव्हा या ठिकाणी मांडण्यात आलेल्या मुद्यांची गंभीर दखल घेऊन शासनाने उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे असे मला वाटते.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : आमदारांचा सन्मान राखला जावा, लोकप्रतिनिधींना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून वेळोवेळी परिपत्रके काढलेली आहेत. येथील चर्चा लक्षात घेता असा सन्मान राखला जात नाही हे स्पष्ट होते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

सभापती महोदय, आतापर्यंत या संदर्भात जी परिपत्रके काढण्यात आली आहेत ती परिपत्रके पुन्हा एकदा पाठविण्यात येतील. या परिपत्रकांची अंमलबजावणी केली पाहिजे असे कडक शब्दात कळविण्यात येईल. जे अधिकारी या परिपत्रकांचे पालन करीत नाहीत अशा उन्मत अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल.

**सभापती** : सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय, या बाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपले अनुभव याठिकाणी सांगितले, ते वस्तुस्थितीला धरुन आहेत. आपण सांगितले की, यापूर्वी दिलेल्या ज्या सूचना आहेत त्या सूचना पुन्हा एकदा देण्याची व्यवस्था केली जाईल. मला वाटते, याबाबत शासनाने काटेकोरपणे ही काळजी घेतली पाहिजे की, संसदीय लोकशाहीमध्ये स्थानिक आमदार असेल, खासदार असेल या दोन्ही लोकप्रतिनिधींची जी प्रतिष्ठा आहे ती प्रतिष्ठा वादातीत असणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने त्यांना योग्य ती प्रतिष्ठा मिळेल याची काळजी सातत्याने शासनाने घेणे गरजेचे आहे. यादृष्टीने जरुर आपण सांगितले आहे. पण याची अंमलबजावणी व्यवस्थित होईल हे पहावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, परिपत्रके पाठविली जातील, आमदारांना दिली जातील. एकदा दर्जा काय आहे हे निश्चित करणे आवश्यक आहे. आमदार हे सचिवांपेक्षा मोठे आहेत की सचिवांच्या बरोबरीचे आहेत या संदर्भात स्पष्टीकरणे होणे आवश्यक आहे.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, लोकप्रतिनिधींचा अवमान झाला तर 24 तासाच्या आत त्याची दखल घेऊन कारवाई झाली पाहिजे. असे झाले तरच धाक बसू शकेल. अन्यथा कितीही सर्क्युलर्स काढली, ताकिद दिली तरी त्याची दखल घेतली जात नाही हा आमचा अनुभव आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना याठिकाणी व्यक्त केल्या आहेत. दर्जा किंवा अन्य सवलती असोत निश्चितप्रकारे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी याठिकाणी सांगितले त्याप्रमाणे त्या परिपत्रकांची अंमलबजावणी अतिशय कठोरपणे करण्याचे काम शासनाच्या वतीने केले जाईल. दर्जाचा विषय जो आहे, प्रोटोकॉलमध्ये सचिव वरच्या दर्जाचे की आमदार वरच्या दर्जाचे या संदर्भात निश्चिती येण्याची आवश्यकता आहे. आज या बिलाच्या माध्यमातून आमदारांना रेल्वे प्रवास करण्यासाठी द्वितीय वर्ग वातानुकूलित श्रेणीचे भाडे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.......

आपण मंजूर केले आहे. पूर्वी प्रथमश्रेणीचे भाडे दिले जात होते. सचिव आणि आमदार या दोघांना द्वितीय वर्ग वातानुकूलित श्रेणीचे भाडे दिले जाणार आहे. दर्जासंबंधी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या संदर्भात जरुर विचार करण्यात येईल आणि प्रतिष्ठा राखण्याचे काम केले जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्न सवलतींचा नाही. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले, आपणही संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधी हे नेहमी वरच्या दर्जाचे असले पाहिजेत, नोकरशाही खाली असली पाहिजे. परंतु असे होत नाही. या संदर्भात स्पष्ट निर्देश दिले पाहिजेत. दर्जा कोणाचा वरचा आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की, मुख्यसचिवांपेक्षा लोकप्रतिनिधींचा दर्जा वरचा आहे. याबाबत स्पष्ट आदेश काढले पाहिजेत. सवलती आणि इतर अनुषंगिक बाबींची चर्चा करण्याची गरज नाही. दर्जा निश्चित झाला पाहिजे आणि त्या बाबत स्पष्ट आदेश दिले पाहिजेत.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे दर्जाबाबत निश्चित व्हावी, ही निश्चिती शासनाच्या वतीने जरुर केली जाईल. दर्जा ठरविण्याची निश्चिती शासनाच्या वतीने जरुर केली जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 28 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 28 संमत झाले आहे.

------------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील भात उत्पादक शेतक-यांना मदत देण्याबाबत.

**मु.शी.**: राज्यातील भात उत्पादक शेतक-यांना मदत देण्याबाबत माननीय कृषी मंत्र्यांचे निवेदन.

श्री. बाळासाहेब थोरात ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबतचे निवदन छापावे. )

---------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : काल या सदनात आंबा उत्पादक शेतक-यांना शासनाने मदत द्यावी यासाठी चर्चा उपस्थित करण्यात आली होती. या चर्चेच्या संदर्भात आंबा उत्पादक शेतक-यांना मदत देण्याचे आश्वासन दिलेले असले तरी, आंबा उत्पादक शेतक-यांना मदत मिळवून देण्याच्या संदर्भात 15 दिवसात कॅबिनेटच्या मिटींगमध्ये निर्णय घ्यावा व आंबा उत्पादक शेतक-यांना मदत मिळवून द्यावी. ही मदत मिळवून देण्याच्या संदर्भात सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

श्री. आर.आर.पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, धान उत्पादक, कापूस उत्पादक, ऊस उत्पादक शेतक-याला शासनाने भरीव मदत केलेली असून यातून हापूस आंबा उत्पादक शेतकरी कसा सुटेल ? त्यामुळे राज्यातील आंबा उत्पादक शेतक-यांला सुध्दा योग्य ती मदत केली जाईल. आंबा उत्पादक शेतक-यांच्या आंब्याचे उत्पादनात कितीने घट झाली, आंबा उत्पादक शेतक-याचे किती नुकसान झाले, या शेतक-याला किती मदत देणे आवश्यक आहे यासंदर्भात तज्ञ व्यक्तींची मदत घेऊन शेतक-याला जास्तीत जास्त मदत कशी करता येईल यासंदर्भात अभ्यास करुन मदत दिली जाईल.

श्री. दिवाकर रावते : आंबा उत्पादक शेतक-याला 15 दिवसात मदत मिळण्याच्या संदर्भात निर्णय घेतला जाणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात 15 दिवसात निर्णय घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासन कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याला काही तरी मदत देईल याची मला खात्री आहे, विश्वास आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

एका अधिवेशनामध्ये ऊसाला भाव देता, कापसाला भाव देता, धानाला भाव देता, परंतु कोकणातील शेतकऱ्यांना बाजूला टाकले जाते हे योग्य नाही. कोकणातील आंबा पिकाचा प्रश्न असेल तर कॅबिनेटमध्ये चर्चा आणि कापूस, ऊस आणि धानाच्या बाबतीत मात्र येथे पटापट चर्चा झाली. तेव्हा अशाप्रकारचा मॅसेज कोकणातील जनतेमध्ये जाऊ नये म्हणून याठिकाणी आंबा पिकाच्या नुकसानीसंदर्भात घोषणा झाली पाहिजे. सरकारने आंब्याच्या संदर्भात आज घोषणा केली तर त्यास महत्व आहे. तेव्हा कोकणातील जनतेला प्रतिकूल मॅसेज जाऊ नये म्हणून आंब्या संदर्भात आजच घोषणा करण्यात यावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात धानाच्या बाबतीत आश्वासन दिले होते ते आम्ही क्लिअर केलेले आहे. आमचे सरकार दिलेला शब्द पाळते असा जनतेचा विश्वास आहे. तेव्हा सरकारच्या वतीने जे सांगण्यात आलेले आहे त्याबाबतीत कोकणात नक्कीच चांगला संदेश जाईल.

## <u>सत्रकाळातील कामकाजाचा आढावा</u>

**सभापती** : बजेट अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी सोमवार, दिनांक 14 मार्च 2007 ते मंगळवार, दि. 17 एप्रिल, 2007 या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो. एकूण बैठकीची संख्या **21** आहे. एकूण काम आपण **145** तास इतके केले आहे. यामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ **1 तास**, कोरम नसल्यामुळे वाया गेलेला वेळ **2 तास** व अन्य कारणामुळे वाया गेलेला वेळ **4 तास** आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज **138 तास** आहे. रोजचे सरासरी कामकाज **06 तास 35** मिनिटे झालेले आहे.

***<u>तारांकित प्रश्न</u> :-***

एकूण **4895** तारांकित प्रश्नांच्या सूचना आल्या. या पैकी कार्यवाहीसाठी **4095** तारांकित प्रश्न घेण्यात आले. **1161** प्रश्न स्वीकृत झाले व सभागृहात **142** तारांकित प्रश्नांना तोंडी उत्तरे देण्यात आली.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .........

***अल्पसूचना प्रश्न :-***

एकूण **2** अल्पसूचना प्रश्न प्राप्त झाले. यापैकी **1** अल्पसूचना प्रश्न स्वीकृत झाला.

***नियम 93 अन्वये सूचना :-***

एकूण **123** सूचना प्राप्त झाल्या. यापैकी **99** सूचनांवर निवेदने करण्यात आली व यापैकी 76 सूचनांवर चर्चा करण्यात आली

***लक्षवेधी सूचना -***

एकूण **1203** सूचना प्राप्त झाल्या. यापैकी **258** सूचना मान्य झाल्या व **60** सूचनांवर चर्चा करण्यात आली.

***विशेष उल्लेख :-*** एकूण **104** विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्यात आल्या.

**नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा :-**

एकूण 06 सूचना प्राप्त झाल्या. यापैकी 05 सूचना मान्या झाल्या व 03 सूचनांवर चर्चा करण्यात आली.

***शासकीय विधेयके :-*** एकूण **16** विधेयके संमत करण्यात आली.

***अशासकीय विधेयके :-*** **1** अशासकीय विधयके विचारार्थ घेण्यात आले.

***अशासकीय ठराव :-*** एकूण 2 अशासकीय ठरावांवर चर्चा झाली.

***नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा -*** एकूण 06 प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

***नियम 46 अन्वये निवेदन -*** मंत्री महोदयांनी 01 निवेदन केले.

***अर्धातास चर्चा -*** एकूण 86 अर्धा तास चर्चेच्या सूचना आल्या. त्यापैकी 68 सूचना मान्य करण्यात आल्या व 09 सूचनांवर चर्चा करण्यात आली.

------------------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**सभापती** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक, 16 जुलै, 2007 पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

---------

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

" भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, एस. एम. कृष्णा, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( सायंकाळी 7.56 वाजता सत्र संस्थगित झाले. )

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही